अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै २०११ । किंमत १५ रुपये





स्वाती चांदोरकर

सिंधु जोशी

सुनंदा अमरापूरकर



'इन्फोसिस'मध्ये ग्रंथप्रदर्शन

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे पुण्यातील 'इन्फोसिस'च्या आवारात मराठी आणि इंग्लिश पुस्तकांचे भव्य प्रदर्शन जून २०११ मध्ये भरविण्यात आले होते, त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

◆ जुलै २०११
◆ वर्ष अकरावे
◆ अंक सातवा

मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —

संपादकीय	४
साहित्यवार्ता	१४
एक दृष्टीक्षेप	३२
गौरव	४०
पुस्तक परिचय	
शेम	
: अनु. सुनंदा अमरापूरकर	४६
थ्री कप्स ऑफ टी	
: अनु. सिंधु जोशी	५४
युथनेशिया : स्वाती चांदोरकर	६२
पुरस्कार	७०
वाद-संवाद	७५
वाचकांचा प्रतिसाद	९७
श्रद्धांजली	९८
बालनगरी	१०५
दिवाळी अंक स्पर्धा	११३

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता
पब्लिशिंग
हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) -२२७/२४३**
Email - info@mehtapublishinghouse.com
Website - www.mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.
३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

बुक्स ऑन डिमांड

ई-बुक्सच्या वाढत्या खपामुळे मुद्रित पुस्तकांची बाजारपेठ हळूहळू संकोच पावत आहे. आणि ग्रंथ प्रकाशनसंस्थांना नव्या डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे क्रमप्राप्त ठरत आहे. अशा वेळी छापील पुस्तके कुठेही, केव्हाही उपलब्ध व्हावी अशी व्यवस्था करणाऱ्या 'बुक्स ऑन डिमांड' सारख्या अद्ययावत यंत्रणांचाही प्रचार केला जात आहे, प्रिंट मिडियावरचा विश्वास प्रकट केला जात आहे, याचे कोणालाही आश्चर्य वाटेल.

इ.स.२०११मध्ये पुस्तक प्रकाशन व्यवसायाने 'बुक्स ऑन डिमांड'च्या कल्पनेला पुन्हा चालना देण्यात येत आहे. चार वर्षांपूर्वी झेरॉक्स कंपनीने एस्प्रेसो बुक मशीन बाजारात आणले. नऊ फूट लांब, सात फूट उंच अशा या मशीनने एस्प्रेसो कॉफी तयार करायला जेवढा वेळ लागतो, तेवढ्या वेळात आपल्याला हव्या असलेल्या पुस्तकांची नवी कोरी प्रत छापून, बांधणी करून (मुखपृष्ठासह) मिळू शकेल, असे झेरॉक्स कंपनीने त्यावेळी म्हटले होते. एखाद्या ग्रंथालयातील दुर्मिळ पुस्तक आपल्याला हवे असेल तर ते झेरॉक्स करण्याऐवजी एक लाख डॉलर्स किमतीच्या एस्प्रेसो बुक मशीनद्वारे नव्याने छापून घेता येईल. एकापेक्षा जास्त प्रतीही काढता येतील. महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नोट्सची प्रत हवी असेल तर स्वत: लिहून घेत बसण्याऐवजी 'एस्प्रेसो'द्वारे सीडीवरून त्या पुस्तकरूपात छापून घेता येतील. पुस्तकाच्या दुकानात उपलब्ध नसलेल्या कुठल्याही पुस्तकाची प्रत सीडी द्वारे वा पीडीएफ फाइलद्वारे डिजिटल स्वरूपात डाऊनलोड करून घेऊन एस्प्रेसोवर छापून घेता येईल. सीडीवरून वा इंटरनेटवरून कन्टेन्ट घेऊन तो झटपट छापून पुस्तकांची निर्मिती करण्याच्या दृष्टीने ही सोय निश्चितच महत्त्वाची ठरेल. एखाद्या कवीला आपला काव्यसंग्रह निघावा अशी इच्छा असेल तर तो काव्यसंग्रहाची सीडी घेऊन एस्प्रेसो बुक मशीन असणाऱ्या ग्रंथदालनात जाऊन तो छापून घेऊ शकेल. त्यासाठी प्रकाशकाची मनधरणी करण्याची गरज पडणार नाही. 'एस्प्रेसो' बुक मशीनमध्ये झेरॉक्स ४११२ कॉपिअर प्रिंटर आणि बाइंडर यांचाही समावेश होतो. त्याद्वारे तीनशे पृष्ठांचे पुस्तक काही मिनिटात तयार होते; आणि वर्षाला ४० हजार पुस्तके तयार

करण्याची क्षमता असते. किरकोळ ग्रंथविक्रेते, ग्रंथालये यांना हे मशीन उपयुक्त आहे; असा दावा कंपनीने केला होता. अमेरिका-यूरोपमध्ये ट्रायलसाठी काही मशीन्स बसवली होती. परंतु एकूण या मशीनला फारसे ग्राहक मिळाले नाहीत. तथापि या मशीनला व्यापक स्तरावर मान्यता मिळावी असा कंपनीचा प्रयत्न चालू आहे.

'झेरॉक्स एस्प्रेसो बुक मशीन'च्या जोडीनेच ह्युलेट पॅकार्ड (एचपी) या कॉम्प्युटर प्रिंटर उत्पादक संस्थेने अमेरिकेत 'एचपी टी ४०० कलर इंकजेट वेब प्रेस' बाजारात आणला आहे. या वेबप्रेसद्वारे पुस्तकांची निर्मिती अत्यंत द्रुतगतीने होऊ शकते. एकाच वेळी अनेक पुस्तकांचे काम यावर करता येते.

प्रतींच्या संख्येनुसार आणि पृष्ठांच्या संख्येनुसार अशी पुस्तके तयार करण्यासाठी वेगवेगळ्या क्षमता असणारी सात मॉडेल्स बाजारात आलेली आहेत. प्रत्येक मॉडेल आपल्या परीने स्वयंपूर्ण असून, तयार पुस्तक अल्पावधीत वाचकाच्या हातात देऊ शकते. या पुस्तकांची निर्मिती मूल्ये व्यावसायिक दर्जाची असतात. झेरॉक्स केलेल्या पुस्तकासारखी कामचलाऊ नसतात. अमेरिकेत या मशीन्सचा वापर काही ग्रंथविक्रीकेंद्रे आणि ग्रंथालये प्रायोगिक पातळीवर करीत आहेत.

दुर्मिळ, अनुपलब्ध पुस्तकांची, कॉपीराइटमुक्त पुस्तकांची ग्राहकांच्या मागणीनुसार निर्मिती करण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा आणि मुद्रणयंत्रांचा वापर करणे फारच सोयीचे झाले आहे, असा संबंधितांचा अनुभव आहे. पुस्तकाचा साठा करणे, गोडाऊनमध्ये गुंतवणूक करणे, पुस्तकांची वाहतूक करणे या पारंपरिक ग्रंथविक्रीच्या चाकोरीतून बाहेर पडणे ग्रंथविक्रेत्यांना शक्य झाले आहे. हजारो, लाखो पुस्तके डिजिटल स्वरूपात उपलब्ध असल्याने ग्राहकांना कोणतेही पुस्तक हवे तेव्हा छापून घेता येते.

या बुकमशीन्समुळे सेल्फ पब्लिशिंगलाही चालना मिळेल. ग्रंथविक्रेत्यांची गुंतवणूक आटोक्यात येईल. मोठ्या ग्रंथदालनांऐवजी छोट्या जागेतूनही व्यवसाय करणे सोपे होईल वगैरे दावे झेरॉक्स कंपनी करीत असली तरी एटीएम प्रमाणे ही मशीन्स गल्लीगल्लीत दिसावीत हे कंपनीचे स्वप्न प्रत्यक्षात येण्यास अजून काही काळ जावा लागेल असे वाटते. या मशीनसाठी होणारी गुंतवणूक आणि मिळणारे उत्पन्न यांचा मेळ घालणे यूरोप-अमेरिकेतही अवघड जात आहे. भारतात ते आणखीच कठीण आहे.

इंग्लंडमधील ग्रंथव्यवहाराला वाहिलेल्या द बुकसेलर या मासिकात इ.स.२०१० मधील पुस्तकविक्री आणि ई-बुकविक्री याबद्दलची आकडेवारी देण्यात आली आहे. अशी आकडेवारी आपल्याकडे मिळत नाही; त्यामुळे आपल्या ग्रंथव्यवहाराचे नेमके स्वरूप कळत नाही. इंग्लंडमध्ये इ.स.२०१०मध्ये ७३ कोटी ९० लाख छापील पुस्तके विकली गेली आणि त्यामुळे ३.१ अब्ज पौंडांची उलाढाल झाली. पुस्तकांच्या निर्यातीतून १.३ अब्ज पौंडांचे उत्पन्न मिळाले. ई-बुक्सची विक्री ही एकूण ग्रंथविक्रीच्या तीन टक्क्यांपेक्षा कमी होती.

रँडम हाऊसने इंग्लंडमध्ये या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत २० लाख ई-बुक्सची विक्री करून गतवर्षाच्या तुलनेत दहापट वाढीचा टप्पा गाठला. ली चाइल्ड, जेम्स पॅटरसन, ज्यो नेस्बो या तीन बेस्टसेलर लेखकांच्या पुस्तकांमुळे रँडम हाऊसला हा खपाचा उच्चांक गाठता आला. २०१० मध्ये सुरुवातीला फक्त १८०० ई-बुक्स रँडम हाऊसच्या यादीत होती. वर्षअखेरीला ही संख्या सहा हजारावर गेली. गेल्या वर्षात ॲमेझॉनचे किंडल वाचनयंत्र, आयपॅड, आयफोन यांचा इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणावर उठाव झाला. नाताळच्या उत्सवादरम्यान या वाचनयंत्रांची भेट देण्याचे प्रमाण मोठे होते. त्यामुळे ई-बुक्सची मागणीही खूप वाढली. त्याचा फायदा रँडम हाऊसलाच नव्हे तर इतरही प्रकाशनसंस्थांना मिळाला. पेंग्विनची २०११ च्या पहिल्या तिमाहीतील विक्री दुप्पट झाली. हॅचेट युके या प्रकाशनसंस्थेने चौपट वाढ नोंदविली. सिमन ॲड शूस्टरने आपल्या एकूण पुस्तक विक्रीत ई-बुक्सचे प्रमाण सव्वा तीन टक्के असल्याचे आणि २०११च्या अखेरीस ते ५ टक्क्यांवर जाईल असे जाहीर केले. ॲमेझॉनने किंडलची किंमत कमी करून फक्त १११ पौंडांना ते बाजारात आणले, त्याची जोरदार प्रसिद्धी केली. त्यामुळे ई-बुक्सच्या मागणीत तीनशे टक्के वाढ होऊन १.६ कोटी पौंडांचा उच्चांक गाठला.

ई-बुक्सचा प्रसार इंग्लंडपेक्षाही अमेरिकेत जास्त झालेला आहे. एकूण ग्रंथव्यवहारात जो सात आठ टक्क्यांच्या जवळपास आहे. ॲमेझॉनने 'किंडल' हे वाचनयंत्र प्रथम बाजारात आणून ई-बुक्स क्षेत्रात आपले आघाडीचे स्थान टिकवले आहे. ॲमेझॉनच्या इंग्लंडमधील शाखेला मे महिन्यात 'डायरेक्ट बुकसेलिंग कंपनी ऑफ दि इयर' म्हणून गौरविण्यात आले. इ.स.२०१० मध्ये ॲमेझॉनने ३४.२ अब्ज डॉलर्सचा विक्रमी व्यवसाय केला. आदल्या वर्षाच्या तुलनेत तो ४० टक्के जास्त होता. ॲमेझॉनवर ऑनलाइन पुस्तके, कॅसेटस, खेळणी वगैरे विकत घेण्याचा अनुभव हा ग्राहकांना सुखद आणि विश्वासार्ह ठरला आहे. ग्राहकाला हव्या असलेल्या पुस्तकाबरोबर इतरही चांगल्या पुस्तकांची शिफारस ॲमेझॉन आकर्षकपणे करते, एक्सलंट कस्टमर सर्व्हिसबद्दल ॲमेझॉनचा जो लौकिक आहे तो सार्थ ठरतो. किंडल या वाचनयंत्रामुळे ग्रंथव्यवहाराचे स्वरूप आमूलाग्र बदलणार आहे. ग्रंथविक्री क्षेत्रात ॲमेझॉनने आपले अग्रस्थान प्रस्थापित केले आहे. ॲमेझॉन ही कार्यक्षमतेच्या दृष्टीने विलक्षण प्रभावी संस्था आहे. जगातील सर्वात मोठी ऑनलाइन ग्रंथविक्री संस्था असूनही वाचकग्राहकांच्या दृष्टीने नवनव्या सोयीसुविधांचा शोध घेण्याचे आणि ग्रंथव्यवहाराला चालना देण्याचे नवनवे मार्ग चोखाळण्याचे ॲमेझॉनचे धोरण एकूणच ग्रंथव्यवहाराला विश्वात्मक बनवणारे आहे.

दिवाळी अंक २०११

रसिक वाचकांसाठी स्पर्धा
एक हजार रुपयांची पुस्तके बक्षीस मिळवा

वाचक मित्रांनो,

- या दिवाळी अंकासाठीही एक स्पर्धा जाहीर करत आहोत.

- ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. फक्त अट एवढीच की इ.स. २०१०-२०११ मध्ये तुम्ही एका पेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन वाचलेली असावीत.

- किमान दोन पुस्तके तरी दोन वर्षात विकत घेतलेली असणे आवश्यक. त्यासाठी बिल वगैरे पुरावा देण्याची गरज नाही. तुमच्या शब्दावर आमचा विश्वास आहे.

- आपण खरेदी केलेल्या पुस्तकांची नावे **(जास्तीत जास्त दहा)** पोस्टकार्डावर लिहून कळवा.

- त्यातील तुम्हाला सर्वात जास्त आवडलेल्या पुस्तकाबद्दल तीनचार ओळीत माहिती द्या.

- या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची नावे दिवाळी अंकात छापण्यात येतील.

- लॉट टाकून यशस्वी ठरणाऱ्या दोन स्पर्धकांना प्रत्येकी १,००० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील

पत्र पोचण्याची अंतिम मुदत ३० जुलै २०११

आमचा पत्ता :

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४

नवे कोरे

दिवा

प्रमोदिनी वडके-कवळे

२७०रु. पोस्टेज २५रु.

गेल्या पन्नास-साठ वर्षांत भारतीय स्त्रियांचे मनोविश्व बदलले पण त्यांच्याभोवतीचे वातावरण मात्र बदलले नाही. समाजाच्या अपेक्षाही बदलल्या नाहीत.

जगण्याची आधुनिक शैली स्वीकारताना स्त्रियांनी पारंपरिक बाज सांभाळावा आणि मध्यममार्गी जगण्याच्या चौकटीत राहूनच जगाचा वेध घ्यावा, अशी समाजाची अपेक्षा असते.

अशा तळ्यातमळ्यात जगणाऱ्या स्त्रियांचा आणि त्यांनी आपल्या परीने सोडवलेल्या काही सामाजिक समस्यांचा वेध.

सहज सुंदर भाषा आणि ओळखीचं वातावरण, यामुळे या कथांतली पात्रं मनाचा अलगद ठाव घेतात.

नवे कोरे

एका परिसाची कथा

मिलिंद जोशी

२००रु. पोस्टेज २५रु.

संध्याकाळ होताच सतीश बागेत आला.
रचना आधीपासूनच तिथे हजर होती.
तिच्या टपोऱ्या डोळ्यांमधून प्रेम ओसंडून वाहत होतं.
सतीशच्या डोक्यात थैमान घालणारं
विचारांचं वादळ दूर पळालं.
रचना दृष्टीस पडताच तिच्याबद्दलच्या जिव्हाळ्यानं
त्याचं मन उचंबळून आलं.
त्याला जाणवली, तिच्यातल्या ममत्वानं आणि कणखर
स्त्रीत्वानं त्याला मिळवून दिलेली आध्यात्मिक शांतता.
त्याला जाणवले,
तिच्या मनस्त्रोताचे निर्मळ आणि पवित्र झरे.

आगामी

दॅट थिंग कॉल्ड लव्ह

तुहीन ए. सिन्हा
अनुवाद
श्यामल कुलकर्णी

२००रु. पोस्टेज २५रु.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर, मुंबई मायानगरीत रंगलेल्या प्रेमकहाण्या.

एका विवाहितेमध्ये आपली आदर्श पत्नी, सखी शोधणारा उमदा, तरुण जाहिरात व्यवस्थापक.

पत्नीला पूर्वाश्रमीच्या प्रियकराचा विसर पडावा, म्हणून वाट बघणारा सहनशील पती.

स्त्रीलंपट पण दिलदार पुरुष आणि कॉलगर्ल असलेली रिसेप्शनिस्ट यांच्यातील प्रेमाचे भेदक दर्शन.

आगामी

कीप ऑफ द ग्रास

करण बजाज

अनुवाद

माधुरी शानभाग



१६०रु. पोस्टेज २५रु.

वयाच्या पंचविसाव्या वर्षी येलसारख्या विद्यापीठातून पदवी घेऊन, तुम्ही वॉलस्ट्रीटवरील बँकेमधे वर्षाला पाच लाख डॉलर्स कमवू लागाल आणि वयाच्या तिसाव्या वर्षी कोट्यधीश बनाल.

मात्र तुम्ही जर स्थलांतरित भारतीय आईबापाच्या पोटी अमेरिकेत जन्माला आलेल्या सम्राट रतनसारखे असाल, तर तुम्ही हे सर्व सोडून भारतीय बीस्कूलमधे प्रवेश घ्याल....

सम्राटचा चक्रावून टाकणारा प्रवास बंगलोरच्या आय.आय.एम.पासून सुरू होतो. वेडीवाकडी वळणे घेत, स्वप्नातही येणार नाहीत अशा जागी त्याला त्याचे आयुष्य घेऊन जाते ... आणि घडू नयेत अशी कृत्ये त्याच्या हातून घडतात.. उदा. विपश्यना, ध्यानधारणा, सेक्सी डॅनिश हिप्पीबरोबर हिमालयात भटकणे, नरभक्षक साधूबरोबर बनारसच्या गंगाघाटावर बसणे आणि राजाभैय्याच्या प्रजेला साबण विकणे.

हा सगळा प्रवास त्याला कुठे घेऊन जातो?...

करण बजाजच्या या पहिल्याच कादंबरीत चालू पिढीतल्या तरुणाईची स्पंदने प्रकट होतात आणि अंतर्मुख करतात.

आगामी



ब्लड मनी

लेखक

क्रिस कॉलेट

अनुवाद

वैशाली रानडे

२००रु. पोस्टेज २५रु.

गुप्तहेर खात्यातील उपायुक्त मरिनर सुट्टी घेणार, इतक्यात डे नर्सरीच्या पाळणाघरातून सहा आठवड्यांच्या जेसिका क्लिनमानचे अपहरण होते. त्याची रजा रद्द होते. या पब्लिक केसमध्ये मरिनर पुढाकार घेतो. सुरुवातीला केवळ एक अपहरण वाटणारी ती घटना नंतर नियोजनबद्ध योजना वाटू लागली. हेतू स्पष्ट होईपर्यंतच मरिनरला शोध लागतो की, अपहरण झालेल्या मुलीचे वडील शास्त्रीय संशोधन कंपनीत काम करत आहेत आणि प्राणी हक्कांसाठी लढणाऱ्यांचे ते लक्ष्य आहेत.

दोन दिवसांनी ही घटना जेव्हा आश्चर्यजनकपणे समोर येते, तेव्हा एका तुटक मजकूराच्या चिठ्ठीमुळे प्राणी हक्क संरक्षण समितीचेच लोक या दहशतीमागे आहेत हे स्पष्ट होते.

पण पाळणाघरातील एक कर्मचारी जेव्हा एका गाडीखाली मारली जाते, तेव्हा ही केस खऱ्या अर्थाने खळबळ उडवते.....

वातावरण आणि व्यक्तिरेखांचे मार्मिक आणि चटपटीत वर्णन करणारी, कोलेट ही एक उत्तम लेखिका आहे...

– यॉर्कशायर पोस्ट

आगामी



अगली

मूळ लेखक

कॉन्स्टन्स ब्रिस्को

अनुवाद

उल्का राऊत

२५०रु. पोस्टेज ३०रु.

मी माझा शाळेचा फोटो आईला दिला.

तिने माझ्या फोटोकडे नीट निरखून पाहिले.

नंतर माझ्याकडेही बारकाईने पाहिले.

'देवाऽ, ही कार्टी इतकी कुरूप कशी जन्माला आली? अरे देवा, किती कुरूप आहे ही...!'

क्रूर, विद्ध करणारे हे शब्द ही केवळ सुरुवात आहे. कॉन्स्टन्सच्या आईने अतिशय पद्धतशीरपणे, कायम आपल्या मुलीचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. सततची मारझोड आणि उपासमार ह्यामुळे पराकोटीची निराश होऊन तिने शेवटी सामाजिक सेवाभावी संस्थेमध्ये आश्रय घेण्याचाही प्रयत्न करून पाहिला. तिला अक्षरश: वाऱ्यावर सोडून तिची आई चक्क दुसरीकडे राहायला निघून गेली. घरात गॅस नाही, वीज नाही, खायला अन्न नाही अशा बिकट परिस्थितीशी मुकाबला करीत कॉन्स्टन्सने दिवस काढले.

अत्यंत यातनामय जीवनाला कॉन्स्टन्सने कमालीच्या धैर्याने तोंड दिले.

कॉन्स्टन्सच्या हृदयद्रावक – आणि यशस्वी – जीवनसंग्रामाची ही कथा.

साहित्यवार्ता

*** प्रा. नरहर कुरुंदकरांचे स्मारक**

धर्म, इतिहास, तत्त्वज्ञान, सांस्कृतिक मानववंशशास्त्र, कला, साहित्य, समाजकारण, सौंदर्यशास्त्र, राजकारण, अर्थकारण अशा विविध विषयांतील जाणकार, थोर विचारवंत व साक्षेपी समीक्षक प्राचार्य नरहर कुरुंदकर यांचे नांदेड येथील स्मारक सरकारी अनास्थेच्या गर्तेत सापडले असून गतवर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या दोन कोटी रुपयांपैकी एक छदामही अद्याप देण्यात आलेला नाही.

लेखणी हे शस्त्र व वक्तृत्व हे अस्त्र मानणाऱ्या कुरुंदकरांचे जागर, शिवरात्र, मागोवा, मनुस्मृति, वाटा; माझ्या-तुझ्या, धार आणि काठ हे ग्रंथ त्यांच्या विद्वत्तेची आणि व्यासंगाची साक्ष देतात. खऱ्या अर्थाने 'आचार्य' असलेल्या नरहर कुरुंदकर यांची स्मृती चिरंतन राहण्यासाठी नांदेड या त्यांच्या कर्मभूमीत स्मारक उभारण्याची कल्पना पुढे आली. तेव्हा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी या स्तुत्य उपक्रमासाठी सरकारी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे जाहीर आश्वासन दिले. दोन वर्षांपूर्वी स्मारकाची इमारत व प्रगत अध्ययन केंद्रासाठी पाच कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता. नांदेड एज्युकेशन सोसायटीने आपली दीड एकर जागा या स्मारकासाठी दिली.

औरंगाबाद येथील वास्तुविशारद अजय कुलकर्णी यांनी स्मारकाचा आराखडा तयार केला.

या केंद्राद्वारे कुरुंदकरांच्या आवडीच्या विषयांच्या प्रगत अभ्यासाची सोय करणे, आंतरविद्याशाखीय संशोधनास प्रोत्साहन देणे, संशोधकांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेणे कुरुंदकरांचे विविध प्रकाशित व अप्रकाशित लेखन, त्यांचा पत्रव्यवहार, ध्वनिमुद्रित व्याख्याने व छायाचित्रांचे संकलन करणे, समाजाला विचारप्रवण करणारे नियतकालिक सुरू करणे असे विविध उपक्रम नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानने प्रस्तावित केले आहेत.

गतवर्षी अर्थमंत्री सुनील तटकरे यांनी कुरुंदकर स्मारकासाठी दोन कोटी रुपयांची प्रारंभिक तरतूद केल्याचे जाहीर केले. नंतर नांदेडचे जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी यांच्यासमवेत प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या वेळोवेळी बैठका झाल्या. त्यात सरकारी निधी थेट प्रतिष्ठानकडे न देता बांधकाम विभागामार्फत स्मारकाचे बांधकाम करण्याचे ठरले.

*** 'भटाचे पोर' पुस्तकाचे प्रकाशन**

महाराष्ट्रात मराठी माणूस विखुरलेला असून, तो जातीच्या जोखडात अडकून पडला आहे. सर्व जाती विसरल्या तर हिंदुत्व येईल आणि हिंदू म्हणून मतदान केले तर मराठी माणसांची सत्ता येईल, असे मत शिवसेना नेते खासदार मनोहर जोशी यांनी डॉ. विश्वास मेहेंदळे यांच्या 'भटाचे पोर' या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, वेदाचार्य मोरेश्वर घैसास गुरुजी, शिवसेनेच्या जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चंद्रकांत मोकाटे, अनुबंध प्रकाशनचे अनिल कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते.

जोशी म्हणाले, गेली ४४ वर्षे मी शिवसेनेत आहे; पण शिवसैनिकांनी ब्राह्मण म्हणून माझा कधीही द्वेष केला नाही. जातीचे मतभेद गाडून एक मराठी माणूस उभा करण्याची शिकवण शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी दिली. त्यांच्या विचाराप्रमाणे आपण एक मराठी माणूस म्हणून स्वत:कडे का पाहत नाही? समाजाची बाजू मांडण्यासाठी हे पुस्तक ठीक आहे.

ॲड. निकम म्हणाले, पुरोगामी महाराष्ट्रात जाती समाज असा संघर्ष निर्माण झाला असून, यामुळे सामाजिक, सांस्कृतिक दहशतवाद निर्माण होण्याची भीती वाटते. जातीमुळे अन्याय होतो, हा न्यूनगंड मनातून काढून टाका.

प्रत्येक गोष्ट जातीच्या आरशातून पाहू नका, आरक्षणाबाहेरील समाजासाठी शासनाने काहीतरी व्यवस्था करावी, असे घैसास गुरुजी यांनी सांगितले.

*** पुणे पॉकेट डायरी**

दिनदर्शन एंटरप्राइजेसच्या पुणे पॉकेट डायरीचे प्रकाशन समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते करण्यात आले. या पॉकेट डायरीमध्ये सहाशे कार्यालयांचे दूरध्वनी क्रमांक आणि अत्यावश्यक माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे फोन करून आपल्याला हव्या असणाऱ्या कार्यालयाची वेळ व पत्ता समजण्यास मदत होईल. त्याचबरोबर रुग्णवाहिका, रक्तपेढी, अग्निशामक दल, वीजमंडळ यांचे क्रमांक या डायरीत आहेत.

एस टी, रेल्वे, विमान, पीएमपीएमएल यांचे वेळापत्रक, रिक्षा टेरिफकार्ड, पर्यटनस्थळे तीर्थक्षेत्रे, अष्टविनायक, थंड हवेची ठिकाणे, किल्ले यांचीही माहिती या डायरीत दिली आहे.

*** 'माझी डायरी' पुस्तकाचे प्रकाशन**

'सकाळ'ने प्रकाशित केलेल्या 'माझी डायरी' पुस्तकाचे प्रकाशन शुभंकर व अवंती देहेडकर या दोन मुलांच्या हस्ते झाले. प्रकाशनाच्या वेळी पुस्तकातील काही मजकूर मुलांनी वाचून दाखविला.

सात ते दहा वर्षे व दहा ते चौदा वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी दोन वेगवेगळी पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत, टाकाऊ वस्तूंपासून तयार करण्यात येणारी विज्ञान खेळणी, शब्दांची गंमत, पाककृती, छंद, प्रकल्प, काल्पनिक विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या डायरीतील पाने, कविता, प्रार्थना, अपघात व धोके टाळण्यासंदर्भातील सूचना, राज्य, राष्ट्र व जागतिक नकाशाचा उपयोग कसा करावा, याची माहिती या पुस्तकामध्ये दिली आहे.

मुलांना टाकाऊ वस्तूंपासून विज्ञानाची खेळणी तयार करण्याची प्रात्यक्षिके अशोक रूपनेर यांनी दाखविली.

*** ग्रंथालयांना दुप्पट अनुदान**

राज्य सरकारकडून ग्रंथालयांना देण्यात येणारी अनुदानाची रक्कम दुप्पट करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे उच्चतंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी दिली.

महात्मा फुले वस्तू संग्रहालयात उभारण्यात आलेल्या ग्रंथालयाचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला आमदार गिरीष बापट, मोहन जोशी, चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, म्हाडाचे अध्यक्ष अंकुश काकडे, महापौर मोहनसिंग राजपाल आदी उपस्थित होते.

राज्य सरकारने ग्रंथालयाची अ ते ड अशा चार गटांमध्ये विभागणी केली आहे. अ श्रेणीतील ग्रंथालयास साडेचार लाख, ब श्रेणीसाठी साडेतीन लाख, क श्रेणीला अडीच लाख आणि ड श्रेणीतील ग्रंथालयास दीड लाख रुपयांचे वार्षिक अनुदान सरकारकडून देण्यात येते. राज्यात २० हजार ग्रंथालये असून त्यांना वर्षाला अनुदानापोटी देण्यात येणारी रक्कम ७० कोटी रुपये आहे. ग्रंथालयाची चळवळ वाढावी म्हणून अनुदानाची रक्कम १४० कोटी रुपयांपर्यंत नेण्यात येणार आहे. देशातील ग्रंथालयांपैकी २० टक्के ग्रंथालये महाराष्ट्रात आहेत.

अलीकडच्या काळात इ-मेल, इंटरनेट, ऑडिओ बुक यामुळे वाचकाची व्याख्या बदलली आहे, त्यामुळे ग्रंथालयांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे असेही त्यांनी नमूद केले.

*** भारतात नवी ७५ चॅनल्स**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने तब्बल दोन वर्षांनंतर ७५ नवीन चॅनल्सना भारतात एन्ट्री दिली आहे. भारतात आत्ताच ६०० चॅनल्समध्ये स्पर्धा आहे. नवीन येणाऱ्या चॅनल्समध्ये डिस्कव्हरी आणि यूटीव्ही कम्युनिकेशन आघाडीवर आहे. डिस्कव्हरी कम्युनिकेशनची ५ तर यूटीव्ही कम्युनिकेशनची ३ चॅनल्स येणार आहेत. डिस्कव्हरी कम्युनिकेशनला किड्‌स, इनव्हेस्टिगेशन, होम ॲन्ड हेल्थ, थ्री डी नेट, मिलिटरी तर यूटीव्ही कम्युनिकेशनला रिजनल आणि कॉमेडी चॅनल्ससाठी परवानगी

दिली आहे.

झी नेटवर्कला एचडीमध्ये २४ बाय ७ होम शॉपिंग तसेच अनेक रिजनल चॅनल्ससाठीही परवानगी मिळाली आहे. फॉक्स नॅट जिओ ॲडव्हेंचर आणि नॅट जिओ वाईल्ड ही दोन चॅनल्स, तर ईएसपीएन चॅनल स्टार क्रिकेट घेऊन येत आहे.

*** बैठकीची लावणी**

संगीत रंगभूमी गाजविलेल्या गायिका-अभिनेत्री कीर्ती शिलेदार रसिकांसाठी राज्याची परंपरा-संस्कृती असलेली बैठकीची लावणी सादर करणार आहेत. शिलेदार म्हणाल्या, ''लावणी ही महाराष्ट्राची ठुमरी आहे. ललित गायनच शास्त्रीय संगीताप्रमाणे केलेले आहे. याचा अभिजात रंग मला अतिशय आवडला. मी १५ वर्षांपूर्वी पंढरपूरला गेले असताना ज्ञानोबा उत्पात यांच्याकडून शास्त्रीय बैठकीची लावणी ऐकली. बैठकीची लावणी तालात मुरलेली असल्यामुळे खूप आवडली. शंकराप्पा मंगळवेढेकर यांच्याकडून मी शिकले. लावणीत लयीचे वेगवेगळे प्रकार आहेत. संथ धुमाळीचा विशिष्ट ठेका असतो. अनाघात शब्द लयीच्या अंगाने जाऊन त्यावर पडतात. त्यांचे सौंदर्य विलक्षण आहे. दोन आवर्तनानंतर सम येते. या समेचे समाधान वेगळे आहे. लोकांसमोर आता फक्त नाचाचीच लावणी येते. त्यामुळे ही बैठकीची लावणी लोकांसमोर यावी या इच्छेतून कार्यक्रम करत आहे. फक्कड ही जलद लयीची लावणी, शब्दांवर जास्त प्रभुत्व असलेली लावणी असे वेगळे प्रकार आहे. शास्त्रीय बैठकीत ख्याल म्हणावा तसा गण हा आहे. शेवटची लावणी आध्यात्मिक वळणाची आहे. ताल, भाव यांचे वैविध्य, शब्द व स्वरप्रधान गायकी असणाऱ्या बैठकीच्या लावणीचा मोठा ठेवा उत्पातांनी जपून ठेवला, हे मोठे कौतुकास्पद आहे.

*** कार्टून मालिकांत 'सुपरहिरो'**

रशियामध्ये पंतप्रधान व्लादिमीर पुतिन यांच्यावरील कार्टून मालिका सध्या लोकप्रिय होत आहे. रशियाचे अध्यक्ष दिमित्री मेदवेदेव हे पुतिन यांचे सहकारी असून या मालिकेत अस्वली कातडीसारखे वस्त्र मेदवेदेव यांनी परिधान केल्याचे दिसून येते.

४८वी आवृत्ती

रुचिरा भाग १

कमलाबाई ओगले

३० वर्षांत अडीच लाख प्रतींच्या खपाचा उच्चांक गाठणारा पाकशास्त्रावरील एकमेव अजोड ग्रंथ रुचिरा! पाककलेचे जणू दुसरे नाव.

१५०रु. पोस्टेज २५रु.

मात्र मार्शल आर्ट सुपर हिरो दाखविण्यात आलेल्या पुतिन यांची वेषभूषा सर्वसामान्यांसारखी आहे. ही मालिका www.superputin.ru या वेबसाईटवर उपलब्ध आहे. या मालिकेसंबंधी अनेक तर्कवितर्क लढविण्यात येत आहेत. ''पुढील वर्षी होत असलेली अध्यक्षपदाची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून प्रचाराचा एक भाग म्हणूनच ही मालिका तयार करण्यात आली आहे. यासाठी अध्यक्षांचे निवासस्थान असलेल्या 'क्रेमलिन'ची मदत आहे,'' असे काही निरीक्षकांचे म्हणणे आहे.

या मालिकेचे कथानक १९९० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'स्पीड' या अमेरिकन ॲक्शन फिल्मशी जुळणारे आहे. त्यामध्ये 'किमोनो' परिधान केलेले पुतिन बसमधील प्रवाशांना बॉंबस्फोटापासून वाचवितात असे दाखवले आहे. 'मी ८० किलोमीटर प्रतितास या वेगाशिवाय खाली येऊ शकत नाही,' असे पुतिन म्हणतात. पुतिन यांनी गाडीचा वेग वाढविला असता मेदवेदेव हे अस्वली वेशात येतात आणि आपला आधुनिक आयपॅड बॉंब निकामी करतात. पुतिन यांना असलेली ज्युदोची आवड आणि मेदवेदेव यांना असलेली टेक्नालॉजीची आवड या मालिकेत दाखवण्यात आली आहे. लेखक सरगेई कॅलेनिक यांनी रशियात सध्याच्या राजकारणात संवादाची गरज असल्याचे सांगितले.

*** बालगंधर्वांनंतर... आता लोकमान्य!**

बालगंधर्वांवरील चित्रपटानंतर आता लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनावरील चित्रपटाची निर्मिती करणार आहोत, असे देसाई यांनी सांगितले.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच,' अशी सिंहगर्जना करीत बलाढ्य ब्रिटिश साम्राज्य हादरवून टाकणाऱ्या लोकमान्यांचे स्वातंत्र्यचळवळीतील योगदान अनन्यसाधारण असेच आहे. विशेषत्वाने, मराठी मनांसाठी लोकमान्यांचे कार्य स्फूर्तिदायी ठरते आहे. देशभक्तीप्रमाणेच लोकमान्यांचा बाणेदारपणा, अभ्यासूवृत्ती हीसुद्धा नवीन पिढीसमोर मांडली जाणे आवश्यक आहे.

या संदर्भात देसाई म्हणाले, 'बालगंधर्वच्या निमित्ताने मराठी चित्रपटाला प्रेक्षकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून या क्षेत्रात अजून काम करण्याची प्रेरणा मिळत आहे. त्यामुळेच आता लोकमान्यांवर आधारित चित्रपटाची निर्मिती करण्याचा मानस आहे.'

यापूर्वीच्या काही चित्रपटांमधून सदाशिव अमरापूरकर यांनी लोकमान्यांची भूमिका केली आहे. बालगंधर्व चित्रपटामध्ये लोकमान्यांच्या छोट्याशा भूमिकेतून खुद्द नितीन देसाई पडद्यावर झळकले आहेत. आता लोकमान्यांच्या मध्यवर्ती भूमिकेसाठी कुणाची निवड होणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

*** 'मुंबई जळाली-भिवंडी का नाही'चे प्रकाशन**

''आपण लिहिलेल्या पुस्तकात प्रशासन व्यवस्था सुधारण्यासाठी अभ्यासपूर्ण

सूचना केलेल्या आहेत. भारतीय पोलिस सेवेतील (आयपीएस) अधिकाऱ्यांना अशा सूचना करण्यासाठी परवानगीची गरज नसते. तरीही आपल्याविरुद्ध कारवाई होणार असेल तर तिला आपण घाबरत नाही. मात्र, यावर प्रतिक्रिया आणि इशारे देणाऱ्या अधिकाऱ्यांनी पुस्तक वाचलेले दिसत नाही. त्यांनी हे पुस्तक नीट वाचावे, म्हणजे माझे प्रयोग व सूचना त्यांना कळू शकतील,'' अशा शब्दांत राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुरेश खोपडे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुनावले.

'मुंबई जळाली-भिवंडी का नाही' या पुस्तक प्रकाशनाच्या वेळचे भाषण आणि पुस्तकातील मजकुरावरून खोपडे सध्या चर्चेत आहेत. पोलिस महासंचालक अजित पारसनीस यांच्यासह अन्य वरिष्ठ व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनीही याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केल्या, त्यानंतर आपली बाजू मांडण्यासाठी खोपडे यांनी पत्रकार परिषद घेऊन पुन्हा प्रशासनाविरुद्ध टीकास्त्र सोडले.

या वेळी खोपडे म्हणाले, ''आयपीएस'च्या नियमानुसार जर अभ्यासपूर्ण संशोधन करून प्रशासनाला काही सूचना करायच्या असतील तर त्यासाठी सरकारच्या परवानगीची गरज नसते. त्यानुसारच आपण २००३ पासून अभ्यास व प्रयोग करून या सूचना करीत आहोत. पंतप्रधानांनीही अधिकाऱ्यांना यासाठी आवाहन केलेले आहे. त्यामुळे आपल्याविरुद्ध कारवाई होऊ शकत नाही. प्रथम पुस्तक वाचावे, त्यातील सूचनांचा अभ्यास करून, त्यातील उपाययोजना राबविता येतील का, याचा विचार करावा. नसेल तर दुसरे उपाय सांगावेत. मात्र, हे सोडून मला निवडणूक लढविण्याचा सल्ला देणे म्हणजे पोरकटपणा आहे. पदोन्नतीद्वारे मी 'आयपीएस' झाल्याने माझा सल्ला मानला जात नाही. 'नो कॉमेंट्स' म्हणून हा विषय सोडून देण्याचा प्रयत्न करणारे जनतेचे संरक्षण कसे करून शकणार? आपल्याला 'सिस्टिम' सोडून जाण्याचा कोणी उपदेश करू नये, कारण जनतेने कररूपाने भरलेल्या पैशातून आपल्याला पगार मिळतो. तो घेऊन आपण जनतेसाठी काम करीत आहोत.''

प्रशासनव्यवस्था कालबाह्य झाल्याचे सांगताना ते म्हणाले, ''केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर देशातील प्रशासनाची अशीच अवस्था झाली आहे. मात्र, आपण महाराष्ट्रातील पोलिस प्रशासनाचा अभ्यास केल्याने तेवढ्यापुरते बोलत आहोत. पोलिस आणि रुग्णवाहिकाचालक यांना वारंवार आघात सहन करावे लागतात. त्यामुळे त्यांच्यात एक प्रकारची बधीरता येते. पोलिस दलातील बहुतांश अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना 'पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिऑर्डर' हा मानसिक विकार जडला असल्याचे दिसते. छळ, हल्ला, बलात्कार, मोठा आघात अगर युद्धातील अनुभवातून ही अवस्था निर्माण होते. त्यामुळे आपले पोलिस प्रशासन संवेदनाहीन झाले आहे. म्हणूनच मुंबईवरील

दहशतवादी हल्ल्यात पोलिसांची दमछाक झाली होती.''

''आपल्या प्रयोगांचे चीनसारख्या देशांत कौतुक झाले. तेथे खास निमंत्रित म्हणून बोलावून अधिकाऱ्यांसमोर आपले व्याख्यान ठेवण्यात आले होते. मात्र, आपल्याच देशात बोलण्यास बंदी घालण्यात येत आहे. मिरजेतील जातीय दंगलीनंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी एका स्वयंसेवी संस्थेने आपल्याला निमंत्रित केले होते. तेव्हा, पोलिस प्रशासनाने आपल्याला तेथे जाऊन बोलण्यास बंदी घातली होती'' असेही खोपडे यांनी सांगितले. १० जूनला खोपडे हे निवृत्त झाले.

*** दिग्दर्शकाची डायरी**

बाबा पाठक यांनी लिहिलेल्या गेल्या ४० वर्षांच्या ४० डायऱ्या 'दिग्दर्शकाची डायरी' या नावाने पुस्तक रूपात प्रसिद्ध होणार आहेत. 'प्रपंच', 'नंदिनी', 'संथ वाहते कृष्णामाई', 'मुक्काम पोस्ट ढेबेवाडी', 'वारसा लक्ष्मीचा', 'स्वयंवर झाले सीतेचे' अशा उत्तमोत्तम चित्रपटांचे दिग्दर्शन बाबांनी केले. त्यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळाले. त्यांची दिग्दर्शनाची दृष्टी सर्वांना ज्ञात व्हावी, यासाठी डायरी स्वरूपात पुस्तकाची मांडणी असून, संदर्भ सूची व टिपांची जोड दिली जाणार आहे.

शुटिंगचे शेड्यूल, गाण्यांचे रेकॉर्डिंग, स्क्रिप्ट रायटिंग, कॅमेरामनचे अनुभव, त्यातील बारकावे आपल्या रोजनिशीत शब्दबद्ध केले आहेत. पटकथेत कोणत्या वेळी कसे व कोणते बदल केले, अभिनेते - अभिनेत्रींचे अनुभव, ग.दि. मा. व सुधीर फडके यांच्या सोबतीने केलेले गाण्यांचे रेकॉर्डिंग, राजा ठाकूर, राजा परांजपे यांच्या आठवणी, बाबांचे वैयक्तिक आयुष्य व दिग्दर्शन असा १९६१ ते २००५ या कालावधीचा धावता पट डायरीतून स्पष्ट होणार आहे.

बाबा पाठक यांच्या प्रत्येक डायरीवर ग.दि. माडगूळकर यांची बाबांना नववर्षाच्या शुभेच्छा देणारी कविता व स्वाक्षरी आहे. डायऱ्यांचे संपादन रविमुकुल करणार आहेत.

*** 'सोशल नेटवर्किंग'**

इंटरनेट किंवा 'सोशल नेटवर्किंग'च्या वापरातून घडणारे अनेक गैरप्रकार कानावर येत असतात; पण अंत:करणात माणुसकीचा ओलावा शिल्लक असेल, तर संवादाची ही माध्यमे विधायक चळवळ म्हणून कशी उभी राहतात, याचे उदाहरण डोंबिवलीत घडले आहे.

डोंबिवलीच्या टिळकनगर शाळेतले माधव करंदीकर १५ वर्षे शिपाई म्हणून नोकरी करून काही दिवसांपूर्वीच निवृत्त झाले. विद्यार्थ्यांत ते 'करंदीकर काका' म्हणून परिचित आहेत. छोट्या बच्चे कंपनीपासून ते शाळा सोडून नोकरी-व्यवसायात स्थिरावलेल्या तरुणांपर्यंत अनेकांशी त्यांचा स्नेह. दोन महिन्यांपूर्वी जिन्यावरून पाय घसरून पडल्याने त्यांच्या दोन्ही पायांची हाडे फ्रॅक्चर झाली. पाठीच्या मणक्यालाही

मार लागला. पायावर शस्त्रक्रियेसाठी दीड लाख रुपये खर्च येणार होता. एवढी रक्कम कशी उभारायची, ही चिंता त्यांना होती. माजी विद्यार्थिनी अनुप्रिया देवरे हिला त्यांच्याविषयी समजले आणि काका आजारी असल्याचे तिने 'फेसबुक'वरून आपल्या मित्रांना कळवले. शाळेचा माजी विद्यार्थी गौरव कुलकर्णी याने 'फेसबुक'वरील अमेय वैद्य, ओंकार नेर्लेकर, प्रथमेश खानोलकर अशा अनेक मित्रांशी संपर्क साधला. त्यांच्या 'कम्युनिटी'ला भरघोस पाठिंबा मिळाला.

टिळकनगर शाळेच्या १९८५ च्या तुकड्यांमधील विद्यार्थ्यांनीही 'फेसबुक'च्या माध्यमातून पैसे उभे केले. स्थानिक नगरसेवक मनोज राजे यांच्याशी संपर्क साधून विभागात आवाहनाचे फलक लावण्यात आले. शेकडो हातांच्या बळातून शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेले दीड लाख रुपये काकांच्या खात्यात जमा झाले. शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली.

*** 'आयटीतील संधी' विषयावर कार्यशाळा**

बीए, बीकॉम, बीएस्ससी, बीसीए, बीबीए आदी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी एक कार्यशाळा घेण्यात आली. मराठा चेंबरच्या माहिती तंत्रज्ञान समितीचे व राज्य सरकारच्या ई-गव्हर्नन्स समितीचे सदस्य अध्यक्ष दीपक शिकारपूर (ई-गव्हर्नन्समधील संधी), इंडिया बिझनेस ॲण्ड स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हजच्या व्यवसाय विभाग प्रमुख सुलक्षणा पाटणकर (बीपीओ व केपीओमध्ये महिलांसाठी संधी), नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरीचे उपाध्यक्ष समीर गुप्ते (करिअर इन ई-फायनान्स), सनगार्ड कंपनीचे संचालक सोमेश चाबलानी (करिअर इन एन्टरप्रायजेस ॲप्लिकेशन्स), एअरटेल कंपनीचे व्यवसाय प्रमुख आशिष मेहरा (करिअर इन टेलिकॉम), दा विंची डिझाईन सोल्यूशन्सचे रवींद्र सिनारे (करिअर इन कॅड-कॅम), एचसीएल लर्निंगचे अमोल वैद्य (करिअर इन हार्डवेअर ॲण्ड नेटवर्किंग), प्रोवा सोल्यूशन्सच्या जुई बोरसे स्नेहल बसाले (करिअर इन सॉफ्टवेअर टेस्टिंग) यांनी मार्गदर्शन केले.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्र देशात सर्वाधिक वेगाने वाढत आहे. या क्षेत्रात आणखी मोठ्या प्रमाणावर संधी आहेत. या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा मराठा चेंबरने

३री आवृत्ती
मराठे शाहीतील मनस्विनी
डॉ. सु.र. देशपांडे
मराठ्यांचा इतिहास उजळून टाकणाऱ्या तेजस्विनी स्त्रिया
१४०रु. पोस्टेज २०रु.

आयोजित केली.

*** पुणे श्रमिक पत्रकार संघ**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी 'सकाळ'चे बातमीदार उमेश घोंगडे यांची, तर सरचिटणीसपदी प्रसाद कुलकर्णी (टाइम्स ऑफ इंडिया) यांची निवड झाली.

निवड झालेल्या अन्य पदाधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष : अजय कांबळे (इंडिया टीव्ही), नम्रता फडणीस (केसरी), खजिनदार : चैतन्य मचाले (प्रभात), चिटणीस : काका शेडगे (सकाळ), राजेंद्र पाटील (सार्वमत). कार्यकारिणी सदस्य : राजेश माने, ऊर्मिला हिरवे (सकाळ), स्वप्नील बापट (साम टीव्ही), गणेश कोरे (अॅग्रोवन), संदीप दौंडकर (इंडियन एक्स्प्रेस), योगीराज प्रभुणे, अभिजित थिटे (महाराष्ट्र टाइम्स), पांडुरंग सांडभोर, सुषमा नेहरकर (पुढारी), पूनम काटे (आज का आनंद) हे विजयी झाले.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अॅड. सुभाष किवडे, विश्राम ढोले, जयश्री ढेपे यांनी काम पाहिले.

*** आइनस्टाइनची 'डार्क एनर्जी' संकल्पना चुकीची नव्हती**

स्वीनबर्ग विद्यापीठातील डॉ. ख्रिस ब्लेक यांच्या नेतृत्वाखालील २६ संशोधकांच्या चमूने तब्बल दोन लाख आकाशगंगांचा अभ्यास करून डार्क एनर्जीबद्दलचे निरीक्षण नोंदविले आहे. या चमूने अँग्लो-ऑस्ट्रेलियन दुर्बिणीच्या साह्याने विश्वातील आकाशगंगांचे चार वर्षे निरीक्षण केले विश्वाच्या प्रसरणाची गती वाढू लागल्याने १९९० च्या दशकात डार्क एनर्जीच्या संकल्पनेवर पुन्हा विचार सुरू झाला.

सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडताना आइनस्टाइनने डार्क एनर्जीची संकल्पना मांडली होती. गुरुत्वीय शक्तीच्या विरोधातील या काल्पनिक शक्तीची संकल्पना म्हणजे एक चूक होती, असे खुद्द आइनस्टाइननेच नंतर म्हटले होते. 'वास्तविक आइनस्टाइनने चूक केलेली नव्हती. या विश्वात खरोखरीच एक वेगळी ऊर्जा आहे आणि ती विश्वाच्या प्रसरणाला कारणीभूत आहे असे आता वाटते आहे,' असे डॉ. ब्लेक यांनी सांगितले. डार्क एनर्जी ही आइनस्टाइन यांच्या गुरुत्वीय सिद्धान्ताची चूक नसून एक वास्तव आहे, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे.

*** समीक्षक आणि युवा साहित्य संमेलन**

साहित्य संमेलनाच्या उत्सवी स्वरूपाला छेद देणारे समीक्षकांचे संमेलन, युवा पिढीला प्रतिनिधीत्व देण्यासाठी युवा संमेलन, दिवाळी अंक... असे साहित्यविषयक उपक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद राबवणार आहेत. याशिवाय, 'मसाप'चा इतिहास माहितीपटाच्या रूपाने जतन केला जाणार असून, 'भारतीय भाषातील स्त्री-वाद' या

विषयावरचा संशोधन प्रकल्प हाती घेतला जाणार आहे.

पुण्यात झालेल्या ८३ व्या साहित्य संमेलनाचा खर्च वजा जाता उर्वरित ८२ लाख रुपयांचा निधी पुण्यभूषण फाउंडेशनने डिसेंबरमध्ये साहित्य परिषदेकडे दिला. त्या निधीच्या व्याजातून हे उपक्रम राबविण्याचा मानस आहे, अशी माहिती परिषदेच्या कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांनी दिली.

*** 'आठवणीतील किशाभाऊ'चे प्रकाशन**

'स्व-रूपवर्धिनी'चे संस्थापक किशाभाऊ पटवर्धन यांच्या आठवणींचे संकलन असलेल्या 'आठवणीतील किशाभाऊ' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द.मा. मिरासदार यांच्या हस्ते झाले. प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे , रमेश जोशी, उदय गुजर, श्रीकांत सामळ आणि कल्याण वर्दे या प्रसंगी उपस्थित होते.

मिरासदार म्हणाले, ''राजा धनराज गिरजी प्रशालेमध्ये किशाभाऊ शिक्षक होते. त्याच काळात दोन वर्षे मीही शिक्षक होतो. किशाभाऊंचे कर्तृत्व मोठे असल्यामुळे त्यांचे चरित्र वाचनीय झाले असते, याविषयी शंका नाही; पण त्यापेक्षाही या आठवणींचे संकलन हे अधिक प्रभावी आणि परिणामकारक आहे. आपले कार्य सुरू असताना दुसऱ्याच्या चांगल्या कार्यासाठी पैसे गोळा करण्याचे किशाभाऊंचे काम हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. सेवाकार्यामध्ये भेदभाव नाही ही संघाची शिकवण त्यांनी आचरणात आणली.''

देशपांडे म्हणाले, ''स्वच्छ आणि पारदर्शी व्यक्तिमत्त्वाच्या किशाभाऊंचा अनौपचारिकपणा ही सर्वांना भावणारी गोष्ट होती. कार्यकर्त्यांना कृतिप्रवण करण्याची प्रेरणा त्यांच्यामध्ये होती.निवृत्तीनंतर 'स्व-रूपवर्धिनी'ची स्थापना करून किशाभाऊंनी सार्वजनिक कार्य जोरात सुरू केले.''

*** 'निसर्ग मार्गदर्शक'**

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने 'निसर्ग मार्गदर्शक' हे विशेष पर्यावरण पुस्तक तयार केले आहे. महाराष्ट्रातील सर्व शाळा-महाविद्यालयांत हे पुस्तक मोफत वाटण्यात येणार आहे. पर्यावरण अभ्यास आकर्षक पद्धतीने मांडणारे हे पुस्तक मराठी आणि इंग्रजी भाषेत असून सर दोराबजी टाटा ट्रस्ट (इंग्रजी आवृत्ती) व मुंबई महानगर प्रदेश पर्यावरण सुधार संस्था (मराठी आवृत्ती) यांच्या सहयोगाने प्रकाशित करण्यात आले आहे.

वन्यप्राणी व वनस्पतींविषयी महत्त्वाची व मनोरंजक माहिती, भारतातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये, तेथील कायदे, आपल्याकडील संकटग्रस्त प्राणी व वनस्पती, वन्यप्राणी आणि वनस्पतींचा बेकायदेशीर व्यापार, तो थांबवण्याचे मार्ग, सध्या भेडसावत असलेल्या पर्यावरण समस्या, निसर्गाजवळ जाण्याचे विविध मार्ग यांची

माहिती दिलेली आहे. शाळा, महाविद्यालये, वाचनालये यांनी cecbnhs@gmail.com या इमेलवर अथवा ९५९४९५३४२५/ ९५९४९२९१०७ वर संपर्क साधावा.

*** 'नामदेवमहाराज संमेलन'**

संत नामदेवमहाराज यांच्या ६६१ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त परदेशातील पहिले 'विश्‍व संत नामदेवमहाराज संमेलन २०११' दि. ७ ते १४ जुलै २०११ दरम्यान सिंगापूरला आयोजित करण्यात आले आहे. बहुभाषिक शिंपी महासंघातर्फे हे संमेलन होणार आहे.

त्याच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ संतसाहित्य अभ्यासक पद्मश्री डॉ. यू.म.पठाण व स्वागताध्यक्षपदी उत्तमराव मांढरे यांची निवड झाली आहे. संमेलनात डॉ. यू.म.पठाण यांचे 'विश्‍व भक्तिसाहित्यात नामदेवांचे योगदान' या विषयावर व्याख्यान होणार आहे. संमेलनासाठी स्वागत समिती नेमली असून, सहकार्यवाह म्हणून कोल्हापूरचे ज्ञानेश्‍वर भस्मे यांची निवड करण्यात आली. समितीचे इतर पदाधिकारी असे : वैशाली मांढरे-पुणे, अनंतराव वायचळ - कोल्हापूर, पुरुषोत्तम मुळे-कोकण, रवींद्र कालेकर-कल्याण, डॉ. पाथरकर-मूर्तिजापूर विदर्भ, प्रेमनाथ लोळगे-हुबळी-कर्नाटक, एन. के. गेहलोत-नागूर, कमल छिप्पा- जयपूर, चन्दू नामदेव-म.प्र.जबलपूर- गिरीश वर्मा-छत्तीसगढ, ज्वालाप्रसाद नामदेव- बिलासपूर.

*** 'ऑक्सफर्ड'चा नवा शब्दकोश**

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसची निर्मिती असलेल्या व डॉ. धोंडगे यांनी संपादित केलेल्या 'इंग्लिश-इंग्लिश-मराठी' या शब्दकोशाचे प्रकाशन ६ जून रोजी दिल्ली व मुंबई येथे करण्यात आले. सहाशे पानांमध्ये तब्बल ५२ हजार शब्दांचा खजिना सामावलेला आहे. इंग्रजी भाषेत आता जुने वाटणारे काही शब्दही या शब्दकोशामध्ये आले आहेत. मूळ इंग्लिश शब्द, त्याचा अमेरिकी व ब्रिटिश उच्चार, त्याचा मराठी अर्थ, त्याचा वाक्यातील उपयोग, त्याला समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द अशा अनेक सुविधा या शब्दकोशात असल्याचे डॉ. धोंगडे यांनी स्पष्ट केले. या कोशातील शब्दांची निवड कोशशास्त्राच्या तसेच ऑक्सफर्डकडे असलेल्या शब्दसाठ्याच्या (डेटा) आधारे केली आहे, असेही ते म्हणाले.

'ओयूपी'ने (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस) १९९५ साली पहिला शब्दकोश प्रकाशित केला. आजपर्यंत त्याच्या दहा आवृत्त्या निघाल्या, या शब्दकोशाचा वापर विशिष्ट पातळीपर्यंत इंग्रजी येणाऱ्यांसाठी होत होता. तथापि, प्रगत किंवा विस्तृत इंग्रजी शिकणाऱ्यांसाठी नव्या शब्दकोशाची गरज होती. त्यातूनच या नव्या शब्दकोशाची संकल्पना पुढे आली.

शब्दकोश कसा पाहावा याचे मार्गदर्शनही या कोशात करण्यात आले आहे. शब्दाची माहिती देताना क्रियापद, विशेषण, क्रियाविशेषण याचा उल्लेख करण्यात आला आहे. केवळ तेवढेच न देता कोश पाहणाराला या संज्ञांचा अर्थही कळावा, यासाठी इंग्रजीचे मूळ व्याकरण देण्यात आले आहे. एखाद्या शब्दाचा अर्थ हवा असल्यास त्या शब्दाशी संबंधित अन्य शब्दांची माहिती गुगलप्रमाणे तसेच मूळ शब्दाशी त्याची लिंक देण्यात आली आहे.

शब्दकोशात दोनशे ते अडीचशे रेखाचित्रे आहेत. बायसिकल या शब्दाचा अर्थ देताना सायकलचे चित्र काढून तिच्या सर्व भागांची नावे व माहिती देण्यात आली आहे. यामुळे काही शब्दांच्या बाबतीत शब्दकोशाचा उपयोग विश्वकोशासारखा करता येणे शक्य होईल.

*** 'जाणीव'चे प्रकाशन**

"चित्रपट तयार करणे हे येऱ्यागबाळ्याचे काम नाही, त्यासाठी कलात्मक दृष्टीची गरज असते. चित्रपट हे विलक्षण ताकदीचे माध्यम आहे". असे विचार ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केले.

विश्वास रांजणे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'जाणीव' लघुपटाच्या सीडीचे प्रकाशन डॉ. लागू यांच्या हस्ते झाले. डॉ. लागू म्हणाले, रंगभूमीपेक्षा चित्रपट हे माध्यम अगदी वेगळे आहे. कॅमेरा आहे म्हणून चित्रपट केला, तर तो या माध्यमावर अन्याय होईल. या क्षेत्रात तंत्र, मंत्र समजून घेत कलात्मक पातळीवर अनुभव घेऊनच त्याची मांडणी प्रेक्षकांसमोर झाली पाहिजे. त्यातून या कलेचा आब राखला गेला पाहिजे. निर्माता दिग्दर्शक यांनी चित्रपट करायला शिकले पाहिजे. त्यानुसार प्रेक्षकांनी चित्रपट पाहायलाही शिकले पाहिजे. त्यातून या क्षेत्राला एका उंचीपर्यंत नेण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

*** रवींद्रनाथ टागोर यांच्या नावे आंतरराष्ट्रीय पुरस्कार**

साहित्यातील नोबल पुरस्कार मिळविणारे पहिले भारतीय रवींद्रनाथ टागोर यांच्या नावे दीड कोटी रुपयांचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार देण्याची घोषणा पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी केली.

कर्मचारी

११वी आवृत्ती

वपु काळे

आपलीतुपली म्हणजे आपल्यासारख्याच मध्यमवयीन, मध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांची ही कथा पण वपु स्टाईलीत

१३०रु. पोस्टेज २५रु.

टागोर यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या पुरस्कार समितीचे अध्यक्ष पंतप्रधान असतील. आंतरराष्ट्रीय बंधुभावासाठी कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला तिच्या असामान्य सामाजिक कार्याचा गौरव म्हणून या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

रवींद्रनाथ टागोर यांनी मांडलेल्या 'विश्वभारती' कल्पनेचे पुनरुज्जीवन करायला हवे असे मनमोहन सिंग यांनी नमूद केले.

*** द लास्ट मॅन इन टॉवर**

बुकर पुरस्कार विजेते अरविंद अडिगा यांची मुंबईतील टॉवर्सच्या पार्श्वभूमीवरील 'द लास्ट मॅन इन टॉवर' ही दुसरी कादंबरी हार्पर कॉलिन्सतर्फे या ३० जूनला प्रकाशित झाली. ही कथा आहे विमानतळ आणि झोपडपट्टीलगतच्या 'विश्राम को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी'तल्या मध्यमवर्गीय मुंबईकरांची. धर्मेश शहा बिल्डरचा या जागेवर डोळा असतो. एक अलिशान टॉवर उभारण्यासाठी ही जागा त्याला हवी असते. त्यासाठी तो तेथील रहिवाशांना रग्गड पैशांची ऑफरही देतो.

या सोसायटीतले कित्येकजण वयस्क असतात. काहीजणांना या वयात आणि इतक्या वर्षांच्या सवयीची ही जागा सोडायची नसते. तर काहीजण त्या ऑफरला भुलून ती सोडायला तयार होतात. पण जोवर सर्वजण जागा सोडायला तयार होत नाहीत तोवर ही ऑफर प्रत्यक्षात येणार नसते. एकेकाळी एकमेकांना आधार देणाऱ्या या इमारतीतील रहिवाशांमध्ये पैशावरून मतभेद होतात. इमारतीच्या पुनर्विकासाला विरोध करणारे हळूहळू शहाच्या बाजूला वळतात. एकच माणूस ठामपणे विरोधात असतो. तो म्हणजे मास्टरजी. शिक्षक असलेल्या मास्टरजीबाबत एकेकाळी प्रत्येकाच्याच मनात आदर असतो पण आता प्रत्येकालाच तो काट्यासारखा सलू लागतो. हा काटा दूर केल्याशिवाय ऑफर प्रत्यक्षात येणार नसते... मुंबईतील बिल्डरशाही आणि पुनर्विकासापायी विस्थापित होणारा आम आदमी हा कादंबरीचा विषय असल्याने या कादंबरीबाबत उत्सुकता आहे. हार्पर कॉलिन्सच्या वितरण व विक्री विभागाच्या लिपिका भूषण यांनी सांगितले की, या कादंबरीचा प्रचार विविध माध्यमांतून करण्यात येत आहे.

गेल्या वर्षी अडिगा यांच्या 'व्हाईट टायगर' या कादंबरीला बुकर पुरस्कार मिळाला होता. ही कादंबरी अद्याप मुंबईतील पुस्तक बाजारात 'बेस्टसेलर' आहे.

*** माहितीच्या अधिकारामुळे शासकीय कारभारात पारदर्शकता**

माहितीच्या अधिकारामुळे शासकीय कारभारात पारदर्शकता आली आहे. या कायद्याचा वापर का व कसा करायचा याबाबत माहिती अधिकार चळवळीतील संस्थांनी नागरिकांचे प्रबोधन करावे, अशी अपेक्षा पुणे खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांनी व्यक्त केली.

शासनाच्या कारभाराची माहिती सामान्य माणसाला मिळावी यासाठी माहितीच्या अधिकाराचा कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे अनेक गोष्टी समोर आल्या. शासकीय विभागांमध्ये यामुळे पारदर्शकता आली. शासकीय कर्मचारी, अधिकारी यांच्या कामातदेखील फरक जाणवू लागला. पण या कायद्याविषयीची योग्य माहिती अजूनही सर्वदूर पोचलेली नसून नागरिकांकडून या कायद्याचा वापर अजूनही फारसा होत नाही.

या कायद्याचा गैरवापर करणारे देखील अनेक लोक आहेत. त्यांना शिक्षा करण्याची तरतूदही करायला हवी. या कायद्याचा वापर प्रभावीपणे करायचा असल्यास काही नियम करण्याची आवश्यकता आहे. एका वेळी एक व्यक्ती अनेक अर्ज करून विविध प्रकारची माहिती मागते. त्यामुळे पेंडन्सीचे प्रमाण वाढते. अनेक वेळा ही माहिती देण्यासारखी नसते.

वर्तमानपत्रांचा सनसनाटी असणाऱ्या बातम्या प्रसिद्ध करण्यावर भर असतो. त्यामुळे काही वेळा माहितीच्या अधिकारामध्ये मिळवलेल्या माहितीची शहानिशा न करता बातमी दिली जाते. त्यामुळे चुकीच्या लोकांना प्रसिद्धी मिळते. याबाबतचे भान माध्यमांनी बाळगणे आवश्यक आहे.

*** 'लायन' व आयक्लाऊड'**

सॅन फ्रॅन्सिस्को येथे ॲपल वर्ल्डवाईड डेव्हलपर्स कॉन्फरन्समध्ये स्टीव्ह जॉब्ज यांनी 'लायन' ऑपरेटिंग सिस्टीम व 'आयक्लाऊड' सुविधेची घोषणा केली.

आजारपणानंतर प्रथमच दाखल झालेल्या स्टीव्ह जॉब्ज यांनी नवीन तंत्रज्ञान जगताला हा आणखी एक धक्का दिला आहे. लायन म्हणजेच 'मॅक ओएस एक ०.७' ही ऑपरेटिंग सिस्टीम मॅक ॲप स्टोअरमध्ये ३० डॉलरला विकत मिळणार आहे. ते म्हणाले की, जर हार्डवेअर हा मेंदू असेल तर सॉफ्टवेअर हा त्याचा आत्मा आहे.

जॉब्जनी लायन ऑपरेटिंग सिस्टीमची दहा वैशिष्ट्ये सांगितली. लायनची किंमत कमी ठेवल्याने महसुलावर परिणाम होणार नाही. ॲटोमेटिक डॉक्युमेंट सेव्ह व मल्टीयुजर स्क्रीन तसेच इतर अनेक वैशिष्ट्ये त्यात आहेत.

या वेळी आय क्लाऊड सेवेची घोषणाही करण्यात आली. त्यात आयओएस ५ ची सर्व वैशिष्ट्ये अंतर्भूत आहेत.

*** 'ऑनलाइन शॉपिंग'**

इंटरनेट व ब्रॉडबँड सेवांचा विस्तार होत असल्यामुळे भारतातील 'ऑनलाइन शॉपिंग मार्केट' ची उलाढाल दोन वर्षांत १,५०० कोटी रुपयांपर्यंत जाईल. 'ऑनलाइन शॉपिंग' मध्ये वस्तू किंवा सेवा इंटरनेटच्या माध्यमातून 'ऑनलाइन' थेट खरेदी करता

येतात. हा खरेदीचा व्यवहार तात्काळ (रियल टाइम) होतो आणि त्यासाठी कोणा मध्यस्थ, दलाल वा व्यापाऱ्याची गरज पडत नाही. 'ऑनलाइन शॉपिंग'लाच 'ई-कॉमर्स' असेही म्हणतात.

'ट्रेड्स डॉट इन' ही 'आयबिबो'ची उपकंपनी असून, ऑनलाइन शॉपिंग सेग्मेंटची उलाढाल दोन वर्षांत उलाढाल १५०० कोटी रुपयांच्या वर नेण्याचे लक्ष्य आहे.

*** जैवविविधतेच्या जागृतीसाठी लेखन**

अतिशय सुंदर दिसणारी आर्किड्सची फुले फक्त मान्सूनच्याच काळात फुलतात. या फुलांविषयी लोकांना माहिती नाही. त्यांच्या विविध प्रकारांची ओळख लोकांना व्हावी, जैवविविधतेविषयी जनजागृती होऊन दुर्मीळ प्राणी, पक्षी यांचे रक्षण व्हावे, असे पर्यावरणवादी लेखक डॉ. सतीश पांडे यांनी पॉप्युलर बुक हाऊसच्या मान्सून सेलच्या उद्घाटनप्रसंगी सांगितले.

'वाईल्ड आर्किड्स ऑफ नॉर्दर्न वेस्टर्न घाट' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. तोताली यांच्या हस्ते तर, 'बर्डस ऑफ लोणावळा खंडाळा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. हेमंत घाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

*** 'बालभारती'ची पाठ्यपुस्तके**

चालू वर्षासाठी पहिली ते आठवीच्या १० कोटी ५४ लाख पुस्तकांची आणि नववी ते बारावीच्या २ कोटी ७ लाख पुस्तकांची छपाई करण्यात आली. यातली बरीचशी पुस्तके १ एप्रिलपासून बाजारात उपलब्ध झाली होती. पहिली ते आठवीपर्यंतच्या पुस्तकांमध्ये यंदा कोणतीही दरवाढ झालेली नाही.

*** 'मोबाईल'च्या अतिवापराने कर्करोग**

तास न् तास मोबाईलवर बोलणाऱ्यांनो, सावधान! मोबाईलमधून उत्सर्जित होणाऱ्या लहरींमुळे कर्करोग होण्याची शक्यता असल्याचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे.

मोबाईलचा अतिवापर आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने सातत्याने मोबाईलचा वापर करणाऱ्यांनी 'हॅण्ड्स फ्री डिव्हाइस'चा वापर केल्यास काहीअंशी हा धोका कमी होतो. कर्करोग होण्याची शक्यता असलेल्या उपकरणांमध्ये मोबाईल हँडसेटचा समावेश जागतिक आरोग्य संघटनेने केला आहे. जगात पाच अब्जांपेक्षा जास्त नागरिक मोबाईल फोनचा वापर करतात.

*** जागतिक कलाकार दिन**

प्रेक्षकांनी खचाखच भरलेले प्रेक्षागृह, १८राज्यांमधून आलेल्या कलाकारांच्या

चेहऱ्यावरून ओसंडून वाहणारा उत्साह, पारितोषिकांची उत्कंठा आणि शेवटी पारितोषिके जाहीर झाल्यावर झालेला जल्लोष यामुळे जागतिक कलाकार दिनाच्या दिवशी टिळक स्मारक मंदिर दणाणून गेले.

अखिल भारतीय सांस्कृतिक संघ आयोजित 'नॅशनल हार्मनी २०११' या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात नाट्य, नृत्य, गायन, वादन स्पर्धेतील विजेत्या कलाकारांना माकिनो आणि अमृता सुभाष यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

अमृता सुभाष म्हणाल्या, ''कलेला कोणताच धर्म नसतो. भाषा आणि धर्माच्या पलीकडे कलेचे स्थान असून तिची भाषा सर्वांना समजणारी असते. कलाकार म्हणजे देशाचे भविष्य. कोणत्याही कलेचा माणसाच्या मनावर चांगला परिणाम होत असतो.''

यावेळी अंबिली सुरेंद्रनाथ, हेमंत बोडे, सुप्रिया धाईंजे, दत्ता सकट, सुश्मिता बॅनर्जी, शिल्पा दानवे यांना नृत्यसाधना पुरस्कार, विजया काळे, अशोक वैद्य यांना कलानेतृत्व पुरस्कार तर के. आदर्श व शोभा पारिखी यांना कलासाधना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

*** मराठी शाळेतही आता 'ई-लर्निंग**

सहकारनगर येथील 'राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल'च्या धर्तीवर मराठी माध्यमाच्या शाळेतही ई-लर्निंग योजना सुरू करण्याचा विचार महापालिकेने केला आहे. पहिल्या टप्प्यात पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ही शाळा सुरू करण्यात येणार आहे.

*** महसूल खाते लवकरच ऑनलाइन**

महसूल विभागाचे कामकाज ऑनलाइन करण्यात येणार असल्याचे राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या ६४ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सांगितले.

३री आवृत्ती

केल्याने होत आहे रे!

संजीव परळीकर

स्वत:चे नशीब घडवणारे शिल्पकार झाल्यावर भाग्य उजाडणारच!
अनुभवांतून स्फुरलेले यशाचे तंत्र आणि सुखाचा मंत्र....

८०रु. पोस्टेज २०रु.

थोरात म्हणाले, 'महसूल विभागातील दिरंगाईमुळे नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागतात. महसूल विभागातील कामे वेळेत करण्यासाठी ऑनलाइनचा वापर केला जाईल'.

*** पुण्यातील शिक्षणक्षेत्र वेबसाइटवर**

'रोटी, कपडा, मकान आणि बँडविड्थ'च्या जमान्यात विद्यार्थी आणि पालकांनी इंटरनेटसारख्या माहितीच्या स्रोताचा वापर करून घेणे आवश्यक असल्याचे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर यांनी व्यक्त केले. शैक्षणिक संस्था आणि शिक्षणक्षेत्राशी निगडीत महत्त्वाच्या बाबींची माहिती www.educationpuneinfo.com या वेबसाईटवर आता मिळू शकेल. वेबसाईटचे व्यवस्थापकीय संचालक गणेश सातपुते, वेबसाईटचे निर्माते रुपेश कोतवाल, स्वप्नील नहार यावेळी उपस्थित होते.

डॉ. शेवगावकर म्हणाले, 'आपल्याकडे इंटरनेट कनेक्टिव्हिटीचे प्रमाण वाढत आहे. परंतु अजूनही 'डिजिटली इलाईट' आणि 'डिजिटली नॉन-इलाईट' असा फरक आपल्याकडे आहे. इंटरनेटचा अधिकाधिक प्रसार आणि वापर करण्याची संधी सगळ्यांना उपलब्ध झाल्यास डिजिटली इलाईट समाजाचे प्रमाण वाढीस लागू शकते. सातपुते म्हणाले, 'कॉलेज ॲडमिशनच्या काळात शहरात राज्यभरातूनच नव्हे तर परदेशातूनही अनेक विद्यार्थी पुण्यात दाखल होतात. अशा वेळी त्यांना हव्या असणाऱ्या शैक्षणिक अभ्यासक्रमांची विश्वासार्ह माहिती त्यांच्यापर्यंत पोचावी, म्हणून ही वेबसाईट तयार करण्यात आली आहे.

*** स्पेनमध्ये 'सिंधूताई' सर्वोत्कृष्ट !**

पटकथेसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळवल्यानंतर 'मी सिंधूताई सपकाळ' या मराठी सिनेमाने आपला झेंडा परदेशातही रोवला आहे. स्पेनमध्ये झालेल्या दहाव्या 'इमॅजिन इंडिया' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या सिनेमाने दोन पुरस्कार पटकावले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा बहुमान तेजस्विनी पंडित हिला या सिनेमातील मुख्य भूमिकेसाठी मिळाला, तर सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या गटात हा सिनेमा 'रनर अप' ठरला.

सिनेमाचे दिग्दर्शक अनंत महादेवन म्हणाले, 'या सिनेमाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुक होणे आणि पुरस्कार मिळणे ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. ऑस्ट्रेलियातील एशिया फिल्म फेस्टिव्हलमध्येही हा सिनेमा नावाजण्यात आला होता. तेजस्विनीला मानांकनही मिळाले होते. हा पुरस्कार आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे.'

*** 'भक्तीमधील वैविधता हे संस्कृतीचे भूषण'**

वैदिक परंपरेमध्ये परमेश्वराच्या निर्गुण आणि सगुण भक्तीचे महत्त्व सांगितले आहे. मात्र, या दोन्हींमध्ये बुद्धिवादातून संभ्रम निर्माण करण्यात आला. प्रत्यक्षात

निर्गुण आणि सगुण भक्तीमधील विविधता हे हिंदू संस्कृतीचे भूषणच आहे, असे मत प्रवचनकार चैतन्यमहाराज देगलूरकर यांनी व्यक्त केले.

स्नेहल प्रकाशनच्या मुकुंद दातार लिखित 'वारकरी विश्व आणि समर्थ रामदास' या पुस्तकाचे प्रकाशन देगलूरकर यांच्या हस्ते झाले. प्रा प्रभाकर पुजारी, प्रकाशक रवींद्र घाटपांडे यावेळी उपस्थित होते.

देगलूरकर म्हणाले, संत रामदास आणि संत तुकाराम समकालीन होते. ज्ञानमार्गाने परमेश्वराची निर्गुण भक्ती करता येते. वैदिक परंपरेत सगुण आणि निर्गुण भक्तीला सारखेच महत्त्व आहे. मात्र बुद्धिवादातून यामध्ये मतभेद निर्माण झाले. भक्तीच्या प्रकारापेक्षा करणाऱ्याच्या भावनेला अधिक महत्त्व आहे. भक्तीमधील विविधता ही संस्कृतीला भूषणावह आहे. प्रा. पुजारी म्हणाले, सर्व संत साहित्याचे मूळ वेदांमध्ये आहे. वेदकाळापासून आलेल्या विचारांची परंपरा आजही खंडित झालेली नाही. संत रामदासांनी दिलेला 'महाराष्ट्र धर्म वाढवावा' हा विचार वैदिक परंपरेचा भाग आहे. ❐

टी बुक क्लब २० मधील पहिले पुस्तक प्रकाशित

पुस्तकाचे नाव	लेखक	अनुवाद	किंमत
स्क्रीम फॉर मी	करेन रोझ	दीपक कुळकर्णी	४८०

टी बुक क्लब २० मधून प्रकाशित होणारी अन्य पुस्तके

पुस्तकाचे नाव	लेखक	अनुवाद
अल्टिमेटम	मॅथ्यू ग्लास	सुदर्शन आठवले
द प्रिझनर्स ऑफ बर्थ	जेफ्री आर्चर	लीना सोहोनी
द लास्ट ज्यूरर	जॉन ग्रिशॅम	विभाकर शेंडे
ब्लड मनी	क्रिस कॉलेट	वैशाली रानडे
क्रिटिकल	रॉबिन कुक	डॉ. प्रमोद जोगळेकर

वाचकांनी आपली सभासद फी (५०रु.) डी.डी. अथवा मनीऑर्डरने मेहता पब्लिशिंग हाऊस येथे पाठवावी.

एक दृष्टिक्षेप.....

राजन गवस यांनी रंगवलेले गावगाड्याचं वास्तव

राजन गवस हे ऐंशीच्या दशकानंतरचे मराठीतील एक महत्त्वाचे लेखक. कथा, कादंबरी, ललित गद्य, कविता आदी वाङ्मयप्रकार हाताळत त्यांनी ग्रामीण वास्तवाचं यथार्थ चित्रण केले आहे.

गवस यांच्या साहित्यातून प्रकट होणारे ग्रामीण जीवनाचे व वास्तवाचे विविध पैलू वाचकांच्या जाणिवा समृद्ध करतात.

विशेषत: साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित त्यांची तणकट ही कादंबरी वाचताना हे प्रकर्षाने जाणवते. कादंबरीने समग्रतेची आस धरावीच. उंचावरून आसमंत न्याहाळावा तशी मानवी जगण्याची समग्रता कादंबरीने कवेत घ्यावी आणि मधूनमधून जमिनीवर झेपावावं तसं विशिष्टाचं बारकाव्यांसकट दर्शन असावं आणि घारीच्या अचूक नजरेची तीक्ष्णता असावी तशी काव्यात्मतेची डूब असतेच कादंबरीत कुठे कुठे. तणकट वाचताना याचा प्रत्यय येतो. कादंबरीत कथा आणि कविता असते ती अशी. एका माणसाचं, एका गावाचं, जातीचं म्हणता म्हणता मूलभूत मानवी वृत्ती-प्रवृत्तींचं दर्शन घडवते ही कादंबरी; पण त्यात सातत्यानं जाणवतं ते उंचावरून टिपलेलं समग्रतेचं दृश्य. आणि दुसरीकडे रिवणावायली मुंगीसारख्या कथेत गवस कुणा एका जगावेगळं जगू पाहणाऱ्या मुलीचं क्लोज-अप मधलं चित्र रेखाटतात, घारीने जमिनीवर झेप घ्यावी तसं... अगदी बारकाव्यांसकट. पण त्यात समग्रता नसते. तशी अपेक्षाही नसते आणि आसही नसते. ही एक चांगली कथा आहे.

वाङ्मयीन अभिव्यक्तीच्या कथा आणि कादंबरी अशा वेगळ्याच माध्यमांवर उत्तम पकड असणारे राजन गवस यांच्यासारखे लेखक विरळ. तणकट ही एकट्या कबीर कांबळेची कहाणी म्हणून लिहिली असती तर ती ताण ताण ताणलेली कथाच झाली असती. पण राजन गवस समग्रतेचं भान विसरत नाहीत आणि तणकट ही एक समग्र कादंबरी होते. त्यात कबीर कांबळेही निमित्तमात्र (उदाहरणार्थ?) असतो आणि

बाळासाहेब शेडबाळेही निमित्तमात्र असतो. गौतमदेखील तसाच आणि आक्काबा राणेही तसाच निमित्तमात्र. ही दोन-चार नावंही केवळ उदाहरणादाखल घेतली. कारण तणकटमध्ये फार मोठ्या संख्येनं पात्रं आहेत. सगळीच उदाहरणार्थ आहेत. तरीही जे सांगायचं ते मात्र गवस यांना पक्कं माहीत आहे. ते तसंच वाचकापर्यंत पोचतं हे राजन गवस यांचं यश.

राजन गवस यांनी साधारण ऐंशीच्या दशकात लिहायला सुरुवात केली. कविता, कथा, कादंबरी आणि ललित लेखन अशा मार्गावरून त्यांची लेखणी चालत राहिली.

या साऱ्याच लेखनात राजन गवस यांच्या लेखनाचे तीन पैलू प्रामुख्यानं नजरेत भरतात.

विश्ववात्सल्य आणि कारुण्यानं भरलेली आणि भारलेली त्यांची 'दृष्टी';

निर्णयच नव्हे तर मतही न देता वास्तवाच्या तटस्थ पण कलात्मक दर्शनानं वाचकावर दाखवलेला विश्वास ;

आणि तिसरं म्हणजे कृषिप्रधान जगण्याकडे एकाच वेळी आतून येणाऱ्या जाणिवेने आणि दूरस्थ तटस्थपणे (क्वचित्प्रसंगी आत्मटीकेनेदेखील) पाहण्याची क्षमता.

या तीन पैलूंमध्ये उपजतच अंतर्विरोध आहेत, ताण आहेत; पण ते संतुलित करणं हेच राजन गवस यांचं कौशल्य आहे.

अजून एक अंतर्विरोध म्हणजे कधी राजन गवस यांचा नायक किवा निवेदक कृषिसंस्कृतीचं प्रतिनिधित्व करतो, तर कधी त्या संस्कृतीपासून दूर गेलेल्या, अपराधगंड बाळगणाऱ्या व्यक्तींचं प्रतिनिधित्व करतो. या दोन्ही भूमिका कित्येकदा एकमेकांविरुद्ध उभ्या असतात, पण गवस यातही आपलं निर्णायक मत लादत नाहीत हे विशेष.

राजन गवस यांनी प्रामुख्याने तीन-चार विषयांवर लिहिलं आहे.

सर्वप्रथम म्हणजे देवदासी आणि जोगते या अनिष्ट रूढींच्या भयावह वास्तवाचं चित्रण. चौंडकं, भंडारभोग या कादंबऱ्या आणि खांडुक, हुंदका यासारख्या कथांमधून ते प्रगटतं.

दुसरा विषय म्हणजे पंचायती, सोसायट्या वगैरेमधलं गावपातळीवर चालणारं राजकारण आणि त्याला असलेली जातीयतेची डूब. धिंगाणा, कळप, तणकट या कादंबऱ्या आणि ठराव, नवाचं तीन चतुर्थांश वगैरे कथांतून हे चित्रण प्रभावीपणे आलं आहे. एकूणच गावगाड्याचं प्रभावी चित्रण इथे दिसतं.

तिसरं म्हणजे ग्रामजीवनापासून दुरावलेल्या सुशिक्षित माणसांचा अपराधगंड हे आशयसूत्र त्यांच्या अनेक कथांचा विषय झालं आहे, आणि याचबरोबर आत्मनिर्भर होऊ पाहणारी स्त्री हाही त्यांच्या अनेक कथांचा विषय आहे. रिवणावायली मुंगी, तळ,

घुसमट अशा अनेक कथा स्त्रीकेंद्री आशय व्यक्त करतात. एकूणच, हरवत चाललेली मूल्यं, निसर्ग आणि माणूसपण हे त्यांच्या ललित लेखनाचे विषय आहेत. बाईचं जगणं मात्र नेहमीच त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी आहे.

अलीकडेच लोकवाङ्मयगृहाने काही लेखकांचं निवडक साहित्य प्रसिद्ध केलं आहे. त्या मालिकेत राजन गवस यांचं कथात्म आणि ललित साहित्य 'डव्ह आणि लख्ख ऊन' या नावानं प्रसिद्ध झालं आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत रणधीर शिंदे यांनी राजन गवस यांच्या एकंदर लेखनाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत:

समकालीन कथेतले त्यांचे वेगळेपण म्हणजे त्यांच्या कथेतून संपूर्ण गावाचे भान प्रगट होते. गावाचा म्हणून एक संवेदनस्वभाव असतो, तो या जीवनदृष्टीतून साकारला आहे. कृषिसंस्कृतीतील विविधतेचे संबंध, समूहमानस, नवे सत्तासंबंध, जातीयतेची उतरंड याबद्दलचा जीवनार्थ ही कथा व्यक्त करते. गेल्या तीनेक दशकांतला महाराष्ट्रातील गावगाड्याचा बदलता अवकाश ही कथा चित्रित करते.

राजन गवस यांच्या मूल्यभावाबद्दल रणधीर शिंदे म्हणतात- कृषिसंस्कृतीतील एकसंध जीवनाला व चांगुलपणाच्या गोष्टींना ही जीवनदृष्टी आस्था दर्शवते, तर नव्या शहरी उपयोगितावादी भौतिकतेला अग्रक्रम देणाऱ्या व माणूसपणा नाकारणाऱ्या त्यातील अभावपूर्ण संबंधाबद्दल ही कथा विरोध दर्शवते.

भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये आणि रंगनाथ पठारे यांच्या साहित्याचा राजन गवस यांनी बारकाईनं अभ्यास करून समीक्षात्मक लेखन-संपादन केलं आहे. गवस यांच्या मांडणीवर आणि अभिव्यक्तीवर कळत-नकळतपणे या साहित्यिकांचा प्रभाव पडलेला दिसतोच. चौंडकं आणि भंडारभोग या सुरुवातीच्या कादंबऱ्यांनंतरच्या लेखनाबाबत हे विशेष जाणवतं. धिंगाणा कादंबरीतलं पहिलं वाक्य 'आमचा बाप मला उपकाराखातर जेवाय घालतो हा त्याचा समज' असं आहे. ही मानसिकता नेमाडे यांच्या नायकाची वाटते. या कालखंडातल्या गवस यांच्या कादंबऱ्यांवर या परात्म, हताश नायकाने केलेल्या दंभस्फोटांची गडद छाया आहे. या लेखनाकडे अनुकरण किंवा प्रभाव यापलीकडे जाऊन बघायला हवं. त्यात एका विशिष्ट वाङ्मयीन दृष्टीचा डोळस स्वीकार दिसतो आणि तणकटच्या निमित्ताने आपली स्वत:ची वाट ओळखण्याचा ठळक प्रयत्नही दिसतो.

या दृष्टीनं कळप या कादंबरीची अर्पणपत्रिका आवर्जून बघावी अशी आहे.

'साठात जन्मलेल्या आणि ऐंशीत चेहरा हरवलेल्या प्रत्येकास'

रिवणावायली मुंगी, आपण माणसात जमा नाही या संग्रहांमधल्या कथा वाचल्या तरी याचा अंदाज येतो. विशेषत: गावातला पदवीधर होणारा तरुण आणि नवं भान येत चाललेली स्त्री यांच्या नजरेतून राजन गवस यांनी गाव आतून बघितला.

मात्र एक आहे. गावातल्या नवजागृत तरुणाच्या नजरेतून जेव्हा गवस गावातलं वास्तव ऐरणीवर घेतात तेव्हा त्यात एक अस्सलपण असतं. पण गावातल्या नव्या जाणिवांच्या मुलीच्या नजरेतून जेव्हा ते हेच वास्तव तपासतात तेव्हा त्यात नकळत एक भाबडा स्वप्नवत रंग येतो. म्हणजे तो आशावादीच असेल असं नव्हे, पण ते वास्तव आतून आलेलं वाटत नाही.

उदाहरणार्थ, त्यांची गाजलेली रिवणावायली मुंगी ही गोष्ट घ्या.

जगावेगळे विचार असणारी ही मुलगी. बिनधास्त जगणारी, वागणारी अन् बोलणारी. या कथेची रचना प्रथमपुरुषी आत्मनिवेदनाची आहे. ती मुलगीच हे सगळं सांगतेय. त्यामुळे तिची भाषा एवढंच एक माध्यम तिचा बिनधास्तपण दाखवायला उपलब्ध आहे. तिच्या कथेतदेखील तिचं तथाकथित बिनधास्त असणं केवळ एक व्यक्तिचित्रणाचा भाग म्हणूनच तेवढं येतं. त्यात कृतिशीलता नाही, काहीच भूमिका किवा प्रतिपादन नाही.

तसंच तिच्या वळणाची गोष्ट या स्त्रीकेंद्री कथेतल्या तुळसाबाई सीताप्पा मिसाळ या नायिकेचं. यातही तिच्या बेधडक व्यक्तिचित्रणापलीकडे काही हाती लागत नाही. राजन गवस यांच्या अशा प्रकारच्या बऱ्याच कथांत हा अनुभव येतो. त्या विशिष्ट व्यक्तिचित्रणापलीकडे जाऊन काही घसघशीत आशय पदरात पडत नाही.

घुसमट या कथेतदेखील मध्यमवयीन विधवेच्या लैंगिक उपासमारीपोटी झालेल्या घुसमटीची आणि त्यातून उद्भवलेल्या चोरून परसंभोग पाहण्याच्या (व्होयरिझम) विकृतीची कथा नुसतीच भरकटत जाते. एक जगावेगळं व्यक्तिचित्रण यापलीकडे विशेष मौलिक काही हातात गवसत नाही. पण हुंदकासारख्या कथेत मात्र राजन गवस अतिशय सामर्थ्यानं आणि तरल अभिव्यक्तीनं स्त्रीचं दु:ख मांडताना दिसतात. शालू या मुलीचं आधी लग्न जमत नाही, अन् शेवटी ज्याच्याशी जमतं तो नपुंसक झालेला जोगता निघतो. या अपार दु:खी क्षणाचं वर्णन करताना गवस यांची शैली अतिशय तरल काव्यात्म होते. कथेच्या शेवटी गवस लिहितात :

तिची किंकाळी गावभर घुमली. तिच्या किंकाळीत कावळं घुटमाळलं. त्यांनी गावभर दवंडी दिली-

एक घर पाण्यात बसलं।

आता दुसरं घर हुडकानी।.बाबांनो!।

गावातली घरं गदगदली. पानंद तळामुळातून शहारली. झाडांनी हुंदके मोकळे केले. पानांच्या ढिगात सापांच्या जिभांचे पीक आले!

याउलट, दादा कोतोलीकरसारख्या वरवर व्यक्तिचित्रणात्मक वाटणाऱ्या कथेत मात्र ढोंगी नेत्यांचा दंभस्फोट अतिशय प्रकर्षानं प्रतीत होतो. या कथेतील गांधीनंतरचा

महात्मा या नावानं रंगवलेला दांभिक नेता एकाच वेळी कथेतलं पात्र आणि एक प्रातिनिधिक प्रवृत्ती होतो. अशा कथांमधलं उपहासगर्भ निवेदन ही राजन गवस यांची खास जमेची बाजू आहे. या दांभिक पुढाऱ्याची ओळख करून देताना कथेतलं एक पात्र असणारा निवेदक म्हणतो, घोटाळा असा, की ज्यांनी अनेकांचा बळी घेऊन आपलं थोरपण सिद्ध केलं, त्यांचं सरळ नाव घेऊन कोणाच्या मेंदूचा भुगा करायची माझी इच्छा नाही. तर त्यासाठी दुसरी सोय आहे. कोणती? तर या थोर नेत्यांना आम्ही त्या काळी गांधीनंतरचे महात्मे असं म्हणत असू, मग तेच त्यांचं नाव गृहीत धरायला काय हरकत आहे? गांधीनंतरचे महात्मे अशा अनेक कथांमध्ये राजन गवस गावगाड्याच्या एकेक पैलूचं प्रातिनिधिक चित्रण करतात. विशेषत: गावातल्या राजकारणाचं चित्रण करणाऱ्या ठराव, नवाचं तीन चतुर्थांश, तोड यासारख्या कथा उल्लेखनीय आहेत.

'मोअर आय राइट पर्सनल, मोअर इट बिकम्स युनिव्हर्सल' असं कुणा श्रेष्ठ लेखकाने म्हटलं आहे. तसंच 'मोअर ही राइट्स लोकल, मोअर इट बिकम्स ग्लोबल' असं राजन गवस यांच्या साहित्याविषयी म्हणता येईल. कारण राजन गवस लिहितात तेच मुळी प्रवृत्तींबद्दल.

समकालीन वास्तवाचा समग्र आवाका कवेत घेणारी महाकादंबरी राजन गवस यांच्याकडून अपेक्षित आहे ती नेमकी याच कारणामुळे.

राजन गवस यांच्या आवर्जून वाचाव्यात अशा साहित्यकृती.

कवितासंग्रह **-** हुंदका

कादंबरी - चौंडकं, भंडारभोग, धिंगाणा, कळप, तणकट

कथासंग्रह - रिवणावायली मुंगी, आपण माणसात जमा नाही

ललितगद्य - काचाकवड्या, रोकडे पाझर, कैफियत

शरद अष्टेकर (लेखातील काही भाग)

❐







नवे कोरे

ग्रोईंग अप बिन लादेन

जीन सॅसन/नज्वा बिन लादेन/ ओमर बिन लादेन

अनु. **बाळ भागवत**

४०० रु. पोस्टेज ३० रु.

११ सप्टेंबर, २००१ रोजी आजपर्यंतच्या सर्वात मोठ्या दहशतवादी हल्ल्यात
अमेरिकेत चार प्रवासी विमानांचे
अपहरण करून ती अमेरिकन लक्ष्यांवर आदळवतात.
त्या पैकी दोन विमाने वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या गगनचुंबी
इमारतींना धडक देतात
हे जगभर प्रसारित झालेले दृश्य कोणीच विसरू शकत नाही.
तीन हजार निरपराध लोक जीव गमावतात.
त्या वेळेपासून दहशतवाद हा शब्द उच्चारताच
एकच चेहरा डोळ्यांसमोर येतो, ओसामा बिन लादेन!
हा इतका कट्टर दहशतवादी बनला कसा
हे कळणे अवघड होते; कारण अत्यंत धनाढ्य
अशा कुटुंबात त्याचा जन्म झाला होता.
पण आता त्याला ओळखणारे त्याच्या कुटुंबामधले
कुणीही त्याच्याबद्दल बोलायला तयार नव्हते.
आणि मग खरे तर आश्चर्यच घडले,
ओसामाची पहिली पत्नी नज्वा आणि त्यांचा चौथा मुलगा ओमर यांनी
बोलण्याची तयारी दर्शवली.
कट्टर धर्मवेडा, दहशतवादी, स्वतःच्या मुलांनीही
आत्मघातकी हल्लेखोर बनावे अशी आशा बाळगणाऱ्या
ओसामा बिन लादेनच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेच पैलू उलगडले.
त्यांनी सांगितलेली चित्तवेधक कथा म्हणजेच
ग्रोईंग अप बिन लादेन!

नवे कोरे

मेकिंग द कट

डॉ. मोहम्मद खाद्रा

अनु. **डॉ. देवदत्त केतकर**



२००रु. पोस्टेज २५रु.

डॉ. मोहम्मद खाद्रा हे एक नामांकित सर्जन.

सर्जन असण्याचा अर्थ असतो, मानवी यातनांच्या सागरात अविचल उभं राहणं. आपलं ज्ञान, कौशल्य आणि बुद्धिमत्ता पणाला लावून व्याधीशी झुंज देणं.

एक इंटर्न म्हणून त्यांनी जेव्हा पहिला छेद घेतला तेव्हा शिक्षकांनी त्याची खिल्ली उडवली.

एका वृद्धेच्या इच्छेविरुद्ध त्यांनी तिचा जीव वाचवला.

मेंदूच्या कर्करोगामुळे एका कुप्रसिद्ध सर्जनला वेड लागले.

ल्युकीमिया झालेल्या मुलाची आई अगतिक होऊन कोलमडून पडली.

अशा स्मृतिचित्रांमधून, डॉ. मोहम्मद खाद्रा यांनी सर्जन म्हणून आपले आयुष्य उलगडून दाखवले आहे. खडतर प्रशिक्षणापासून ते निद्रानाश करणाऱ्या अविरत कामापर्यंत... आपलं आयुष्य घडवणाऱ्या रुग्णांच्या स्मृती ते जागवतात. ऑपरेशन थिएटरमध्ये घडणाऱ्या धक्कादायक चुकांमुळे उद्‌ध्वस्त झालेल्या रुग्णांच्या कहाण्याही यात आहेत.

राजकारणामुळे आरोग्यसेवेची झालेली दैना आपल्याला इथे दिसते.

मृत्यू समोर दिसत असताना रुग्णांनी बाळगलेल्या वेड्या आशा दिसतात.

आयुष्यात घडलेल्या असाधारण घटनांमुळे निर्माण होणारे नाट्य.

नवे कोरे

द गॉड ऑफ ॲनिमल्स

आर्यन कायले
अनु. **गीतांजली वैशंपायन**



२८०रु. पोस्टेज २५रु.

ही गोष्ट आहे, बारा वर्षांच्या ॲलिस विन्स्टनची!
लग्नासाठी घरातून पळून गेलेली मोठी बहीण,
अंथरुणाला खिळलेली मनोरुग्ण आई अन् तापट, घुम्या स्वभावाचे वडील – हे तिचं कुटुंब.
जोडीला मोडकळीस आलेला घोड्यांचा तबेला.
गुजराण करण्यासाठी विन्स्टन कुटुंबीय इतरांच्या घोड्यांची देखभालही करतात. त्या घोड्यांच्या मालकांशी (बहुतेक स्त्रिया!) आणि त्यांच्या आयुष्याशी विलक्षण भावनिक गुंतागुंत होते. लहानगी ॲलिस शाळेत असतानाच एका प्रौढ माणसाच्या प्रेमात पडते. त्यातला आनंद मिळवत असतानाच, कठोर वास्तवाची तिला जाणीव होते. क्रौर्य, खोटेपणा, फसवणूक याबरोबरच चांगुलपणा, हळवेपणा प्रत्येकात असतो,याचीही जाणीव तिला या प्रवासात होते.
स्वप्नाळू मुलीची पौगंडावस्थेतल्या निसरड्या वाटेवरची अविस्मरणीय कादंबरी!

गौरव

एस.एल.भैरप्पा यांच्या ‘मंद्र’ या कादंबरीला सरस्वती सन्मान





कन्नड साहित्यिक एस.एल.भैरप्पा यांना मंद्र या कादंबरीबद्दल साडेसात लाखांचा सरस्वती सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे. इ.स. २००० ते २००९ या दशकातील साहित्याचा मागोवा देऊन भैरप्पा यांची निवड करण्यात आली. मराठीत ‘मंद्र’चा सौ. उमा कुलकर्णी यांनी केलेला अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला आहे. पुरस्कार प्राप्त कादंबरीतील एक उत्कट प्रकरण येथे वाचकांसाठी देत आहोत.

तुळशीच्या दाट झुडपांमधोमध असलेली रिकामी जागा. उजवीकडे यमुना. देवळात स्वामी हरिदासांची मूर्ती. देवळात यात्रेकरूंचा गडबड नव्हती.

बाहेरच्या जगात तानसेनचे गुरू म्हणून प्रसिद्धी पावलेल्या हरिदास गुरूच्या मंदिरात शिष्याच्या नावाला महत्त्व नव्हतं. इतर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी असते तशीच वृंदावनातही यात्रेकरूंची गर्दी होती. पंड्यांची दादागिरी होती. अनेक वस्तू विकणाऱ्यांचं आक्रमण होतं.

सगळीकडे माश्यांची प्रचंड प्रमाणात गुईं गुईं होती. त्यामुळे मोहनलालला या देवळात खूपच शांत वाटलं.

तासभर बसून राहिला.

नंतर जवळच्या हॉटेलमध्ये आपल्या खोलीवर जाऊन तो झोपला.

सकाळी यमुनेच्या काठावर गेला. तिथं कृष्णानं या झाडावर गोपींची वस्त्रं लपवून ठेवली होती म्हणून सांगण्यात येणाऱ्या झाडाभोवती फिरून आला. तो दिवस तसाच गेला.

तिसऱ्या दिवशी भल्या पहाटे जाग आली. घड्याळ पाहिलं. साडेतीन वाजले होते.

हरिदास मंदिराकडे जायची इच्छा झाली. तोंड धुऊन तो अंधारातच बाहेर पडला.

देवळापाशी येताच त्याला स्वर ऐकू आले. कुणीतरी देवळात स्वरसाधना करत होतं. क्षणभर वाटून गेलं हरिदास स्वामींचा आत्मा तर नसेल? पावलांचा आवाज होऊ न देता देवळाजवळ जाऊन तो तिथल्या चौथऱ्यावर बसला. आत खरोखरच कुणीतरी स्वरसाधना करत होतं. त्याचीही एक विशिष्ट पद्धत दिसत होती. तिथं स्वर आकार किंवा स्वरांच्या सरगमनुसार चालला होता. षड्जापासून सुरुवात करून बाराही स्वरांवर स्थिरावत, प्रत्येक स्वराचा दीर्घ ओंकार चालला होता.

मंद्र षड्जाला पोहोचल्यानंतर एकेक स्वर ओंकारात लावत, बाराही स्वरांनंतर मध्य सप्तकातील षड्जाला येऊन पोहोचत होता. तिथून मध्य सप्तकाचे बाराही स्वर अशाच प्रकारे घेतले जात होते. त्यानंतर तार सप्तकातील बारा पायऱ्या. अशा प्रकारे मंद्र षड्ज ते तार षड्ज आणि तार षड्ज ते पुन्हा मंद्र षड्ज असं आवर्तन पुरं करताना बहात्तर ओंकार झाले. प्रत्येक स्वर पक्का होता. इतका की तिथं स्वरांच्या अतिक्रमणाला वाव नव्हता. तसाच स्वरसंकोचालाही भेदाभेद नव्हता. प्रत्येक स्वर किमान मिनिटभर तरी होता असं धरलं तरी एका आवर्तनाला बहात्तर मिनिटं लागली असली पाहिजेत. त्यांनी या आवर्तनांना केव्हा सुरुवात केली आणि हे कितवं आवर्तन याची मोहनलालला कल्पना नव्हती.

पहाट व्हायच्या वेळी त्यांनी आपली स्वरसाधना संपवली. त्यानंतर संपूर्ण मौन! हा शुद्ध स्वरांचा क्रम. यात कुठलाही विशिष्ट राग दिसत नव्हता. सगळ्या रागांना आधारभूत असणाऱ्या सगळ्या स्वरांची ती साधना होती. संगीताच्या खोलीचा प्रत्यय आला.पाठोपाठ राजासाहेबांच्या शिवमंदिरात करत असलेल्याा स्वरसाधनेची आठवण आली नाही! त्याहीपेक्षा ही ओंकाराची स्वरसाधना अधिक गहिरी आहे!

सूर्योदय झाला. सगळा परिसर सूर्यकिरणांनी भरून गेला. एवढा वेळ नादसाधना करणारे गायक गर्भगृहाबाहेर आले.

ते एक साधू होते. काळ्या केसांच्या जटा वळल्या होत्या. चाळिशीचं वय असेल. कमरेला एक जुनं तोकडं वस्त्र काचा मारून आवळलं होतं. कपाळावर लावलेला गंध सुकून पडून गेला होता.

त्यानं पटकन उठून त्यांचे पाय धरले. नासिकेवर एकाग्र झालेली त्यांची नजर त्याच्याकडे वळली.

मोहनलालला काय बोलावं ते सुचलं नाही. ते निघून गेले.

कुठं गेले ते जाऊन पाहायची त्यालाही इच्छा झाली नाही.

तो संपूर्ण दिवस मोहनलाल त्या ओंकार स्वरांतच बुडून गेला होता. आपण करत असलेल्या मंद्र-साधनेपेक्षाही अधिक गहिरी आणि अतीताचं दर्शन घडवण्याइतकी सघन स्वरशक्ती!

अंथरुणावर पडलं तरी त्याला झोप येईना.

रात्री लवकर जेवण करून तो झोपला. झोप लागली; पण मध्यरात्री कानांमध्ये ओंकार नाद भरल्यासारखा होऊन जाग आली.

घड्याळ पाहिलं, साडेबारा वाजले होते.

तो उठला, डोळ्यांना पाणी लावून हरिदास मंदिराच्या दिशेनं चालू लागला.

आकाशात फिकट चांदणं होतं. अंधारात आजचं व्यापारी वृत्तीनं सडलेलं वृंदावन नष्ट होऊन त्या फिक्या उजेडात मूळ वृंदावनाचा भास होत होता. यमुना, कृष्ण, राधा, गोप स्त्रियांचा रास, कृष्णाची बासरी - सारं काही मन:चक्षूंपुढे साकार झाल्याचा अनुभव येत होता.

तसाच तो तुळशीच्या झाडांमधल्या देवळापाशी जाऊन पोहोचला, तेव्हा तर ती दृश्येही नाहीशी झाली आणि वातावरणात भरून राहिलेल्या शुद्ध ओंकारांचा अनुभव आला.

म्हणजे यांची स्वरसाधना रात्रभर चालते तर!

तो पुन्हा हलक्या पावलांनी कालच्याच जागेवर जाऊन बसला.

त्यांचा प्रत्येक ओंकार कुठला स्वर सांगतो हे वेगळं सांगायची गरज नव्हती. क्षणभर त्यालाही त्या स्वरामध्ये आपला स्वर मिसळण्याचा अनावर मोह झाला, तरी

त्यानं तो आवरला. कारण त्यामुळे त्यांची अतिसूक्ष्म अवस्था भंग पावून ते आपल्यावर संतापतील हे त्याला दिसत होतं. त्यामुळे तो मूकपणेच त्यांच्या प्रत्येक स्वरभावाशी तल्लीन होऊन ऐकू लागला.

आदल्या दिवशीप्रमाणे पहाटेच्या वेळी त्यांच्या स्वरसाधनेची समाप्ती झाली.

थोडा वेळ गर्भगृह मौनानं भरून गेलं.

आकाशात सूर्यकिरणे पसरायच्या वेळी ते बाहेर आले.

त्यानं आदल्या दिवसासारखाच नमस्कार केला. त्यांनी नासिकाग्रावरची दृष्टी त्याच्याकडे वळवून विचारलं, ''तुम्ही गायक आहात काय?''

'होय. माझं नाव मोहनलाल!'

मनात आलेल्या 'यंदाचा तानसेन पुरस्कार-विजेता' ह्या शब्दांचा उच्चार करायचं मात्र टाळलं. क्षणभर वाटलं, आपण योग्यच केलं. केवळ मोहनलाल म्हटलं तरी त्यांना समजेल. गायनाच्या क्षेत्रात हे नाव ठाऊक नाही, असं आहे तरी कोण? पण पाठोपाठ वाटलं, त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर होय किंवा नाही एवढंच होतं. तिथं नाव सांगायची गरजच नव्हती. त्या नावाचा त्यांच्यावरही काही परिणाम झालेला दिसला नाही.

'काल पहाटे आला होतात. मध्यरात्रीही आलात. निर्जन जागी स्वरसाधना करायची म्हणून मी ही जागा निवडली आहे.'

'असू दे. यानंतर मात्र येऊ नका'.

'आपली आज्ञा असेल तर मी येणार नाही. आपलं गायन ऐकून मी संगीतातील ज्ञात शक्ती शिकू शकेन, असं वाटलं म्हणून आलो होतो. माझा शिष्य म्हणून स्वीकार केलात तर मी कृतार्थ होईन!'

'मी संगीत साधना करत नाही. ही योग-साधनेची एक पद्धत आहे, एवढंच.

'तेच म्हणतोय मी. संगीतातली अज्ञात शक्ती मला शिकायची आहे. आपण ती शिकवलीत तर माझ्या गाण्याला नवी शक्ती प्राप्त होईल. तानसेननं दीपक राग म्हणून आग लावली आणि मुलीकडून आणि गुरुभगिनींकडून मेघराग गायला लावून ती विझवली, हे सगळं गुरूनं शिकवलेल्या योग-सामर्थ्यामुळेच ना? आपण कृपावंत होऊन ते सामर्थ्य मला दिलंत तर मी धन्य होऊन जाईन!' त्यानं नतमस्तक होऊन विनंती केली.

'ओह! तानसेनच्या संदर्भात गायकांनी रचलेल्या असल्या मंत्रसिद्धीच्या कथांवर संगीतप्रेमी विश्वास ठेवतात, हे मीही ऐकलं आहे. अकबर बादशहाच्या मोठेपणाच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. ही कथाही त्यापैकीच एक आहे. अकबर बादशहा त्या गोष्टीतून बाजूला काढला तर तानसेननं दीपक राग गाऊन केलेली कथाच तयार होऊ शकणार नाही! खरं की नाही?'

'अगदी खरं आहे ते! बादशहा फार मोठा संगीतप्रेमी! आपल्या इतर मंत्र्यांपेक्षा तानसेनला तो जास्त पगार द्यायचा.'

'खरी गोष्ट काय आहे, सांगू? स्वामी हरिदासांनी लंकादहन सारंग राग म्हणायला आरंभ केल्यावर या वृंदावनात त्यावेळी असलेल्या अरण्यात वणवा पेटला. त्यावेळी त्यांनी मेघ गाऊन तो वणवा विझवला. स्वामी हरिदास फक्त गायक नव्हते, ते फार मोठे योगी होते. योग्याचा पहिला गुण कोणता? अकबर बादशहानं अनेकदा निरोप पाठवूनही त्यांनी याच जागी असलेला आपला आश्रम सोडला नाही आणि ते राजाश्रयासाठीही गेले नाहीत. बादशहाला आपल्या गुरूचं गाणं ऐकवण्यासाठी तानसेननं त्याला वेषांतर करून इथं आणलं होतं. नंतर त्याला बाहेरच बसवून स्वत: आत गेला आणि अमूक राग गायची विनंती केली. बादशहाही बाहेरूनच गाणं ऐकून माघारी वळला. हा गुण तानसेनमध्ये होता काय? त्यानं राजाश्रय स्वीकारला होता ना? बादशहाचा गुणगौरव करणाऱ्या काही संगीतरचना त्यानं केल्या ना? आपल्या मुलांकडूनही त्यानं बादशहाची स्तुती करणाऱ्या रचना करवून घेतल्या, त्या स्वत: तपासून दिल्या त्यांना राजदरबारात अभिरुचीचा विचारच होता की नाही? आवडलेल्या मुलीशी विवाहबद्ध होण्यासाठी त्यानं आपला धर्म सोडून दुसऱ्या धर्माचा स्वीकार केला होता ना? या धर्माचा स्वीकार केल्यामुळं त्याचं बादशहाच्या दरबारातलं स्थान अधिक बळकट झालं की नाही? तो एक मोठा गायक होता. त्याची कला-प्रतिभा मोठी होती; पण म्हणून केवळ योग्यालाच प्राप्त होऊ शकणारी शक्ती त्याच्या गाण्याला होती असं आपल्यासारखे कलाकारच म्हणतात! तो राजाश्रय आणि राजभोगाची आमिषं यांना बळी पडला, त्यानं स्वधर्माचा त्याग केला. तरीही योगसिद्धी प्राप्त असलेल्या महायोगी हरिदासांनी त्याचा तिरस्कार केला नाही, त्याला शापही दिला नाही! हे त्यांच्या योगसिद्धीचं आणखी एक लक्षण.

ते उभ्यानंच हे बोलत होते. तो काही अंतरावर नम्रपणे उभा राहून ऐकत होता.

त्यांनी नजरेनंच विचारलं, 'आणखी काही विचारायचं आहे काय?'

त्याला काही सुचलं नाही.

त्यांची नजर पुन्हा नासिकाग्रावर खिळली.

ते नदीच्या दिशेनं चालू लागले.

तो त्यांच्या पावलांच्या ठश्यांकडे पाहत उभा होता.

❐

किंमत : ४००रु.   सभासदांना : सवलतीत   पोस्टेज : ३०रु.

नवे कोरे

फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स

जॅन रफ्–ओ'हर्न

अनु. **नीला चांदोरकर**



२७०रु. पोस्टेज २५रु.

मनातल्या खोल कप्प्यात दडवून ठेवलेली गोष्ट आपल्या मुलींना, नातवंडांना कशी सांगायची? कारण ही गोष्ट साधीसुधी नव्हती.

ती अत्यंत लज्जास्पद होती. तिची तीव्रता पन्नास वर्षांनंतरही कमी होत नाही. थोडीथोडकी नव्हे, पन्नास वर्षं जॅननं कोंडमारा सहन केला. मग ठरवलं, ''ते सगळं आपण लिहून काढायचं, कागदावर उतरवायचं.''

मृत्यूची टांगती तलवार तिच्या डोक्यावर होती. शिवाय घरादाराची अब्रू वेशीवर टांगली जाईल ही भीतीही होती.

लैंगिक अत्याचारांमुळे जे दुःख तिला सोसावं लागलं त्याची ही कहाणी.

१९९२ साली या कोंडमाऱ्यांचा उद्रेक झाला.

जॅनला जो शारीरिक आणि मानसिक त्रास सोसावा लागलात्याचं हृदयद्रावक वर्णन काळजाला भिडतं.

इंग्रजी मध्ये सुद्धा उपलब्ध

पुस्तक परिचय

**इंग्लंडमध्ये स्थलांतरीत झालेल्या
एका पंजाबी कुटुंबाची कहाणी.
खालच्या जातीच्या तरुणाशी लग्न केल्याने
घरापासून तुटून अलग पडलेल्या जसविंदरची
झालेली ससेहोलपट**

शेम

जसविंदर संघेरा अनु : सुनंदा अमरापूरकर

'शेम' या आत्मकथनाच्या पहिल्याच पानावर 'बळजबरीने लग्न ठरवलेल्या आणि प्रियजनांनीच नाकारलेल्या संघर्षाची सत्यकथा' असे वर्णन करण्यात आलेले आहे. ''ही माझी व्यक्तिगत कथा आहे. या कथेतील काही नावे व पात्रांची माहिती यात बदल केलेला आहे.'' असा खुलासाही निवेदक जसविंदरने मुद्दाम केलेला आहे.

पंजाबमधून इंग्लंडमध्ये येऊन स्थायिक झालेल्या एका शीख कुटुंबाची ही कहाणी आहे. डर्बी गावातील नॉर्थ अंबरलँड स्ट्रीटवरच्या आशियाई वस्तीत राहणाऱ्या या कुटुंबात सहा मुली आणि एक मुलगा. कुटुंबप्रमुख वडील एका फाउंड्रीत रात्रपाळीचे कामगार तर आई कापडाच्या मिलमध्ये मिळेल ते काम करणारी. सर्वात थोरली मुलगी प्रकाश विवाह करून लंडनला राहणारी. गिंडा जसविंदरपेक्षा दहा वर्षांनी मोठी. ल्युसी, रोबीना आणि यास्मिन जसविंदरपेक्षा लहान. घरात दोन बेडरूम्स. एकीत पाच बहिणी झोपायच्या. दुसरीत भाऊ बलबीर. आई खाली सोफ्यावर.

छोट्या जसविंदरला प्रश्न पडे, आईचं बेड वडिलांशेजारी का नाही? आईवडील फारसे बोलत का नाहीत? त्यांच्यात प्रेम नाही का? त्यांचं वैवाहिक जीवन म्हणजे तडजोड तर नाही ना?

आई सकाळी सहाला एका मोठ्या भांड्यात रस्सा किंवा पातळ कालवण शिजवून ठेवायची. चपात्या, सॅलड मुलींनी करायचं. घराजवळच्या गुरुद्वारात जाऊन प्रार्थना करून आई कामावर जायची. मोठी बहीण गिंडा हीच सर्व भावंडांना सांभाळायची. आई बलबीरला त्याच्या आवडीचे पदार्थ करून द्यायची. त्याच्याकडे जास्त लक्ष द्यायची. मुली रस्सा आणि रोटी वगैरे टीव्ही बघत खायच्या. गुरुद्वारामध्ये आईला बायका भेटत. गप्पांची मैफल रंगवत.

आई मुलींना गोऱ्या युरोपियन मुलांमध्ये मिसळू देत नसे. ''या गोऱ्या पोरी, त्यांच्या अंगात शिरजोरी आणि भानगडी करतात चोरी चोरी. त्यांच्या नादी न लागेल तीच शहाणी खरी'', असे आईचे मत होते. एखादी आशियाई मुलगी गोऱ्या पोराबरोबर फिरू लागली तर तिचे भाऊ नाहीतर काका मामा त्या पोराला चोपून काढायचे आणि मुलीला घरात डांबून ठेवायचे. एखादा आशियाई मुलगा गोऱ्या पोरीबरोबर सलगी करू लागला तर 'तो थोडं पांढरं मटन चाखून बघतोय' म्हणून कौतुक व्हायचं; पण लगेच त्या मुलासाठी पंजाबमधून एखादी मुलगी शोधून त्याच्या लग्नाची घाई केली जायची. मुलींना कडक शिस्तीत ठेवून आई घराण्याच्या रीतीभाती शिकवायची. मुलींनी फार बोलणे वा हसणे तिला चालायचे नाही. मुलींना लाडावून ठेवणे दूरच! जरा काही झाले की तुम्ही घराण्याची अब्रू घालवणार म्हणून उद्धार करायची. तुम्ही मुलींनी घराण्याचं नाव राखायला हवं, चांगल्या सुना म्हणून घेतलं पाहिजे. चांगल्या सुगरणी बनायला हवं, असा तिचा आग्रह असे. वडील त्या मानाने

शांत. ते तिच्या कलाने वागत. सुटीच्या दिवशी दारूच्या गुत्त्यात दोन चार पेग घेऊन येत तेव्हा मोठे आनंदात असत. मुलींना पॉकेटमनी देत. वडिलांनी एक शेत कसायला घेतले होते. कधी कधी त्या शेतावर जाऊन मुलींना कामाला लावत. पंजाबमधल्या शेतावरच्या गमतीजमती सांगत. ''तुम्ही मग पंजाबातच का राहिला नाही? इकडे का आलात?'' असा प्रश्न जसविंदर विचारत असे तेव्हा पंजाबमधल्या काबाडकष्टाच्या जिण्यातून आपल्या मुलामुलींना बाहेर काढायचं म्हणून असे उत्तर ते देत. वडील इंग्लंडला आल्यावर सात वर्षांनी आई आली. ती त्यावेळी१५ वर्षे वयाची होती. तिची थोरली बहीण सर्पदंशाने वारली तेव्हा त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे बहिणीच्या नवऱ्याशी-मेव्हण्याशी तिचे लग्न लावले गेले. त्यामुळे 'आईला इंग्लंडमध्ये एकाकी वाटले असणार, तशात इंग्लिशचा गंधही तिला नव्हता. इंग्लंडमध्ये राहून ती कधी इंग्लिश बोलली नाही, पंजाबीतच बोलत असे,' असे जसविंदर म्हणते.

जसविंदरची मोठी बहीण गिंडा हिचे लग्न ठरते. भारतात तिला पाठवण्यात येते. लग्न करून एका महिन्याने ती परत येते. ती सांगते, मला दाखवलेला फोटो ज्या माणसाचा होता, त्याच्यापेक्षा वेगळ्याच माणसाशी माझे लग्न झाले. त्यामुळे ती खूप निराश झालेली होती. परंतु वर्षभराने तिच्या नवऱ्याला व्हिसा मिळाल्याने तो इंग्लंडला आला आणि गिंडा त्याच्याबरोबर राहण्यासाठी त्याच्या बहिणीकडे गेली. गिंडाचे सासर डर्बी मध्येच दहा मिनिटांच्या अंतरावर होते. भारी साड्या आणि दागिने, भडक मेकअप अशा तोऱ्यात ती कधी कधी भेटायची.

गिंडानंतर यास्मिनचे लग्नही अशाच प्रकारे होते. भारतातलाच नवरा. मोठी बहीण प्रकाश हिचाच धाकटा दीर- असतो. नात्यात लग्न करणे केव्हाही चांगले असे आई म्हणते.

जसविंदर प्रायमरी स्कूलनंतर लिटल ओव्हल स्कूलमध्ये जाऊ लागते. दोन मैलांवरच्या या शाळेत वडील या तिन्ही मुलांना कारने सोडत. जसविंदर तेरा वर्षाची झाल्यावर आजूबाजूच्या आठ गल्ल्यांमध्ये पेपर टाकायचे काम करून आठवड्याला पाच पौंड मिळवू लागते. मिळणारे पैसे ती आईला देऊ लागते. गोऱ्या मुलींप्रमाणे आपण जीन्स घ्याव्या असे तिला वाटते. तर आई तिला फैलावर घेते. ''लाज वाटत नाही का तुला? त्या गोऱ्या पोरींसारखे तुलाही आपले कुल्ले दाखवत फिरायचे असते का?'' सुटीत ती लोणच्याच्या एका कारखान्यात काम करते. तेथे तिला अवतार नावाची मोकळ्या स्वभावाची मैत्रीण मिळते. पुढे प्रेस्टो कंपनीत आठवड्यात साडेबारा पौंड मिळू लागले. त्यावेळी वाइल्ड कर्ल्सची, कुरळ्या केसांची फॅशन असते. जसविंदर आईला न सांगता केस कुरळे करून येते. त्यासाठी आपले लांबसडक दाट केस कापते. आई त्याबद्दल तिला लाथाबुक्क्यांनी मारते. ''पुन्हा तू आम्हाला लाज आणलीस. त्या गोऱ्या पोरींसारखं वागलीस म्हणजे फार शहाणी झालीस काय तू?

काय ध्यान करून घेतलंस. आता कुणी चांगला मुलगा तुला पसंत करेल का? नाठाळ मेली! चवचाल कुठली!

आई तिला लंडनमधल्या आपल्या प्रकाश या मुलीकडे तीन महिन्यांसाठी पाठवते. मोठी बहीण तिला भारतीय कपड्यांची सक्ती करते. रीतीभाती शिकवते. शिवणकाम करायला लावते. घरकामाला जुंपते. स्वयंपाकाचे धडे देते. सुटीच्या दिवशी प्रकाशचा नवरा घरी असे. दारू ढोसून तो बायकोवर सारखा ओरडत असे. मारतही असे.

जसविंदर पंधरा वर्षांची होते तेव्हा तिला आई एका मुलाचा फोटो दाखवते. ''कसा वाटतो तुला हा मुलगा? याच्याशी तुझं लग्न होणार आहे.'' जसविंदरच्या पोटात गोळा येतो. बहिणींचे लग्नानंतरचे हाल बघून जसविंदरला लग्नाबद्दल भीती वाटते. आपल्याला कॉलेजात जायला मिळणार नाही याचे दु:ख होते. तेवढ्यात रोबीनाला भारतात पाठवण्यात येते. तेथे लग्न करून ती सहा महिन्यांनी येते. तोवर जसविंदरच्या लग्नाची तयारी सुरू होते. फोटोतला मुलगा कुरूप होता. तिच्यापेक्षा बुटका, वयाने मोठा, केसांचा कट गांवढळ. बहिणी म्हणत, '' कर गं लग्न. आम्ही केलीच ना लग्नं? तू एवढी कोण लागून गेलीस?'' जसविंदर लग्नाला नाही म्हणते याचा अर्थ तिला भुताने झपाटलेय असा लावून तिची आई तिला भूत उतरवण्यासाठी एका हिंदू मांत्रिकाकडे नेते. मांत्रिक तिला सांगतो, '' हे तुझं प्राक्तन आहे. ते तुला भोगायलाच हवं. विरोध करू नकोस. विरोध केलास तर तुझ्यावर खूप संकटे येतील. तुझा सर्वनाश होईल.''

आई जसविंदरला घेऊन तिच्या लग्नासाठी भारतात जाण्याची तयारी सुरू करते.

जसविंदर म्हणते, मला शाळा संपवून कॉलेजात जायचे आहे. मला लग्न करायचे नाही.

आई तिला गिंडाकडे पाठवते. गिंडाच्या घरी जसविंदर दहा पंधरा पॅरासिटॅमल गोळ्या घेते. तिला गरगरू लागते. घाबरून ती गिंडाला सांगते... गिंडा एलीन या मैत्रिणीला बोलावून घेऊन कोरी कॉफी पाजून उभी ठेवते. हॉलमध्ये फेऱ्या मारायला लावते. गिंडा तिला म्हणते, ''जसविंदर, लवकर मोठी हो. वस्तुस्थितीला तोंड द्यायला शिक. असं काही करू नकोस.''

याच सुमाराला अवतार या मैत्रिणीच्या घरी तिच्या भावाशी- जस्सीशी जसविंदरची ओळख होते. एकवीस वर्षांचा जस्सी तिला देखणा रुबाबदार वाटतो... अवतारचे कुटुंब आपल्याहून खूप खालच्या जातीचे म्हणजे चर्मकार आहे हे ठाऊक असूनही जसविंदरला जस्सी आवडतो. जस्सीही तिच्या प्रेमात पडतो. जस्सी डर्बीमधल्या एका इंजिनिअरिंग फर्ममध्ये नोकरीला होता. उत्तम बॉक्सर होता. तो तिला डेटवर घेऊन जातो. तिचे चुंबन घेतो. ''आय लव्ह यू'' म्हणतो. पंधरा वर्षे वयाच्या जसविंदरला

या बॉयफ्रेंडबद्दल आपुलकी, आस्था वाटते.

जसविंदरचा नियोजित नवरा भारतातून जर्मनीत येतो. तिची आई जर्मनीला जाण्याचे बेतू आखू लागते. तेव्हा जसविंदर आईला म्हणते, ''मम, तू माझं लग्न ठरवलं आहेस खरं; पण मला हे लग्न करायचं नाहीय. मला इथंच राहायचं आहे. माझा एक बॉयफ्रेंड आहे.''

त्याबरोबर घरात जणू स्फोट होतो. आई आरडाओरडा करून सर्वांना गोळा करते.

''पाहिलंत. पोरीनं शेण घातलं हो माझ्या तोंडात. घराण्याला काळोखी फासली... हाडाची काडं करून या सात पोरींना मी वाढवलं.. आख्खं आयुष्य त्यांच्यासाठी घालवलं आणि आता ही दिवटी कार्टी म्हणते, माझा एक बॉयफ्रेंड आहे. माझं नाक कापलंस. घराण्याला कलंक लावलास.'' जसविंदरला खोलीत कोंडून ठेवण्यात येते. तिच्यावर सक्त पहारा ठेवण्यात येतो. तीन दिवसांनी जसविंदर आईला म्हणते, ''मम, मी माझा विचार बदललाय. मी लग्नाला तयार आहे.'' आई फ्रँकफर्टची तीन तिकिटं काढते. जसविंदर, गिंडा आणि आई तिघं जर्मनीला जायचं ठरवतात. तिच्यावरचा पहारा उठतो. ती जस्सीशी संपर्क साधते. जस्सी म्हणतो, ''अपरिचित माणसाशी तू लग्न करू नकोस. मी तुला सांभाळीन. आपण सुखात राहू.''

आणि संधी साधून ती घरातून पळ काढून जस्सीच्या कारखान्याबाहेर जाऊन थांबते. जस्सीला म्हणते, ''आता आपल्याला पळून जायला हवं. पुन्हा मला घराबाहेर पडण्याची अशी संधी मिळणार नाही.''

''माझ्या नोकरीचे काय? आपण जायचे कुठे? पैशांची व्यवस्था?'' जस्सीपुढे प्रश्नच प्रश्न.

पण तो घरी जाऊन बॅगा घेऊन येतो. तेथून शंभर सव्वाशे मैलांवर न्यू कॅसल तेथे जाऊन कामधंदा शोधू असे ठरवून डर्बीचा दोघे निरोप घेतात.

तेथून जसविंदर आईला फोन करते. आई म्हणते, ''चांडाळणी, हे काय करून ठेवलंस आमचं? असं पळून जाण्याची, तेही आपल्यापेक्षा खालच्या जातीच्या मुलाबरोबर जाण्याची हिंमत कशी झाली तुला? तू आम्हाला मेलीस. पुन्हा आमच्या घरात येऊ नकोस. मला तुझ्याशी कसलाही संबंध ठेवायचा नाही.''

जस्सीबरोबरचे जसविंदरचे सहजीवन सुरू होते. मिळेल ते काम करावे लागते. आशियाई वस्ती टाळण्याच्या प्रयत्न केला जातो. किरकोळ वस्तूंच्या विक्रीचा धंदा जस्सी सुरू करतो. चार पैसे मिळू लागतात.

न्यू कॅसल सोडून लीडस गावी संसार थाटतात. कन्या लिसा हिचा जन्म होतो. काही वर्षे जातात.

जस्सीच्या जीवनात दुसरी स्त्री येते तेव्हा जसविंदर घटस्फोट घेऊन घर सोडते.

गॅरेजमध्ये काम करणाऱ्या राजविंदरशी तिची मैत्री होते. राजचा मित्र नरिंदर

ओकवुडमध्ये घर विकत घेण्यासाठी आर्थिक मदत देतो. जसविंदर ॲरोबिक्सची प्रशिक्षिका होते. कम्युनिटी सेंटरमध्ये ॲरोबिक्सचे वर्ग चालवते.

राजशीही संबंध बिघडतात. स्टायलिश सुरजितशी तिचे संधान जुळते.

आपले अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची तिला इच्छा होते. ती शाळेत प्रवेश घेते. पुस्तकांची नवी दुनिया तिला गवसते. १९९४ साली वयाच्या २९ व्या वर्षी ती डर्बी युनिव्हर्सिटीत समाजशास्त्र आणि महिला आरोग्य हे विषय घेऊन पदवीसाठी अभ्यास करू लागते. तिला दुसरी मुलगी होते. मारिया.

कॉलेजातील अभ्यासाच्या निमित्ताने जसविंदरला अनेक सामाजिक समस्यांबद्दल कुतूहल निर्माण होते. स्त्रियांच्या भाषेच्या आणि सांस्कृतिक बाबतीतल्या अडचणी सोडवण्यासाठी एखादा प्रकल्प सुरू करण्याचा विचार तिच्या मनात येतो.

स्त्री आधार केंद्रातील ट्रिशा तिला सांगते, ''आपल्या आधार केंद्रासमोरच बलात्कारित स्त्रियांना मदत करणारे रेप क्रायसिस सेंटर आहे. या केंद्रातर्फे एक अभ्यासक्रम घेतला जातो. तो तू पूर्ण कर.''

या कोर्सचे दोन भाग होते. एक अशा आपत्तीग्रस्त स्त्रियांना आपल्या आयुष्यातील भल्या-बुऱ्या घटना सांगायला प्रवृत्त करणे. त्याद्वारे स्वत:चा शोध घेणे. अनोळखी महिलांसमोर आपल्या जीवनातल्या दु:खाच्या, छळाच्या, दहशतीच्या, लाजिरवाण्या कहाण्या उघड केल्यावर एक प्रकारचा मोकळेपणा जाणवतो. या कहाण्या शांतपणे ऐकून घेण्यासाठी आपले लिसनिंग स्किल - श्रवणकौशल्यही विकसित करावे लागते.

आठजणींच्या या कोर्समध्ये सिल्व्हिया आणि ग्लेंडा या दोन प्रशिक्षित समुपदेशक स्त्रिया मार्गदर्शन करीत. आपापल्या आयुष्याच्या कहाण्या सांगणे आरंभी अवघड जाई. पण पुढे त्या सांगून झाल्यावर, मनात दीर्घकाळ साचलेल्या कडवट भावनांचा निचरा होऊन जाई, मन मोकळे होई असे जसविंदरला जाणवले.

त्यानंतर दोघीदोघींच्या चार जोड्या करण्यात आल्या. आळीपाळीने एकेकीने सांगायचे आणि दुसरीने ऐकायचे.जसविंदर आणि ॲलिसिया या दोघींची जोडी झाली. आरंभी ॲलिसियाने स्वत:चे बालपण, त्यातले भयानक अनुभव सांगितले. नंतर जसविंदरने आपल्या जीवनातील घटना सांगण्यास आरंभ केला. आपले लग्न, दोन मुलींचा जन्म, मोठी मुलगी आपल्या पहिल्या नवऱ्याकडे राहते, मी ॲरोबिक्सची प्रशिक्षिका आहे. वगैरे. बहीण रोबीनाचे अनोळखी पुरुषाशी लग्न, तिला झालेले अपत्य, वैवाहिक जीवनातील छळ, सक्तीने नवऱ्याबरोबर राहण्याचा ताण, त्यामुळे जगण्याविषयी निर्माण झालेली भीती, एकाकीपणाची भावना, स्वत:ला जाळून घेऊन संपवलेले आयुष्य... आपल्या सख्ख्या आईने मदत नाकारून तिच्याकडे फिरवलेली पाठ, हे सर्व सांगून समजणार नाही... असे ती ॲलिसियाला सांगते तेव्हा तिला

वाटते, '' हा आपल्या आयुष्यातला परिवर्तनाचा क्षण आहे. आपलं आयुष्य ज्या चौकटींनी तयार झालं त्या चौकटी या सेशनमध्ये हादरल्या. घराण्याचं नाव, परंपरा, जे घडेल ते चार भिंतींच्या आत पुरून ठेवण्याची वृत्ती, ममने विणून ठेवलेले गुप्ततेचे जाळे यामुळे जीवनातल्या चांगल्या गोष्टींना, सत्य-प्रामाणिकपणा- सहानुभूती यांना मिळालेले दुय्यम स्थान हे जसविंदरला जाणवले.. तिचे आयुष्य बदलले.

इंग्लंडमध्ये भाषा आणि संस्कृतीशी जुळवून घेताना ज्या स्त्रियांना अडचणी येतात त्यांना मदत करण्यासाठी एखादी संस्था सुरू करण्याची कल्पना जसविंदरच्या मनात येते आणि त्या दृष्टीने ती चाचपणी सुरू करते. 'कर्म निर्वाण' हे नाव या संस्थेसाठी ती निश्चित करते.

महिलांच्या मनातला भ्रम दूर करून त्यांना मन:शांती मिळवून देण्यास मदत करणे असे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले. त्यासाठी रेप क्रायसिस सेंटरच्या मागची एक मोठी खोली कार्यालय म्हणून मिळवली. महिला आरोग्यविषयक प्रदर्शन भरवून या केंद्राचे उद्घाटन केले. लग्न करून ज्या आशियाई मुली इंग्लंडमध्ये आणल्या जातात त्यांच्या विवाहाची कायदेशीर नोंद होत नसल्याने त्यांना अधिकृत नागरिकत्वाचा दर्जा मिळत नाही, त्यांना कायदेशीर मदत वा सवलत मिळत नाही; कर्म निर्वाणने या महिलांना व्यासपीठ मिळवून दिले. अनेक स्त्रियांना आधार दिला. मदत मिळवून दिली. पुनर्वसन केले.

विद्यापीठाच्या परीक्षेत जसविंदरला फर्स्ट क्लास मिळतो. ग्रॅज्युएशन डे च्या कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांच्या वतीने आभाराचे भाषण करण्याची संधी मिळते. ते भाषण उपस्थितांच्या काळजाला हात घालते. ''शिक्षण अर्ध्यावर सोडलेली माझ्यासारखी मुलगी दोन मुलांची आई झाल्यावर युनिव्हर्सिटीत प्रवेश करते, शिक्षण चालू असतानाच एका अपत्याला जन्म देते आणि पदवीही मिळवू शकते तर इतर कुणालाही ते अवघड जाऊ नये. माझ्या मुलांनीही माझ्या पावलावर पाऊल टाकून चालावं अशी माझी इच्छा आहे.'' हे तिचे आवाहन फारच प्रभावी ठरते.

'कर्म निर्वाण'च्या कामाला मग गती येते. निराधार आशियाई स्त्रियांना कुठल्यातरी अनाथाश्रमात ठेवून त्यांची खऱ्या अर्थाने सोय होणार नाही. त्यांना समजावून घेण्यासाठी, दिलासा देण्यासाठी मित्रमैत्रिणींची गरज असते. त्यासाठी नॅशनल फ्रेंडशिप नेटवर्कची कल्पना पुढे येते. मैत्री ही कुटुंबाची जागा घेऊ शकत नाही. पण तरीही बहुमोल ठरू शकते.

इ.स. २००५ मध्ये डंडी युनिव्हर्सिटीमधील लॉ कॉलेजमध्ये जसविंदर 'बळजबरी विवाह आणि प्रतिष्ठेसाठी केला जाणारा हिंसाचार' या विषयावर भाषण देते तेव्हा अनेक श्रोते आश्चर्यचकित होतात. आपल्या देशात, ब्रिटनमध्ये या घटना घडत आहेत आणि आपल्याला त्याची साधी माहितीही नाही या वस्तुस्थितीने ते हादरतात.

जसविंदर संघेरा हिच्या या आत्मकथनातून भारतातून इंग्लंडमध्ये स्थलांतरित झालेल्या शीख कुटुंबाच्या गेल्या ५०-६० वर्षातील वाटचालीवर प्रकाश पडतो. पन्नास वर्षे इंग्लंडमध्ये राहूनही इंग्लिश न बोलता जसविंदरची आई तेथे राहू शकते आणि सर्व व्यवहार करू शकते; गौरवर्णीयांच्या श्रीमंतीला आणि वैभवाला न भुलता आपल्या पंजाबी जीवनशैलीलाच महत्त्व देण्यात धन्यता मानते, आपल्या मुलामुलींनी भारतीय मुलामुलींशीच लग्न करावे असा आग्रह धरू शकते, जातीपातीचा विचार प्रमाण मानून श्रेष्ठ कनिष्ठतेच्या कल्पना उराशी कवटाळून बसू शकते. हे लक्षात घेतले तर आपल्यालाही आश्चर्य वाटू शकते. कनिष्ठ जातीतल्या मुलाशी लग्न केल्याबद्दल एक आई आपल्या मुलीला दूर लोटू शकते, हा घराण्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आजही डावलता येत नाही.

जसविंदरचा आत्मविश्वास तेथील शिक्षणाने वाढतो आणि आपल्यासारख्या आपद्ग्रस्त स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी ती उत्तरायुष्यात कर्म निर्वाण सारखी स्वयंसेवी संस्था काढून समाज कार्य करीत राहते. यातूनही अनेकांना प्रेरणा मिळू शकेल. ❐

किंमत : २५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.

सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी
खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.००
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे,

पुस्तक परिचय

दहशतवादी सावटाखाली गुदमरणाऱ्या अफगाणिस्तान - पाकिस्तान मध्ये दुर्गम भागात मुलामुलींसाठी ५५ शाळा काढणाऱ्या अमेरिकन गिर्यारोहकाचे प्रांजल आत्मकथन

थ्री कप्स ऑफ टी



ग्रेग मोर्टेनसन, डेव्हिड ऑलिव्हर रीलीन अनु : सिंधु जोशी

'थ्री कप्स ऑफ टी' हे पुस्तक इ.स.२००६ मध्ये अमेरिकेत प्रथम प्रसिद्ध झाले आणि गेल्या पाच वर्षात त्याने ४० लाख प्रतींची मजल मारून एक इतिहास निर्माण केला. चार वर्षे अखंडपणे द न्यूयॉर्क टाइम्सच्या बेस्टसेलर पुस्तकांच्या यादीत त्याने स्थान पटकावले. टाइम साप्ताहिकाने एशिया बुक ऑफ दि इयर म्हणून त्याची निवड केली. पीपल्स मॅगेझिनने क्रिटिक्स अॅवार्ड देऊन त्याचा सन्मान केला. मॉन्टान ऑनर बुक अॅवार्ड, बॉर्डर्स बुकसेलर्स ओरिजिनल व्हाइसेस सिलेक्शन, बांफ माउंटन फेस्टिव्हल बुक अॅवार्ड, मॉम्स् चॉइस अॅवार्ड, किरीमाया पुरस्कार वगैरेंनी या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित केले. इटालीचा प्रिमिओ ग्रॅम्ब्रीन्सचा पुरस्कार, पोर्टलँडचे पॉवेल बुक्स पुडली अॅवार्ड, पॅसिफिक नॉर्थवेस्ट बुकसेलर्स असोसिएशनचे अॅवॉर्ड पटकावणाऱ्या या पुस्तकाने साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली आणि उच्च मानवी मूल्यांचा आविष्कार केला आहे, असे म्हटले गेले. एकोणिस भाषांमध्ये या पुस्तकाचे अनुवाद झाले.

१९९३ साली के-२ हे हिमालयातील शिखर सर करण्याच्या प्रयत्नात यश न मिळालेल्या डॉ. ग्रेग मॉर्टेनसन याला परतीचा रस्ता चुकल्याने पाकिस्तानातील कोर्फे या गावात यावे लागले. तेथील नागरिकांनी त्याला आश्रय दिला, त्याचे औषधपाणी केले, त्याची सेवाशुश्रुषा केली. त्यामुळे त्याला जणू पुनर्जन्मच लाभला. त्या खेड्यात मुलांसाठी शाळा नाही हे त्याच्या लक्षात आल्यावर त्याने 'मी परत या गावी येईन आणि या गावात शाळा सुरू करीन' असे गावकऱ्यांना आश्वासन दिले. ते आश्वासन त्याने पाळले. अनेक अडचणींचा आणि दहशतवादी शक्तींचा सामना करीत त्याने कोर्फेमध्ये शाळेची इमारत उभारली. लोकांच्या सहकार्याने आणखी ५५ शाळा बांधून शिक्षणाची सोय केली. मदरशात जाऊन आतंकवादी विचारांनी प्रभावित होणाऱ्या मुलांना व्यक्तिमत्त्व विकासाचे योग्य शिक्षण देण्याचा पर्याय उपलब्ध करून देऊन आतंकवादाचे मूळ कारण नष्ट करण्याचा हा प्रयत्न उत्तर पाकिस्तानच्या दुर्गम भागातील नागरिकांना स्वीकारार्ह वाटला. या कामासाठी सेंट्रल एशिया इन्स्टिट्यूटची (सीएआय) ग्रेगने स्थापना केली आणि इंटरनेटवरून आर्थिक मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला जगभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. ६ कोटी डॉलर्सचा निधी जमा झाला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी आपल्याला मिळालेल्या नोबेल पुरस्काराच्या रकमेतून एक लाख डॉलर्स या संस्थेला दिले. जॉन क्रॅकोरने ७५ हजार डॉलर्स दिले... दहशतवादाच्या विरोधात मॉर्टेनसन या एकांड्या शिलेदाराने दिलेल्या विधायक लढ्याची कहाणी 'थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकात आली आहे; या पुस्तकाने मॉर्टेनसनचे नाव जगभर पोचले.या पुस्तकाचे नाव वाचकांना बुचकळ्यात टाकणारे वाटेल. या नावामागे एक कहाणी आहे.

कोर्फे या खेड्यात शाळा बांधायचे मार्टेनसन ठरवतो. त्यासाठी गावातील

मातबर मुखिया हाजी अली हा मॉर्टेनसनशी शाळेबद्दल चर्चा करतो. पुढे प्रत्यक्ष कामाच्या दरम्यान गावकऱ्यांचे एकूण चालढकलीचे धोरण बघून तो उद्विग्न होतो. तेव्हा हाजी अली जवळ आपली नाराजी तो व्यक्त करतो. हाजी अली त्यावेळी चर्चा करण्याआधी त्याला चहाचे कपावर कप पिण्याचा आग्रह करीत असतो. मॉर्टेनसनला त्याचा हा वेळकाढूपणा अस्वस्थ करतो. त्याची चुळबुळ सुरू होते, तेव्हा हाजी अली त्याला सांगतो, "हे बघा, आमच्यात काही संकेत आहेत. कोणाही व्यक्तीबरोबर महत्त्वपूर्ण काम करायचे असेल तर तिच्याबरोबर आम्ही चहाचे तीन कप तरी घेतो. चहाचा पहिला कप घेताना ती व्यक्ती अनोळखी असते. दुसरा कप घेताना ती व्यक्ती आपली मित्र असते. तिसरा कप घेताना ती व्यक्ती आपल्या कुटुंबातीलच एक सदस्य म्हणून स्वीकारली जाते. कुटुंबातील व्यक्तीसाठी, कुटुंबासाठी आम्ही सर्वस्व पणाला लावतो. मागेपुढे बघत नाही." कोणतेही काम करताना सहकारी व्यक्तींना आपल्या आत्मीयतेने जवळ घेतले तर ते काम चांगले होते. कोणतेही काम करताना दुसऱ्यावर अरेरावी न गाजवता, केवळ आज्ञादेण्या ऐवजी, ते काम आत्मीयतेने करण्याबद्दल भ्रातृभाव निर्माण करणे गरजेचे असते. केवळ पैशाने किंवा सत्तेने कोणाला कामाला जुंपण्यात अर्थ नसतो असा एक बहुमोल संदेश या तीन कप चहाच्या प्रथेद्वारे मनावर ठसतो. 'तीन कप चहा' च्या संकल्पनेने पाकिस्तान-अफगाणिस्तानमधील अमेरिकन आणि परदेशी सैनिकांना तेथील लोकांशी समरस होण्याचा एक मार्ग खुला केला गेला. स्थानिक लोकांना तुच्छ लेखून, त्यांच्यावर जबरदस्ती करून, केवळ हुकूमशाही गाजवून आपल्याला त्यांचा विश्वास संपादन करता येणार नाही, त्यांच्याशी समरस होऊन त्यांच्या कुटुंबाचे सदस्य असल्यासारखा जिव्हाळा दाखवून त्यांना जवळ घ्यायला हवे, सांस्कृतिक दुरावा दूर करायला हवा हा जो संदेश या पुस्तकातून अमेरिकन सैनिकांना मिळाला तो विलक्षण प्रभावशाली ठरला. मुस्लीम मानसिकतेचे एक दार खुले करणारा ठरला. **मार्टेनसनच्या अगोदर मुस्लीम मानसिकतेचे अंतरंग जाणून घेणे कोणाला जमले नव्हते. या पुस्तकाचा त्यामुळे अमेरिकन सैनिकांवर खूप प्रभाव पडला.** म्हणून मुस्लीम राष्ट्रात जाणाऱ्या अमेरिकन सैनिकात चहा पिण्याचे प्रमाण वाढले. स्थानिक लोकांना गांवढळ, असंस्कृत तुच्छ न लेखता त्यांना सन्मानाने वागवणे, त्यांच्याबरोबर संवाद साधून त्यांचा विश्वास संपादन करणे, याचे महत्त्व 'चहाच्या तीन कपांच्या' उदाहरणाद्वारे त्यांच्या मानसिकतेमध्ये परिवर्तन घडवून आणणारे ठरले. अमेरिकन लष्कराने मार्टेनसनच्या या संदेशाचा कळत नकळत स्वीकार केला. मॉर्टेनसनने सांगितलेली ही गोष्ट खरी असावी आणि ती अफगाणी जनतेचा विश्वास संपादन करण्यात उपयुक्त ठरावी, शांतता प्रस्थापित करण्यास सहाय्यभूत ठरावी अशी भावना लष्करी अधिकाऱ्यांमध्येही दृढ होत आहे. मॉर्टेनसनला अनेक लष्करी तळांवर व्याख्यानासाठी आमंत्रणे देण्यात आली आणि

त्याच्या अनुभवांची गंभीरपणे दखल घेण्यात आली. दहशतवादाशी सामना करताना केवळ लष्करी बळावर मदार न ठेवता, सर्वसामान्य समाजाचे सहकार्य मिळवण्याचा पवित्राही उपयोगात आणणे श्रेयस्कर ठरू शकतो. अशी धारणा तेथे मूळ धरू लागली आहे.

अमेरिकेतील वेगवेगळ्या शहरात जाऊन मॉर्टेनसनने व्याख्याने दिली. इंटरनेटवरून शाळेसाठी मदतीचे आवाहन केले. परंतु त्याला आरंभी फारसा प्रतिसाद मिळाला नाही. पाकिस्तान-अफगाणिस्तानमध्ये अनेक गावांत शाळाच नाही; केवळ कुराणाचे शिक्षण देणारे मदरसे आहेत. त्या मदरशामधून कट्टर धार्मिकतेचे दहशतवादाचे धडे दिले जातात. त्यामुळे तेथील बहुसंख्य मुले दहशतवादी वृत्तीची बनतात. हा दहशतवादाचा संस्कार क्षीण करायचा असेल तर पाकिस्तान-अफगाणिस्तानमध्ये उदारमतवादाचे शिक्षण देणाऱ्या शाळांची गरज आहे, असा मॉर्टेनसेनचा युक्तिवाद होता. परंतु त्याचे महत्त्व अमेरिकनांना जाणवले नाही. पाकिस्तानच्या ग्रामीण डोंगराळ भागात अमेरिकेने शाळा काढण्यात काय स्वारस्य आहे हे अनेकांना उमजतच नव्हते.

सिॲटलमधून डॉ. जॉन हेरनी या शास्त्रज्ञाने मात्र या कल्पनेत रस दाखवला. त्याने इंटिग्रेटेड सर्किटचा शोध लावला होता. या सर्किटचा वापर सिलीकॉन चीपमध्ये होऊ लागला आणि चीपची माहिती साठवण्याची क्षमता खूप वाढणे शक्य झाले. त्यामुळे त्याला चांगली कमाई होऊ लागली. हेरनी प्रचंड बुद्धिमान होता, पण त्याचा कोणावर विश्वास नव्हता. कोट्यवधी डॉलर्सची त्याची संपत्ती होती. तरुणवयात एव्हरेस्ट सर करण्याच्या मोहिमेत तो सहभागी झाला होता. आता तो सत्तरीच्या घरात होता. हेरनीने मॉर्टेनसनला फोनवर विचारले, ''तुझ्या शाळेला किती खर्च येईल?''

''बारा हजार डॉलर्स.''

''ते मी तुला देईन, पण शाळेसाठीच ते वापरायला हवेत. शाळा बांधून झाल्यावर मला तिचा फोटो पाठव.''

मॉर्टेनसनच्या खात्यावर हेरनीने बारा हजार डॉलर्स जमा केले. विमान तिकिट वगैरे व्यवस्था करून मॉर्टेनसन इस्लामाबादला पोचला. रावळपिंडीतल्या हॉटेलात उतरला. हॉटेलचा रखवालदार अब्दुल त्याच्या शाळा बांधण्याच्या कल्पनेने थरारून गेला. एका आर्किटेक्टकडे जाऊन चार खोल्यांच्या दोन हजार चौरस फुटांच्या बांधकामाचा प्लॅन तयार करून घेतला. त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची यादी मिळवली. सिमेंट, लाकूड, कोरूगेटेड पत्रे, लोखंडी गज, हातोडे, खिळे, दरवाजे, खिडक्या वगैरे सामान ट्रंकमध्ये भरून तीन दिवस प्रवास करून स्कार्डूला पोचला. तेथून आठ तासांच्या अंतरावरच्या कोर्फे या गावी मॉर्टेनसनला जायचे असते. मोहमद अली चांगझी हा स्कार्डूतील ट्रॅव्हल एजंट मॉर्टेनसनच्या ओळखीचा होता. चांगझी म्हणजे चंगीझ खानच्या वंशातला. उंचसडक, सरळ नाक, निळे डोळे, कोरीव दाढी,

भरदार व्यक्तिमत्त्व. के-२ शिखरावरच्या मोहिमेची त्यानेच तयारी करून दिलेली. तो मॉर्टेनसनला सांगतो, ''आता विश्रांती घ्या. येथून पुढचा रस्ता लहान आहे. मोठा ट्रक चालणार नाही. लहान जीप हवी. तेव्हा हा ट्रक मोकळा करा. हे सामान माझ्या जागेत उतरवून ठेवा. उद्या काय करायचे ते बघू.''

मॉर्टेनसनला कोर्फेला सर्व सामान नेण्याची घाई. पण तेथील काही लोक म्हणाले, ''कोर्फे हे खूप दूरवरचे घाणेरडे गाव आहे. तितके लांब कशाला जाता? इथेच शाळा बांधा.''

पण मॉर्टेनसन कोर्फेला जातो. कोर्फे गावात जाण्यासाठी मधल्या नदीवरून जुनाट पाळणा असतो. तीनशे फूट लांब केबलवरून तो पाळणा पुढे पुढे सरकत नदीच्या दुसऱ्या तीरावर जातो. खाली शंभर फूट खोल ब्राल्डू नदीचा प्रवाह.

त्या दुसऱ्या तीरावर हाजी अली मॉर्टेनसनचे स्वागत करतो.

''मी शाळेचे वचन पूर्ण करण्यासाठी आलो आहे.''

''पण शाळेसाठी सामान कसे आणणार? या नदीवर आधी पूल बांधायला हवा. दगडी पूल. पूल झाला तरच शाळेचे साहित्य इथे आणता येईल. त्याशिवाय शाळा बांधता येणार नाही.''

चारशे फूट लांबीच्या तिहेरी पेडाची पाच रिळे त्या पुलासाठी लागणार होती. एकेक रिळ दीड लाखाचे. शिवाय दोन्ही बाजूंना दगडी बांधकाम.

त्यासाठी लागणारे दहा हजार डॉलर्स डॉ. हेरनी लगेच पाठवतात.

दहा आठवड्यांत २८४ फूट लांबीचा झुलता पूल तयार होतो. दोन्ही बाजूला कॉंक्रिटच्या कमानी. तीन मजले उंचीचा दगडांनी बांधून काढलेला पाया. केबलचे भक्कम जाळे. कोर्फेच्या लोकांचा विश्वासच बसेना.

आता शाळा बांधायला वर्षभराने परत यायला हवे , असे ठरवून मॉर्टेनसन चांगझीला भेटून अमेरिकेला परतला. त्याने जीन हेरनीला फोन केला. हेरनीने त्याला सिॲटलचे तिकिट पाठवले. हेरनीने पुलाचे फोटो दाखविले. ड्रॉइंग्ज, नकाशे बघितले. मॉर्टेनसनच्या कामाची प्रशंसा केली.

हेरनीचे एक निरीक्षण होते. अमेरिकन लोकांना बौद्धधर्मीयांबद्दल आपुलकी वाटते, पण मुसलमानांबद्दल वाटत नाही. मॉर्टेनसनचे काम त्यामुळे अवघड होते.

१३ सप्टेंबर १९९५ रोजी अमेरिकन हिमालयन असोसिएशनच्या बैठकीत सर एडमंड हिलरी यांचे व्याख्यान होते.हिलरी सांगतो, एव्हरेस्ट सर केल्याचे समाधान मला निश्चितच आहे; पण त्यापेक्षा जास्त समाधान मला मी तेथे पर्वतावर शाळा आणि दवाखाने सुरू केले याचे आहे.

तेथे तारा बिशप या सुंदर लाल केसांच्या थोराड तरुणीशी मॉर्टेनसनची भेट होते. तिचे वडील बॅरी फिशर १९६३ चे एव्हरेस्ट विजेते होते. १९९४ मध्ये ते एका

मोटार अपघातात जागेवरच मरण पावले होते.

मॉर्टेनसन हेरनी आणि जॉर्ज मॅककाऊन यांची आणि ताराची ओळख करून देतो. मॉर्टेनसन पाकिस्तानला जाण्याचा कार्यक्रम निश्चित करतो. त्याआधी ताराला म्हणतो, ''माझ्या आयुष्यात तुझे स्वागत करतो.'' ती म्हणते, ''माझ्या हृदयात मी तुझे स्वागत करते.'' त्यावेळी तारा मानसशास्त्रात डॉक्टरेट करीत असते. १९ सप्टेंबरला दोघांचे लग्न होते. त्यानंतर दोन आठवड्यांनी मॉर्टेनसन पाकिस्तानला येतो.

स्कार्डूला जाऊन चांगझीकडे जातो. पण चांगझी रावळपिंडीला गेलेला असतो. त्याच्याकडे ठेवलेले आपले शाळेच्या बांधकामाचे साहित्य निम्मेअधिक गायब झालेले त्याला दिसते. तेही परत मिळवताना मॉर्टेनसनला बाल्टिस्तानच्या सोशल वेलफेअर असोसिएशनचा डायरेक्टर गुलाम परवी याची मदत घ्यावी लागते. ''चांगझी पांढरे शुभ्र कपडे घालतो पण त्याचे हृदय मात्र काळेकुट्ट आहे'' असे परवी म्हणतो.

जीपमधून बांधकाम साहित्य कोर्फेला नेण्यात येते.

शाळेच्या पायाची खोदाई करण्यासाठी त्याने गतवर्षी हाजी अलीला पैसे दिलेले होते; पण खोदाई ऐवजी तेथे दगडांचे ढिगारे दिसत होते. हाजी अली म्हणतो,'' तू आमच्यासाठी एवढे करतो आहेस त्याबद्दल दयाळू अल्लाचे मी आभार मानतो. पण लक्षात घे, आम्ही कोर्फेचे लोक आज सहाशे वर्षे येथे शाळेशिवाय जगत आहोत. एका हिवाळ्याने काय फरक पडणार आहे?''

शाळेच्या कामासाठी हाजी अली गावकऱ्यांची बैठक घेतो. मशिदीत सर्व गावकरी नमाज पढतात. एका एडक्याचा बळी देऊन कोनशिलेच्या दगडावर त्याच्या रक्ताची धार सोडली जाते. कोर्फेतल्या प्रत्येक रहिवाशाला एडक्याच्या मांसाचा वाटा मिळतो. सर्वजण शेकोटीभोवती नृत्य करतात.

त्या हिवाळ्यात शाळेचे बांधकाम फारसे होत नाही.

मॉर्टेनसन अमेरिकेला परत जातो. थँक्सगिव्हिंग डेला डॉ. हेरनी मॉर्टेनसन आणि त्याची पत्नी तारा यांना घरी बोलावून घेतो. हेरनी त्याला नंतर सुचवतो. ''हिमालयात तू तुझे आवडीचे काम करत आहेस.. या कामातच तू तुझी कारकीर्द का घडवत नाहीस? मी एखादी संस्था स्थापन करून तिला कायमची देणगी देण्याची व्यवस्था केली तर तू या संस्थेचा डायरेक्टर होशील का? तुझे काम एकच.दरवर्षी एक शाळा बांधायची.. तुला कायम हे काम करता येईल.''

१९९६ मध्ये हेरनी सेंट्रल एशिया इन्स्टिट्युट या संस्थेची स्थापना करतो. मॉर्टेनसनला संचालक नेमून वर्षाला २१७९८ डॉलर्स वार्षिक पगार ठरवतो. पाकिस्तान-अफगाणिस्तानमध्ये दरवर्षी किमान एक शाळा सुरू करणे एवढीच अट. दहा लाख डॉलर्सचा निधी त्यासाठी देतो. योग्य त्या व्यक्तींची या कामासाठी नेमणूक करण्याचे अधिकारही मॉर्टेनसनला देतो. गुलाम परवीची तो मदत घेतो. परवी त्याला मखमल

हा वाकबगार गवंडी देतो.

मॉर्टेनसन मखमल गवंड्यासमवेत कोर्फे मध्ये त्या नव्या पुलावरून प्रवेश करतो. हाजी अली आपल्या या अमेरिकन मुलाला घट्ट मिठी मारतो. जून महिन्यात शाळेच्या भिंती हळूहळू वर चढत जातात. मॉर्टेनसनला हवा तो झपाटा मात्र नव्हता. तो प्रत्येक बाबतीत काटेकोर असे. कोणी बुट्टी मारली तर खवळून उठे. हाजी अली त्याला गंभीरपणे सांगतो, ''खूप वर्षांपासून हे पर्वत इथे आहेत. पर्वतांनी काय करावे हे तू सांगू शकत नाहीस; परंतु ते काय करायला सांगत आहेत हे ऐकायला तू शिकले पाहिजेस.. मी काय सांगतो ते तू ऐक. जरा तोंड बंद ठेवून शांतपणे बस. तू सगळ्यांना पार सळो की पळो करून सोडले आहेस.''

त्याचवेळी तो चहाच्या तीन कपांचा संकेत स्पष्ट करतो. बाल्टिस्तानात यशस्वी व्हायला हवे असेल तर आमच्या जीवनशैलीबद्दल आदर बाळगायला तू शिक. चहाचा तिसरा कप तू आमच्याबरोबर घेतोस तेव्हा तू आमच्या कुटुंबातील एक सभासद असतोस. कुटुंबासाठी वाटेल ते करायला आम्ही बाल्टी जमातीचे लोक तयार असतो. वेळप्रसंगी मरण सुद्धा पत्करतो. डॉ. ग्रेग, हे चहाचे तीन कप आमच्या संगतीने घेण्यासाठी तुला थोडा वेळ द्यावा लागेल. आम्ही अशिक्षित आहोत पण अडाणी नाही. या प्रदेशात आम्ही पिढ्यानुपिढ्या राहत आहोत. जगत आहोत. दीर्घकाळ तग धरण्यात यशस्वी झालो आहोत.'' (१६१-६२)

डॉ. ग्रेग मॉर्टेनसनला हा एक साक्षात्कारी क्षण वाटला. **''आम्हा अमेरिकनांना प्रत्येक गोष्टीची घाई असते. एखादा प्रकल्प उतावीळपणे पूर्ण करण्यापेक्षा माणसामाणसातील नातेसंबंध जपणे किती महत्त्वाचे असते, हे त्याने मला शिकवले. जेथे मी काम करत होतो तेथील लोकांना समजावून घेणे, त्यांच्यापासून चार गोष्टी शिकणे हे महत्त्वाचे होते. त्यांना शिकवणे हे महत्त्वाचे नव्हे.''**

...शाळेच्या भिंती तीन आठवड्यात पूर्ण उभ्या राहिल्या. चांगझीने चोरलेले नळीचे पत्रे न मिळाल्याने डॉ. ग्रेगने हिवाळ्यातही टिकून राहणाऱ्या लाकडी तुळया खरेदी केल्या. त्या कोर्फेत आणताना, अठरा मैलावर जमिनीची घसरण झाल्याने, अडथळा आला. कोर्फेतील लोकांनी रात्रभर जागरण करून त्या तुळया वाहून आणल्या.

''एक नास्तिक, अश्रद्ध माणूस मुस्लीम मुलांच्या जीवनात विष कालवायला आला आहे.. मुलींना शिकवणे अल्लाला मान्य नाही. ही शाळा बांधता कामा नये.'' असे म्हणून अश्कोलचा नुरमधर (प्रमुख) हाजी मेहदी शाळेला विरोध करतो. बारा बोकड घेऊन तो शेवटी शाळेला परवानगी देतो.

''हाजी मेहदीला आज फक्त अन्न मिळाले. कोर्फेतल्या आपल्या मुलांना कायमचे

शिक्षण मिळणार आहे. ''असे म्हणून हाजी अली गावकऱ्यांना तसल्ली देतो.

१० डिसेंबर १९९६ रोजी शाळेचे बांधकाम पूर्ण होते

मॉर्टेनसनला पैन पैचा हिशोब दिला जातो. मॉर्टेनसनला हाजी अली विचारतो, ''आता दुसरी शाळा कुठे बांधणार?''

''काही नक्की नाही.''

''मी एक सल्ला देऊ का? मी ब्राल्डू खोऱ्यातील वडीलधाऱ्यांची एक बैठक घेतो. शाळेसाठी जमीन व गावकऱ्यांचे श्रमदान देण्यासाठी तयार असणाऱ्या खेड्यांची माहिती मिळवतो.''

हेरनीचे फोनवर फोन. शाळेचे फोटो कधी मिळणार? तो हॉस्पिटलमध्ये अत्यवस्थ असतो.

मॉर्टेनसन कोर्फेहून निघतो. इस्लामाबादवरून अमेरिका गाठतो. ताराला घेऊन सात तास ड्रायव्हिंग करून हेरनीला हॉस्पिटलमध्ये भेटतो. रात्रीचे दोन वाजलेले असतात.

हेरनी थरथरत्या हातांनी फोटो बघतो.

''उत्तम. अत्युत्कृष्ट''. शाळेची भक्कम इमारत, तिच्यात शिकणारी सत्तर हसरी मुले.

तेथील नर्सला तो शाळेचे एक ८ बाय १० साइझचा फोटो भिंतीवर लावायला सांगतो. ''मी आता मरायला तयार आहे.'' असे उद्गार काढतो

१२ जानेवारी १९९७ रोजी हेरनीचे प्राणोत्क्रमण होते.

स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीत हेरनीला श्रद्धांजली अर्पण केली जाते.

... सेंट्रल एशिया इन्स्टिट्युटला हेरनीने दहा लाख डॉलर्सचा निधी मृत्युपत्रात ठेवलेला असतो.

मॉर्टेनसनला त्या संस्थेचे प्रमुखपदही दिलेले असते.

... पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये ५५ शाळा आज या संस्थेतर्फे चालू आहेत. जीन हेरनी प्रमाणे इतरही देणगीदार पुढे येऊ लागले आहेत.

९/११ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतरच्या गदारोळातूनही मॉर्टेनसनच्या कामाला खीळ बसली नाही. त्याच्या कामाची उपयुक्तता बावनकशी होती.

मॉर्टेनसनच्या या कामाची आणि जीवनदृष्टीची ही कहाणी प्रेरणादायक ठरली.

मॉर्टेनसनच्या या हकिकतीत खूप खोटेपणा आहे असे आता त्याच्याच सहकाऱ्याने, जॉन क्रॅकौरने लिहिलेल्या पुस्तकात म्हटले आहे. त्याचा शहानिशा होत राहील.

पण तरीही हे पुस्तक महत्त्वाचे आहे यात शंका नाही. ❐

किंमत : ३५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.

पुस्तक परिचय

असाध्य व्याधिग्रस्तांना दयामरणाचा पर्याय निवडता यायला हवा

युथनेशिया



स्वाती चांदोरकर

स्वाती चांदोरकर यांची 'युथनेशिया'ही कादंबरी 'देवमाणूस' म्हणून ख्याती असणाऱ्या डॉ. वेदान्त घैसास यांच्या वैद्यकीय कारकीर्दीशी, कौटुंबिक जीवनाशी निगडीत असून असाध्य व्याधींनी ग्रस्त असणाऱ्या रुग्णांना दयामरण देण्याच्या भूमिकेचे समर्थन करणारी आहे.

गेल्या २५/३० वर्षांपासून कोमात असणाऱ्या अरुणा शानभाग या मुंबईच्या परिचारिकेला दयामरण देण्याला हायकोर्टाने नकार दिला, त्याचवेळी 'युथनेशिया'चे प्रकाशन व्हावे हा एक योगायोगच म्हणायला हवा. दयामरणाच्या नैतिक बाजूवर बहुसंख्य लोक भर देतात; परंतु रुग्णाचे होणारे हाल आणि त्याच्या कुटुंबियांवर पडणारा आर्थिक भार यांचा व्यावहारिक विचारही महत्त्वपूर्ण ठरतो असा दृष्टिकोन मांडण्याचा या कादंबरी लेखनाचा उद्देश असावा असे दिसते.

डॉ. घैसास मुंबईजवळच्या काशीमीरा गावी हॉस्पिटल काढतात आणि ग्रामीण भागातील लोकांना उत्तम वैद्यकीय सेवा देऊन त्यांचा लोभ संपादन करतात. देवमाणूस म्हणून त्यांचा उल्लेख लोक करतात. एका खोलीत सुरू झालेले त्यांचे क्लिनिक आठ वर्षात चार खोल्यांचे तर चाळीस वर्षात दोन मजली आडव्या इमारतीत पंधरा जनरल आणि पाच स्पेशल वॉर्डस, ऑपरेशन थिएटर, आयसीयू, पाच डॉक्टर्स, तीस नर्सेस, चार वॉचमन, दोन ॲम्ब्युलन्स अशी नेत्रदीपक प्रगती करून ऐंशीवर पेशंटना एकावेळी सामावून घेण्याएवढे मोठे होते.

डॉ. घैसास यांची पत्नी वसुधा आणि कन्या विशाखा हॉस्पिटलच्या जवळच विसावा बंगल्यात राहात. विशाखाला उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवल्यावर आपल्या इंजिनियरिंगच्याच वर्गातील रौशन खान या तरुणाच्या ती प्रेमात पडते. रौशन खानशी परीक्षेनंतर लग्न करण्याचा मनोदय ती पत्राने कळवते. ''ही इज ए जन्टलमन. तो मुस्लीम आहे ही गोष्ट तुमच्या दृष्टिकोनातून विरोधाची आहे. अदरवाइज यू वुइल बी हॅपी टू नो हिम. प्लीज इथे या आणि त्याला भेटा. विश्वास ठेवा, तुमची मुलगी काहीही चुकीचं करत नाहीय.''

रौशनच्या वडिलांनी विशाखाला धर्म बदलायला सांगितले. तिने नकार दिला रौशनला म्हटले, विशाखाला धर्मांतर करायला सांग नाहीतर हे घर सोडून जा.

रोशन घर सोडून भाड्याने एक जागा घेतो. विशाखा त्याच्याबरोबर राहू लागते आणि लग्न करते.

ते कळल्यावर वसुधाला हार्ट ॲटॅक येतो आणि त्यातच तिचे निधन होते.

विशाखाला मुलगा होतो. त्याचे नाव रेहान ठेवण्यात येते. रौशनचा मांसाहार, मुस्लीम संस्कार रेहानवर होतात. विशाखावर मांसाहाराची सक्ती होते तेव्हा तिला

उलटी होते. रौशन तिला मारहाण करतो. त्यांची भांडणे बघण्याची रेहानला सवय होते... तो रौशनच्या आई वडिलांकडे सुटीत राहयला जातो तेव्हा एक अपघातात विशाखा व रौशन दोघे मरण पावतात. रौशनची डेड बॉडी त्याचे वडील घेऊन जातात, तिचे दफन होते. विशाखावर अंत्यसंस्कार करण्याचे काम रेहान मित्रांच्या मदतीने करतो. अभ्यासात त्याला रस उरत नाही. तो मादक द्रव्यांच्या आहारी जातो. मद्यपान करतो.. तशात त्याच्या घरावर रौशनचे वडील कब्जा करतात आणि रेहानला ते घराबाहेर काढतात. रेहान भारतात येतो. आपल्या आजोबांकडे, डॉ. घैसास यांच्याकडे राहतो. त्यांचे भावनात्मक ब्लॅकमेलिंग करत पैसे उडवत राहतो. डॉ. घैसास यांना त्याचे वागणे खूपच त्रासदायक ठरते. एकदा तर त्यांच्या गळ्यावर सुरी रोखून तो पन्नास हजार रुपयांची मागणी करतो. डॉक्टरांना त्यामुळे हादरा बसतो.

हे उपकथानक अशा तऱ्हेने युथनेशिया या कादंबरीत येऊन 'दयामरणा'चा कुठला पैलू प्रकट करते हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

डॉ. घैसास यांच्याकडे येणाऱ्या पेशंटपैकी काही असाध्य आणि अत्यवस्थ असतात. काही पेशंटची आर्थिक स्थिती वैद्यकीय उपचारांचा खर्च पेलण्याएवढी नसते. काहींची देखभाल करण्याची क्षमता कुटुंबियांमध्ये नसते. मुले, पत्नी, नातलग- सर्वजण दीर्घकाळ चालणाऱ्या आणि बरे होण्याची शक्यता नसणाऱ्या वैद्यकीय उपचारांना कंटाळतात. रुग्णालयांची बिले भरताना कफल्लक होतात.

डॉ. घैसास हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात खूपच गंभीर अवस्था असणारे पेशंट कायम असत. पेशंटला बरे वाटेपर्यंत सोडायचे नाही, आपल्या परीने त्याला जगवण्याचे प्रयत्न करीत रहायचे यावर त्यांचा कटाक्ष असे. डेली राऊंड घेताना त्यांचा प्रत्येक पेशंटशी संवाद होई. त्याची संपूर्ण हिस्टरी त्यांच्यासमोर असे.

मिसेस डिसूझा. वय ४२ क्रिटिकल केस. ब्लड प्रेशर. डायबेटिस. वजन प्रमाणाबाहेर जास्त गायनॅक प्रॉब्लेम. पंधरा दिवस अंडर ऑब्झरवेशन. खरं तर नो होप्स. कॅन्सरची शक्यता. ऑपरेशन.

शिवराम पाटील. वय २८. काशीमीरातल्या एका फॅक्टरीतला कामगार. शॉर्ट सर्किट होऊन लागलेल्या आगीत शिवराम साठ टक्के भाजला. चेहरा विद्रूप झाला. प्लॅस्टिक सर्जरीने चेहरा सुधारण्याची शक्यता डॉक्टरांना वाटते. पण शिवरामला त्याचा खर्च परवडणार नाही. आरशात तो आपला चेहरा पाहतो आणि गदगदू लागतो. मला वाचवलंच कशाला असे डॉक्टरांना विचारू लागतो. त्याचे लग्न ठरलेले असते पण त्याचे जळलेले विद्रूप झालेले शरीर बघून मुलगी नकार देते. शिवराम रॉकेल ओतून स्वत:ला जाळून घेतो. ''आता मला कुणी घाबरणार नाही''

म्हणत स्वत:शी हसत राहतो.

सौ. शिंदे. वय २१. हार्ट ट्रबल. हार्टला आवश्यक तेवढा ऑक्सिजन सप्लाय होत नाही. दम लागतो. प्रेग्नंट. मुलाचे वजन पेलताना त्रास होतो. हिमोग्लोबिन आणि आयर्न चेक करायला हवे. सोनोग्राफी हवी.

अशा मेंटल नोट्स् डॉ. घैसास सतत आळवत असतात. अगदी असाध्य अशा रुग्णांना हाताळताना त्यांच्या मनात दयामरणाचे विचार येऊ लागतात. त्या पेशंटच्या नातलगांची असहायता त्यांना अस्वस्थ करते. त्यांची आर्थिक कुचंबणा त्यांना भेडसावते.

फडणीसांची केस समोर येते. वय ८०. पॅरॅलिसिस. तीन मुले. पण त्यांचे फ्लॅटस लहान. कोणाकडेही आजारी बापाला ठेवण्याची क्षमता नाही. प्रत्येकाची ओढगस्त. थोरला मुलगा अमेय. वय ५५.त्याने स्वत:चे आयुष्य कधी जगायचे?

अशा व्यक्तींना दयामरण का देऊ नये? त्यानं कुणाचं काय नुकसान होणार आहे? त्यासाठी कायदा करा. त्याचा गैरफायदा घेऊ नये म्हणून कडक अटी ठेवा.

मनोमन ते फडणीसांची क्षमा मागतात, ''श्री. फडणीस. मी तुमचा अपराधी आहे. मी तुम्हाला दयामरण देऊ शकलो असतो. पण... पुन्हा अशी चूक मी करणार नाही. मी सोडवेन अशांना. अगदी नक्की! मी वचन देतो तुम्हाला.''

डॉ घैसास मनाचा निर्धार करतात.

सौ. रावत यांची केस येते. एड्स. नवरा कारखान्यात मोठा अधिकारी. तो बायकोला आपल्या वृद्ध मावशीकडे खेड्यात धाडतो. मावशीचा मृत्यू झाल्यावर अस्थिपंजर झालेल्या सौ. रावतना घैसास हॉस्पिटलमध्ये आणतो. तिच्यात सुधारणा होण्याची शक्यता दिसत नाही. पुन्हा आयसीयूमध्ये ॲडमिट. नवरा नंतर भेटायला येतच नाही. सौ. रावतच्या नजरेत ओतप्रोत कारुण्य. या वेदनांतून वाचवा. ''डॉक्टर, तुम्हीच मला मुक्ती देऊ शकता'' हा भाव.

डॉ. घैसासना वाटते, '' हिला एकच सुटका अपेक्षित आहे.'' एक भरलेली सिरिंज आयव्हीच्या उलट्या बाटलीत रिकामी करून ते सौ. रावतना मायेने थोपटतात.

आय सी यू कॉट नं. ४ वरचा हा पहिला मृत्यू. पोस्ट मार्टेम होते. त्यामध्ये आक्षेपार्ह काहीही सापडत नाही. रावत कुटुंबियांनाही हायसे वाटते.

कुमार सुशील रॉय. वय १८ विडी, तंबाखू, गुटखा, सिगरेट,हुक्का, फ्लेवर्ड धूर. टॉक्सिन्स, आर्टरिज् ब्लॉक. ॲथरोस्कॅरोसिस. मेडिसिनने रिकव्हरी शक्य पण ती एक प्रदीर्घ प्रोसेस.

फडणीस पुन्हा घैसास हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होतात. रोजचा खर्च साडेतीन

हजार. पुन्हा तब्येत सुधारत नाहीच.

फडणीस जातात. त्यांचा मुलगा येतो तेव्हा डॉ. घैसास त्याचे सांत्वन करतात. ''तुम्ही तुमच्या कुवतीनुसार सर्व काही केले. तुम्ही त्यांना इतकी सर्व सांभाळलेत.. तेव्हा गिल्टीफिलिंग मनातून काढून टाका. यू हॅव डन युवर पार्ट ऑफ ड्युटी.''

डॉ. घैसास ध्यानमंदिरात जातात. शांत निळसर प्रकाश, पवित्र प्रकाश त्यांना शांत शांत करतो. दहा पंधरा सेकंद व्हेंटिलेटरचे बटन बंद... मग सर्व शांत. समाधान. एक वेगळीच अनुभूती. चमत्कारिक पण अद्‌भुत.

... असे सत्र मग चालू राहते. आयसीयू कॉट नं. ४ बद्दल दंतकथा फैलत जातात..

कोणाला काही आक्षेपार्ह सापडत नाही... एक दिवस डॉ. घैसास स्वतःच आयसीयू कॉट नं.४ वर ॲडमिट होतात.

त्यांची मानलेली डॉक्टर कन्या त्यांना म्हणते, ''तुम्ही एक महान कलाकार आहात, पपा. कितीतरी हृदयं तुम्ही तुमच्या कलेने धडधडत ठेवली आहेत, हे मी कधी विसरणार नाही. बंद पडलेल्या हृदयांपेक्षा धडधडणाऱ्या हृदयांची संख्या कितीतरी पटीने जास्त आहे. तुम्ही निश्चिंत राहा. बेड नंबर ४ लकी आहे, असे आजपासून सिद्ध होईल, मी ते सिद्ध करून दाखवीन. तुम्ही आम्हाला हवे आहात.''

दयामरणाचा संदेश देणारी ही कहाणी त्यामुळे मनात घर करून राहते.

❒

किंमत : २२०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.

वाचकमित्रहो,

आपल्या अखंड प्रेमामुळे **'मेहता मराठी ग्रंथजगत'** हे वाङ्‌मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय झाले आहे. या अंकातील 'वाचकांचा प्रतिसाद' या सदरासाठी आपण 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वाचलेल्या पुस्तकांविषयी प्रतिक्रिया जरुर कळवाव्या.

पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वारा-मेहता मराठी ग्रंथजगत, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.

नवे कोरे

हात विधात्याचे



डोरोथी क्लार्क विल्सन
प्रस्तावना
फिलिप यॅन्सी

अनु. **नीला चांदोरकर**

२९०रु. पोस्टेज ३०रु.

'टेन फिंगर्स फॉर गॉड' हे पुस्तक म्हणजे डॉ. पॉल ब्रॅन्ड या तपस्व्याची विलक्षण जीवनगाथा.

आपले संपूर्ण आयुष्य आणि वैद्यकीय ज्ञान त्यांनी जगभरातल्या कुष्ठरोग्यांच्या हालअपेष्टा दूर करण्यासाठी वेचले. शस्त्रक्रियांद्वारे, संशोधनाद्वारे, इतरांना दिलेल्या प्रेरणेद्वारे - आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे समाजाने दूर लोटलेल्या गरीब कुष्ठरोग्यांना दाखविलेल्या सहानुभूतीमुळे त्यांना वैद्यकीय जगतातच नव्हे तर जनमानसातही अलौकिक स्थान लाभले.

वेदनेचे मानवी आयुष्यातील स्थान त्यांना फार महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, शारीरिक वेदना हे मनुष्यमात्राला परमेश्वराने दिलेले एक वरदान आहे. वेदना आहे म्हणून माणूस टिकून आहे.

डॉ. ब्रॅन्ड हे शल्यविद्याविशारद तसेच उत्कृष्ट शिक्षक आणि पर्यावरणवादी आहेत.

स्वार्थ, त्याग आणि नम्रता यांचे विलक्षण मिश्रण डॉ. पॉल ब्रॅन्ड यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळते.

आगामी

कृष्णायन

काजल ओझा-वैद्य

अनुवाद

प्रा. सुधीर कौठाळकर

२००रु. पोस्टेज २५रु.



''स्त्रिया एकमेकींपेक्षा वेगळ्या का बरं नसतात....?''

द्रौपदीच्या महालात घडलेली घटना डोळ्यांसमोर येऊन, अश्वत्थाखाली बसलेल्या कृष्णाच्या मनात अनेक विचार येत होते....

''कोणत्याही युगात, कोणत्याही वयाची स्त्री एकसारखाच का बरं विचार करते? एकसारखाच अनुभव का घेते? समान बाबतीत वेदना अनुभवते? का बरं एकसारख्या गोष्टीबद्दल रागावते? राग व्यक्त करण्याची रीत पण एकसारखीच का असते....?'' कृष्णाच्या मनात प्रश्न आले आणि त्यावर तो स्वत:च हसलाही.

या प्रश्नांना आता काही अर्थ होता का? आयुष्य जगून झालं होतं... ''आपल्या जीवनात आलेल्या महत्त्वाच्या तीनही स्त्रिया आपल्याबद्दल एकसारख्याच संवेदना का अनुभवत होत्या? एकाच पध्दतीनं दुःखी का होत होत्या? आणि का एकसारख्याच तीव्रतेनं आपल्यावर प्रेम करत होत्या?...'' खरं तर असा विचार करण्याची वेळही आता निघून गेली होती. आता होतं ते... केवळ स्मरण...!

प्रत्यक्ष दृष्टीसमोर त्या स्त्रिया नव्हत्याच. तरीही त्या तिघींचे डोळे त्याच्याकडे बघत होते... आशेनं, अपेक्षेनं, उपहासानं ...

प्रेयसी... पत्नी... आणि सखी... त्या तिघी जणी... खळाळणाऱ्या प्रवाहाबरोबर वाहात जणू म्हणत होत्या... ''तुझ्यात विलीन होण्यातच आमच्या जीवनाचं सार्थक आहे. तुझा खारटपणा स्वीकार्य आहे. कारण तूच आम्हाला विशालता दिलीस, अमर्याद पसरण्याचा अस्तित्वबोध तूच दिलास... आमचं प्रखर तेज सामावून घेऊन आम्हाला तूच शीतलता दिलीस ... आमचं स्त्रीत्व स्वीकारून अखंड प्रेम दिलंस ....''

आगामी

अल्टिमेटम

मूळ लेखक **मॅथ्यू ग्लास**

अनुवाद **सुदर्शन आठवले**



४४०रु. पोस्टेज ३०रु.

सन २०३२, ज्यो बेंटन अमेरिकेचा अठ्ठेचाळीसावा प्रेसिडेंट म्हणून निवडून आला होता. विजयाच्या घोषणेनंतर लगेच आधीच्या प्रेसिडेंटबरोबर झालेल्या त्याच्या भेटीत त्याला सांगण्यात आलेल्या एका प्रखर सत्याने राष्ट्राध्यक्षपदाची विजयमाला गळ्यात पडण्यापूर्वीच त्यातील काट्यांची बोच त्याला जाणवू लागली आणि त्या सत्याने मिळवलेल्या गौरवशाली विजयाची धुंदीही खाडकन उतरवली. पर्यावरणातील बदलांमुळे निर्माण झालेल्या 'ग्लोबल वॉर्मिंग'चे - जागतिक तपमानवाढीचे - परिणाम महासागरातल्या पाण्याची पातळी वाढण्यात दिसू लागले होते. ती पातळी किती वेगाने आणि किती प्रमाणात वाढेल यांविषयी तज्ज्ञांनी, संशोधकांनी जे आकडे यापूर्वी प्रसिद्ध केले होते ते फार फार कमी धरले गेले होते. सत्य हे होते की ते बदल प्रचंड वेगाने घडत होते आणि जग विनाशाच्या कड्यावरच उभे होते.

वायुवेगाने हालचाली करून पर्यावरणाचा तोल सांभाळण्यासाठी आवश्यक ती कार्बन उत्सर्जन कपात प्रत्येक देशाने केली नाही तर जगाचा विनाश जवळ होता आणि अटळ होता. जगातील सर्वात जास्त प्रदूषण निर्माण करणाऱ्या चीन या देशाच्या शासनाबरोबर आधीच्या प्रेसिडेंटनी कार्बन कपातीसंबंधी गुप्तपणे बोलणी सुरू केली होती. तीच चर्चा पुढे नेऊन त्या जागतिक समस्येवर तातडीने तोडगा काढून ज्यो बेंटन स्वत:च्या देशाला आणि संपूर्ण जगाला वाचवण्याचा प्रयत्न करणार होता. राजकारण्यांच्या निर्दयी कारस्थानांनी जगातल्या दोन 'महासत्ता', चीन आणि अमेरिका महाभयंकर अण्वस्त्रांच्या महायुद्धात समोरासमोर उभ्या ठाकल्या.

त्या युद्धाने ज्यो बेंटनच्या मनोबलाची, तत्त्वनिष्ठेची कसोटी पाहिली. तो त्या कसोटीला पुरेपूर उतरला. येणाऱ्या पिढ्यांना त्याने एका सुंदर, सुरक्षित जगाची हमी दिली पण त्यासाठी त्याला आपली पुढची पिढी गमवावी लागली !!

'पर्यावरणाच्या राजकारणा'ची आणि त्यापासून जगाला वाचवण्याची शर्थ करणाऱ्या अमेरिकेच्या ध्येयवादी प्रेसिडेंटची खळबळजनक कथा !!

पुरस्कार

* अवचट यांना आचार्य अत्रे पुरस्कार

आचार्य अत्रे यांच्या नावाने दिला जाणारा 'साहित्यिक पुरस्कार' ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांना 'कलावंत पुरस्कार' नाट्य व चित्रपट अभिनेते जितेंद्र जोशी यांना आणि 'पत्रकारिता पुरस्कार' मुंबईतील ज्येष्ठ पत्रकार प्रताप थोरात यांना देण्यात आला.

अत्रे पुरस्कारांचे हे एकविसावे वर्षे असून, १३ जून रोजी या पुरस्काराचे वितरण झाले. साहित्यिक पुरस्काराचे मानकरी डॉ. अवचट यांनी बावीस पुस्तके लिहिली आहेत. मजुरांचे शोषण, अस्पृश्यता, वेश्या, देवदासी याविषयी त्यांनी लेखन केले आहे. त्यांची काही पुस्तके विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात आहेत, तर जितेंद्र जोशी यांनी 'वाऱ्यावरची वरात', 'ऑल द बेस्ट', 'श्री चिअर्स', 'मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी' आदी नाटकांत काम केले आहे. 'गोलमाल', नो प्रॉब्लेम', 'सुंबरान', 'गुलमोहर' या चित्रपटांसाठी त्यांना राज्य पुरस्कार मिळाला आहे. पत्रकारिता पुरस्कारासाठीचे मानकरी प्रताप थोरात हे ४१ वर्षे इंग्रजी माध्यमात पत्रकारिता करीत आहेत.

* जयश्री टी. यांना दादा कोंडके पुरस्कार

'शाहीर दादा कोंडके स्मृती गौरव पुरस्कार' यावर्षी चित्रपट अभिनेत्री जयश्री टी. यांना ३० मे रोजी डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते देण्यात आला. स्मृतिचिन्ह व पंचवीस हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. दादा कोंडके यांच्या आठवणींवर आधारित 'सोंगाड्या म्हणतोय वाजवू का?' या दृक-श्राव्य कार्यक्रमात 'विच्छा माझी पुरी करा' ते 'वाजवू काय?' असा प्रवास दाखविण्यात आला.

* सावरकर पुरस्कार

हिंदुस्थानला अनेक समस्यांनी घेरले आहे. चोहोबाजूंनी लचके तोडण्याचे प्रकार सुरू असून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार अमलात आणणे, हाच त्यावरचा उपाय

आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे आपले दैवत असून, त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे हे आपले भाग्य आहे, अशा शब्दांत प्रसिद्ध अभिनेते शरद पोंक्षे यांनी भावना व्यक्त केल्या.

निनाद, पुणे तर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त माजी कुलगुरू प्रा. डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांच्या हस्ते शरद पोंक्षे यांना 'राष्ट्रसंजीवक स्वा. सावरकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

डॉ. नवलगुंदकर म्हणाले, सावरकरांनी जो राष्ट्रवादाचा मंत्र दिला, तो समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम पोंक्षे करत आहेत.

*** विद्या बाळ यांना आगरकर पुरस्कार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे देण्यात येणारा 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकर पुरस्कार यंदा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांना ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते आगरकर यांच्या स्मृतिदिनी प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या रझिया पटेल या यावेळी उपस्थित होत्या. स्वातंत्र्यसैनिक अनंत साठे यांच्या देणगीतून हा पुरस्कार देण्यात येत असून सन्मानपत्र आणि अकरा हजार रुपये असे त्याचे स्वरूप आहे.

*** लीला गांधी यांना 'माणूस पुरस्कार'**

'रंगत संगत प्रतिष्ठान' आणि 'साहिल फाउंडेशन' यांच्या वतीने दिला जाणारा 'माणूस पुरस्कार' यावर्षी ज्येष्ठ नृत्यांगना व अभिनेत्री लीला गांधी यांना पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक प्रताप दिघावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रोख पाच हजार रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

दिघावकर म्हणाले, 'आज कलेला पूर्णपणे समर्पित होणारे कलाकार अभावानेच दिसतात. आज एखाद्याच्या लग्नाचा हळदी समारंभ असो नाहीतर दुकानाची फीत कापायची असो, त्यातून पैसे किती मिळतील याकडेच बऱ्याच कलाकारांचे लक्ष दिसते.पण यात कुठेतरी कलेचा आत्मा विकला जात आहे. जुन्या काळातील लावणी नृत्यांगना विठाबाई यांच्यासारखे कलेच्या पायी समर्पण हवे. हीच वृत्ती लीलाताईंच्या ठायी भरभरून आढळते. ज्येष्ठ अभिनेती सुहासिनी देशपांडे यावेळी उपस्थित होत्या. त्यांनी लीलाताईंच्या कामाच्या शिस्तीबद्दलच्या आठवणी सांगितल्या. याप्रसंगी प्रतिभा मोडक, रंगत-संगतचे अध्यक्ष व मुख्य विश्वस्त ॲड. प्रमोद आडकर, मनीष खाडिलकर आदि उपस्थित होते.

* निलेगावकर यांना पुरस्कार

'अस्सल माणसं इरसाल नमुने' या विनोदी एकपात्रीचे सादरकर्ते प्रभाकर निलेगावकर यांना या वर्षीचा अखिल भारतीय नाट्य परिषदेचा कमलाकर वैशंपायन स्मृती पुरस्कार १४ जून रोजी यशवंत नाट्य मंदिर माटुंगा येथे देण्यात आला. पुलंच्या 'बटाट्याची चाळ' व 'वऱ्हाडकार डॉ. लक्ष्मण देशपांडे यांच्या 'वऱ्हाड निघालंय लंडनला' या एकपात्रीच्या मालिकेत ४८ व्यक्तिरेखांनी हसविणारा त्यांचा एकपात्री आहे. गेल्या २० वर्षांत त्यांचे ९४८ प्रयोग महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशात झाले आहेत.

* हेरिटेज इन्स्टिट्यूटला 'ब्रँड्स अकादमी पुरस्कार'

व्यवस्थापन क्षेत्रात प्रतिष्ठेचा गणला जाणारा ब्रँड्स अकादमी पुरस्कार आग्रा येथे मुख्यालय व वास्को येथे कॅम्पस् असलेल्या हेरिटेज इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड टुरिझम या हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रातील नामांकित संस्थेला प्रसिद्ध लेखक चेतन भगत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. नीतू कपूर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

* राष्ट्रीय दृष्टिहीन संघातर्फे पुरस्कार

राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्राच्या ३४व्या वर्धापनदिनानिमित्त ५ जून रोजी जागृती अंध मुलींची शाळा, आळंदी देवाची, मरकळ मार्ग येथे डॉ. किसनमहाराज साखरे यांच्या हस्ते अंधअपंगांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

पुण्यातील वसुधा गोखले यांना 'संघमित्र सन्मान दृष्टी पुरस्कार', शेख सय्यद नान्डू, मुंबई यांना 'लुई ब्रेल स्मृती पुरस्कार' व स्टेट बँक ऑफ इंडियाला 'लेफ्टनंट जी.एल. नर्डेकर स्मृती पुरस्कार' देण्यात आले. प्रत्येकी सात हजार रुपये, शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

* नटरंग प्रतिष्ठान कलागौरव पुरस्कार

रंगभूमीवर काम केल्यामुळे कलाकारांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होतो. त्यामुळे तो कोणत्याही परिस्थितीला आत्मविश्वासाने सामोरा जातो. त्यासाठी रंगभूमीचे संस्कार प्रत्येक कलाकारावर होणे गरजेचे आहे, प्रसिद्ध सिनेअभिनेते भरत जाधव यांनी असे नमूद केले.

नटरंग ॲकॅडमीतर्फे शाहीर मधू कडू यांच्या स्मरणार्थ 'नटरंग प्रतिष्ठान कलागौरव

पुरस्कार' श्री. जाधव यांना आमदार गिरीश बापट यांच्या हस्ते देण्यात आला. जाधव म्हणाले, ''आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या जीवनात लोकांना थोडासा विरंगुळा देण्यासाठी, थकून घरी आल्यानंतर थोडेस रिलॅक्स होण्यासाठी मी विनोदी मालिका, चित्रपट व नाटक करत आहे. त्यामुळे काही लोकांना माझ्या अभिनयात तोचतोपणा दिसतो. विनोदी अभिनयापेक्षा मी वेगळे काही करू शकत नाही, हा त्यांचा समज झाला होता. तो दूर करण्यासाठी मी काही वेगळ्या भूमिकाही केल्या आहेत. मात्र, विनोद हेच माझे ध्येय आहे. यावेळी अ‍ॅकॅडमीच्या उत्कृष्ट कलाकाराचे पारितोषिक आदित्य थोपटे याला देण्यात आले. जतिन पांडे यांनी अ‍ॅकॅडमीची माहिती दिली.

* नाट्य परिषद जीवनगौरव पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा 'जीवनगौरव पुरस्कार' मराठी संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक-अभिनेते प्रसाद सावकार आणि ज्येष्ठ गायिका- अभिनेत्री जयमाला शिलेदार यांना गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनी म्हणजेच १४ जून रोजी देण्यात आला

पंचवीस हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. जयमाला शिलेदार आणि प्रसाद सावकार हे दोघेही गेल्या पाच दशकांहून अधिक काळ संगीत रंगभूमीवर कार्यरत आहेत. जीवनगौरव पुरस्काराबरोबरच अन्य ६२ विविध पुरस्कार देण्यात आले. पुरस्कारांचे यंदाचे ८० वे वर्ष आहे.

प्र.ल. मयेकर, विजय कदम, डॉ. शिरीष आठवले, कल्पना साने, चंद्रकांत माजलकर, मुकुंद मराठे, ज्ञानेश पेंढारकर, प्रदीप मुळे, शेखर ढवळीकर, वसंत इंगळे, किरण माने, रवींद्र खरे, जितेंद्र जोशी, समीर विद्वांस, उमेश कामत, ओंकार पाटील, श्रीकांत करगुटकर, स्वरांगी मराठे, प्रदीप कबरे, विठ्ठल हुलावळे, सुभाष चांदूरकर, माणिक कानडे, अरविंद पिळगावकर, भूषण कडू, अनंत भावे, आनंद म्हसवेकर, पूर्णिमा अहिरे, मंगला सावंत, राजीव परांजपे, गुरुनाथ वठारे, प्रभाकर निलेगावकर, शारदाकुमार शिर्सेकर, मकरंद हिंगणे, मेघा भागवत, प्रदीप रांगणेकर, डॉ. आनंद परांजपे, दिगंबर आगाशे, राजा दळवी, गोट्या सावंत, राजन ताम्हाणे, विनय चव्हाण, अद्वैत दादरकर, कविता जोशी शिरपूरकर, भालचंद्र पानसे, अनिल परब, प्रिया बापट, विद्याधर बानकर आदींना हे पुरस्कार देण्यात आले.

एकदंत क्रिएशनच्या 'नवा गडी नवं राज्य' या नाटकाला 'अल्बा पंडित' स्मृती मराठी रंगभूमी पारितोषिक तर कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे पुरस्कृत नाट्यचार्य काकासाहेब खाडिलकर गौरव पारितोषिकाचा मान मुंबई मराठी साहित्य संघाच्या 'संगीत मानापमान' नाटकाला देण्यात आला.

* पुणेकर कलावंतांचा सन्मान

बालकलावंतांपासून ते राष्ट्रीय पुरस्कारापर्यंत कर्तृत्वाची मोहोर उमटवत पुण्याच्या वैभवात भर घालणाऱ्या 'पुणेकर' कलावंतांचा सन्मान अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या ३३व्या वर्धापन दिनी सांस्कृतिक मंत्री संजय देवतळे, ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, महापौर मोहनसिंग राजपाल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. नुकताच राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झालेले मूळचे पुणेकर रंगभूषाकार विक्रम गायकवाड आणि पटकथा लेखक संजय पवार यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. अश्विनी एकबोटे, प्रसाद ओक, श्रुती मराठे यांच्यासह राहुल देशपांडे, मृण्मयी देशपांडे, कीर्ती शिलेदार या कलावंतांच्या सादरीकरणाला रसिकांनी भरभरून दाद दिली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, उपाध्यक्ष शशिकांत कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह सुरेश देशमुख यांच्यासह इतर पदाधिकारी या प्रसंगी उपस्थित होते.

* 'यूआरएल फाउंडेशन'चे पुरस्कार

सामाजिक कार्यकर्ते सिंधुताई सपकाळ, पोपटराव पवार, प्रवीण पाटकर, प्रीती पाटकर यांना यूआरएल फाउंडेशन (उदय राजाराम लाड फाउंडेशन) सामाजिक गौरव पुरस्कार तर ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना साहित्य जीवनगौरव पुरस्कार रवींद्र नाट्यमंदिर येथे २९ मे रोजी देण्यात आले. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

'यूआरएल फाउंडेशन'तर्फे गेली अकरा वर्षे असून सामाजिक कार्य, साहित्य, क्रीडा इत्यादी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हे पुरस्कार देण्यात येतात. एक लाख रुपये व मानचिन्ह असे 'सामाजिक गौरव पुरस्कारा'चे तर २५ हजार रुपये व मानचिन्ह असे 'साहित्य जीवनगौरव पुरस्कारा'चे स्वरूप आहे. 'गजलगौरव' व 'गजलउन्मेष हे नव्याने सुरू करण्यात आलेले पुरस्कार इलाही जमादार व विजय आव्हाड यांना देण्यात आले. ❐



आभाळ

५वी आवृत्ती

शंकर पाटील

शंकर पाटील यांचं ग्रामीण 'माणूस' समजून घेण्याचं कसब दाखवणारा कथा संग्रह नव्या रुपात

१००रु. पोस्टेज २०रु.

वाद-संवाद

लेखकांची पळवापळवी

(महाराष्ट्र टाइम्स मध्ये दि. ५ जून २०११ रोजी प्रसिद्ध झालेला श्री. मुकुंद कुळे यांचा लेख)

मराठी प्रकाशन व्यवसायात सध्या त्सुनामी आल्याचं वातावरण आहे आणि त्याला कारणीभूत ठरलेत पुण्यातील 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे सुनील मेहता.

आजवर वि.स. खांडेकर, शंकर पाटील, व.पु. काळे अशा नामांकित आणि खपाऊ लेखकांच्या पुस्तकांचे सर्वाधिकार सुनील मेहता एकरकमी खरेदी करत आलेत. त्यांच्या या कृतीबद्दल मराठी प्रकाशकांत नाराजी असली, तरी आतापर्यंत त्याबद्दल कुणी जाहीरपणे आवाज उठवला नव्हता. परंतु नुकतेच मेहतांनी व्यंकटेश माडगूळकर यांच्या सर्व पुस्तकांचे सर्वाधिकार एकरकमी खरेदी केले आणि प्रकाशकांचं धाबं दणाणलं. कारण व्यंकटेश माडगूळकर खपाऊ लेखक होतेच, पण त्यांच्या पुस्तकांचे हक्क वेगवेगळ्या प्रकाशकांकडे होते. माडगूळकरांनी तर आपली अनेक पुस्तकं तेव्हा मुद्दाम अनेक नवख्या प्रकाशकांनाही दिली होती. त्यामागे नव्याने या व्यवसायात येणारा प्रकाशक आणि मराठी साहित्य व्यवहार तगला पाहिजे, ही त्यांची भावना होती. परंतु सुनील मेहता यांनी त्या उद्देशालाच हरताळ फासल्यामुळे, त्यांच्या या धंदेवाईक वृत्तीची झळ बसलेले सगळे प्रकाशक सध्या एकत्र आले आहेत आणि त्यांनी सुनील मेहता यांना कोर्टात खेचण्याचा निर्णय घेतला आहे.

आतापर्यंत मराठी प्रकाशन व्यवसाय मुख्यत: लेखक आणि प्रकाशकांच्या वैयक्तिक संबंधांवर आधारलेला होता. त्यामुळे पुस्तक काढताना कागदोपत्री करार-मदार झाले, तरी एकूणच व्यवहारात व्यावसायिक भाग कमी असायचा. महत्त्वाचं म्हणजे लेखन हे आजवर कधीच कुठल्याही लेखकाचं उदरनिर्वाहाचं साधन नसल्याने कागदोपत्री व्यवहाराकडे लेखकाने कधीच काटेकोरपणे पाहिलेलं नव्हतं. तसंच प्रकाशकही याकडे धंद्यापेक्षा एक 'साहित्य व्यवहार' म्हणूनच पाहात होते. परिणामी लेखक-प्रकाशकांमध्ये आर्थिक व्यवहारावरून कधी फारसे वाद उद्भवले नव्हते.

मात्र पुस्तकविक्रेता म्हणून प्रकाशन व्यवसायात आलेल्या मेहतांनी या 'व्यवसाया'तला 'धंदा' ओळखला आणि तीस वर्षांपूर्वी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' ही स्वत:ची

प्रकाशनसंस्था सुरू करून अल्पावधीतच जमही बसवला. पाच-दहा वर्षांपूर्वी जेव्हा सारेच प्रकाशक ‘ पुस्तकं खपत नाहीत’, अशी बोंब मारत होते, तेव्हा जाहिरातीच्या बळावर सुनील मेहता आपल्या पुस्तकांची जोरदार विक्री करत होते. तसंच अनुवादित पुस्तकांचा यशस्वी फंडाही राबवत होते. मात्र त्याच वेळी त्यांनी आपला पक्का मारवाडी व्यावसायिक ‘पैंतरा’ वापरायला सुरुवात केली. त्यात पहिला बळी गेला तो ‘पानिपतकार’ विश्वास पाटील यांचा. तोपर्यंत ‘राजहंस प्रकाशन’चे लेखक अशी ओळख असलेल्या विश्वास पाटील यांना सुनील मेहता यांनी एकरकमी दहा लाख रुपये मानधन देण्याचं आमिष दाखवलं आणि पाटील यांची ‘संभाजी’ कादंबरी मेहतांकडे गेली. मेहतांनी ‘कॉन्टिनेन्टल प्रकाशन’चे लेखक ‘मृत्युंजय’कार शिवाजी सावंत यांना ‘युगंधर’साठी , ‘मॅजेस्टिक’च्या ‘अन्नपूर्णा’कार मंगला बर्वे, ‘उत्कर्ष प्रकाशन’चे डॉ. ह.वि. सरदेसाई अशा अनेकांना एकरकमी मानधन देऊन आपल्या गोटात खेचण्याचा प्रयत्न केल्याचं म्हटलं जातं.

हे जुने लेखक नैतिक मूल्यं जपणारे असल्यामुळे त्यांनी मेहतांना नकार दिला. परंतु हयात नसलेल्या लेखकांची पुढची पिढी मात्र ‘सॉफ्ट टार्गेट’ ठरली. वि.स. खांडेकर, रणजित देसाई, शंकर पाटील. व. पु. काळे हे लेखक याच पद्धतीने मेहतांकडे आले. कारण एका पुस्तकाच्या जेमतेम दहा-पंधरा हजार मानधनासाठी (मराठीत आजही पाच ते पंधरा टक्केच रॉयल्टी दिली जाते.) वर्षानुवर्षं वाट पाहण्यापेक्षा आणि त्याचा हिशेब ठेवण्यापेक्षा लेखकांचे वारसदार पुस्तकाचे हक्क मेहतांना हक्क विकून मोकळे होतात.

याच धोरणानुसार अनिल मेहता यांनी अलीकडच्या काळात द.मा. मिरासदार व व्यंकटेश माडगुळकरांच्या पुस्तकांचे हक्क एकरकमी किंमत देऊन विकत घेतले आणि प्रकाशनविश्वात खळबळ माजली. कारण माडगूळकरांच्या पुस्तकांना कायम मागणी असते.

पण मूळात पैशाच्या बळावर असे हक्क विकत घेणे, हेच नैतिकदृष्ट्या बरोबर नाही, असं मेहतांच्या विरोधातल्या प्रकाशकांचं म्हणणं आहे. यातही मुख्यत: व्यंकटेश माडगुळकर यांच्या पुस्तकांच्या संदर्भात बोलायचं झालं, तर त्यांचे कॉपीराइट त्यांची मुलगी ज्ञानदा नाईक यांच्याकडे असले तरी पुस्तकप्रकाशनाचे हक्क त्या-त्या प्रकाशकांकडे आहेत. यासंदर्भात आपली बाजू मांडताना ‘कॉन्टिनेन्टल प्रकाशन’च्या संचालक देवयानी अभ्यंकर म्हणतात की व्यंकटेश माडगूळकर व माझे आजोबा अनंतराव कुलकर्णी यांच्यात कागदोपत्री झालेल्या करारानुसार माडगूळकरांच्या पुस्तकांच्या सर्व आवृत्त्यांचे हक्क आमच्याकडे आहेत. तेव्हा वारसाहक्काने पुस्तकाचे कॉपीराइट ज्ञानदा नाईकांकडे असले तरी त्या मेहतांना पुस्तकछपाईचे हक्क देऊ शकत नाहीत.

एखादं पुस्तक तीन वर्षांपेक्षा अधिक काळ बाजारात उपलब्ध नसेल तर अन्य

प्रकाशक मूळ प्रकाशकाच्या परवानगीने ते पुस्तक छापू शकतो. मात्र या व्यवहारात मूळ प्रकाशकाचं परवानगीपत्र अत्यावश्यक असतं. हाच मुद्दा धरून माडगुळकरांची पुस्तकं प्रकाशित केलेले 'उत्कर्ष प्रकाशन'चे सुधाकर जोशी म्हणतात, 'मेहतांकडे मराठी पुस्तकाचे हक्क असलेल्या कमलाबाई ओगले यांच्या 'रुचिरा' पुस्तकाच्या हिंदी-इंग्रजी आवृत्तीचे हक्क मी ओगलेबाईंकडूनच विकत घेतले होते. पण हिंदी-इंग्रजीत पुस्तकं छापण्याआधी मी वर्तमानपत्रात जाहिरात दिली आणि कुणाचं ऑब्जेक्शन आहे का ते विचारलं. तेव्हा रुचिरा हिंदी-इंग्रजीत छापलं, तर मराठी पुस्तकावर त्याचा परिणाम होईल, असं मेहतांनी म्हटलं होतं आणि त्यांची बाजू समजून घेऊन मी हिंदी-इंग्रजी आवृत्ती काढण्याचा विचार बदलला होता. पण आता तेच मेहता आमच्याकडची पुस्तकं मात्र आम्हाला न विचारताच पळवत आहेत.'

तर 'पद्मगंधा प्रकाशन'चे अरुण जाखडे म्हणतात, 'प्रत्येक प्रकाशक नवनवीन लेखक आणि विषयांसाठी धडपडत असतो. त्यासाठी स्वत: वेगवेगळ्या कल्पना सुचवून त्यावर जाणत्या लेखकांकडून लिहून घेत असतो. पण जो प्रकाशक स्वत: प्रयोगशील नसतो, तो दुसऱ्यांच्या घरात डोकावतो आणि त्यांचे लेखक-विषय चोरतो. मेहतांचं आताचं वागणं असंच आहे. कारण त्यांच्याकडे स्वत:ची काहीच कल्पकता-प्रयोगशीलता नाहीय.'

लेखक घडवणं, लेखकावर मेहनत घेणं असे प्रकार बहुतेक प्रकाशक मंडळी करत असतात. तसंच लेखक-प्रकाशकाचं जिव्हाळ्याचं नातंही मराठी प्रकाशन व्यवसायात महत्त्वाचं मानलं जातं. त्यामुळेच मेहता प्रकरणात नाडल्या गेलेल्या प्रकाशकांचं म्हणणं आहे की, प्रकाशन व्यवसायाकडे पूर्णपणे धंदेवाईक वृत्तीतून पाहू नका. हा व्यवसाय आजवर लेखक-प्रकाशकाच्या नैतिक संबंधांवरच टिकलेला आहे.

मात्र लेखक-प्रकाशक संबंध कितीही भावमधुर असले तरी प्रकाशन हा 'व्यवसाय'च आहे, हे आता प्रत्येक प्रकाशकाने लक्षात घ्यायला हवं. या संदर्भात ज्या 'देशमुख आणि कंपनी'चे वि.स. खांडेकर, रणजित देसाई यांच्यासारखे खपणारे लेखक सुनील मेहतांनी उचलले, त्या कंपनीचे सध्याचे संचालक रवी गोडबोले मात्र संयमी भूमिका घेतात. ते म्हणतात, 'प्रोफेशन आणि बिझनेसमध्ये जो फरक आहे, तोच व्यवसाय आणि धंदा यांत आहे. व्यवसाय म्हटला की त्यात सामाजिक बांधिलकी वगैरे येते आणि मूल्य सांभाळून व्यवसाय करणं कठीण होऊन बसतं. तेव्हा प्रकाशकांनी आता ठरवायला हवं की, आपल्याला व्यवसाय करायचाय की धंदा!' आणि सुनील मेहतांचं हेच म्हणणं आहे. आपल्याविरुद्ध बोंब मारणाऱ्या प्रकाशकांना उद्देशून ते म्हणतात, 'आपले प्रकाशक प्रकाशनाचा व्यवसाय नीट करत नाहीत. त्यांना आपले लेखक सांभाळता येत नाहीत. त्यांचे आर्थिक व्यवहार नीट नसतात. मग त्यांचे लेखक माझ्याकडे येतात. तेव्हा आपल्या लेखकांना थांबवणं आपल्या हाती का नाही, याचा

विचार त्या त्या प्रकाशकांनीच करावा.

सुनील मेहता म्हणतात ते तांत्रिकदृष्ट्या बरोबर असलं, तरी मेहताही अर्धसत्यच सांगतात. लेखक किंवा त्यांचे वारसदार मेहतांकडे येतात हे पूर्णपणे खरं नाही. मेहताच सगळीकडे कोरा चेक घेऊन जातात, असं या क्षेत्रातली मंडळी सांगतात. त्यांचा हा उद्योग लेखक किंवा त्यांच्या वारसदारांच्या हिताचा असला तरी भविष्यातील मराठी साहित्य व्यवहाराच्या दृष्टीने धोकादायक आहे. कारण यामुळे आगामी काळात 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची मोनोपॉली निर्माण होऊ शकते. आजवर एकाच लेखकाची पुस्तकं वेगवेगळ्या प्रकाशकाकडे असल्यामुळे सर्वच प्रकाशकांचं पुस्तकविक्रेत्यांशी सौहार्दाचं वागणं असायचं आणि असतं. मात्र वि.स. खांडेकर, रणजित देसाई अशा नावाजलेल्या लेखकांच्या पुस्तकांच्या संदर्भात सुनील मेहतांचं वागणं आतापासूनच अरेरावीचं असतं. विक्रेत्याने आपल्याकडे येऊन आणि तेही कॅश देऊनच माल नेला पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो. पुढच्या काळात खांडेकर, देसाई, वपु, मिरासदार, माडगुळकर यांच्यासारखेच आणखी नामांकित लेखक गळाला लागले, तर सुनील मेहता पुस्तक विक्रेत्यांना आपल्या तालावर नाचवायला कमी करणार नाहीत आणि त्यामुळे मेहता यांची एकाधिकारशाही निर्माण होऊन एकूणच साहित्य व्यवहार धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र असं व्हायला नको असेल, तर आता सर्वच प्रकाशकांनी पारदर्शी पुस्तक व्यवहार करायला हवा आणि आपापले लेखक जपायला हवेत.

मुकुंद कुळे (महाराष्ट्र टाइम्स, ५ जून २०११)

❐

१५वी आवृत्ती

पहिले प्रेम

वि. स. खांडेकर

माणसाच्या पहिल्या प्रेमाबद्दल....

१२०रु. पोस्टेज २५रु.

विपर्यस्त वर्तमान

प्रकाशन व्यवसायातील वादावरील 'लेखकांची पळवापळवी' या लेखाला विश्वास पाटील यांनी दिलेले उत्तर...

गेल्या रविवारी आमचे मित्र मुकुंद कुळे यांनी मराठीतील लेखकांच्या पळवापळवींचे विपर्यस्त वर्तमान दिले आहे. ते बरेचसे वस्तुस्थितीला सोडून व ऐकीव गप्पांवर रचलेले आहे. एखादा साहित्यिक म्हणजे कोणा एकाच्या गोठ्यात बांधलेली गाय नसते. जर बाईंडरचा टाका ढिसाळ असेल अगर कागदवाला काळपट कागद पुरवत असेल तर तो बाईंडर वा कागदवाला बदलण्याचा जसा अधिकार प्रकाशकाला असतो, त्याच प्रकारे एखादा प्रकाशक वेळेत ग्रंथाच्या नव्या आवृत्त्या प्रकाशित करत नसेल, वर्षानुवर्षे रॉयल्टी बुडवण्याचाच धर्म पाळत असेल तर असा प्रकाशक बदलण्याचा पूर्ण अधिकार लेखकाला आहे.

विशेषत: श्री. कुळे यांनी माझ्या संदर्भात केलेली विधाने चुकीची आहेत. प्रकाशन क्षेत्रातील कोणीतरी त्यांना ही माहिती खोडसाळपणे दिलेली दिसते.

श्री. मेहता यांनी मला पळवायचा प्रश्नच उद्भवत नाही. आजही मी 'राजहंस प्रकाशन'चाही लेखक आहे. राजहंसने प्रकाशित केलेल्या माझ्या सर्व कादंबऱ्या त्यांच्याकडेच असून आमच्यातील व्यवहार व मैत्री तशीच दृढ आहे. 'संभाजी'बाबत जी दहा लाखाची गोष्ट कुळे सांगतात, ती कहाणी आहे खरी 'महानायक'ची. १९९७ मध्ये माझ्या 'महानायक'साठी रॉयल्टीची आगाऊ रक्कम म्हणून श्री. अनिल मेहता यांनी दहा लाख रुपये देऊ केले होते. त्या गोष्टीस वसंत कानेटकर, माधव गडकरी, शंकर सारडा व सदा डुंबरे हे साक्षीदार होते. मात्र त्या कादंबरीचे हस्तलिखित मी आधीच श्री. माजगावकर यांच्याकडे दिले असल्यामुळे कितीही मोठ्या रकमेला भुलून ते परत घेणे मला सदाचाराचे वाटले नाही. तसेच 'संभाजी' पुढे नऊ वर्षांनी, २००६ मध्ये प्रकाशित झाली. तेव्हा ती अन्य प्रकाशकाकडे द्यायचा निर्णय माझा स्वत:चा आहे. त्यासाठी मला भेटलेल्या तीन प्रकाशकांमधून मी स्वत:च श्री. सुनील मेहता यांची निवड केली. माझी एखादी कादंबरी मी कोणाला एकरकमी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. 'संभाजी' कादंबरीचे अंतरंग माहित नसतानाही माझ्या शब्दांवर भरवसा ठेवून अकरा हजारांहून अधिक वाचकांनी प्रत्येकी ३८० रुपयांप्रमाणे ॲडव्हान्स बुकिंग केले होते. आयकर विभागाकडे सादर केलेल्या कागदपत्रांची साक्ष काढून सांगायचे तर आत्तापर्यंत सात मोठ्या आवृत्त्या प्रकाशित होऊन 'संभाजी' या माझ्या एकाच कादंबरीची रॉयल्टी एकूण सत्तावीस लाख अठ्ठेचाळीस हजार तीनशे सदतीस रुपयांची मला धनादेशाद्वारे प्रकाशकांकडून प्राप्त झाली आहे. माजगावकर आणि

मेहता या दोन्ही प्रकाशकांकडे मी सुखी आहे.

एका प्रकाशकाकडून आपले ग्रंथ काढून दुसऱ्या प्रकाशकाला देणे, या पळवापळवीचा पहिला बळी मी असल्याचे श्री. कुळे जाहीर करतात. मात्र श्री. रणजित देसाई यांनी आपल्या हयातीमध्येच आपले ग्रंथ मेहतांना तर पु. ल. देशपांडे यांनी आपले बरेच ग्रंथ दुसऱ्यांकडून काढून मधुकाका कुलकर्णी यांना दिले होते. त्यामुळे अशा तथाकथित पळवापळवीत पहिल्या बळीचा मान माझ्या वाट्याला येत नाही. या निमित्ताने रणजित देसाईंनी सांगितलेला किस्सा आठवतो. ते एकदा म्हणाले होते, ''माझी 'स्वामी'सारखी कादंबरी मागणी असूनही सलग आठ वर्षे बाजारात उपलब्ध नव्हती. मग मी लिहितो ते माझ्या वाचकांसाठी की प्रकाशकांच्या लहरीसाठी असा प्रश्न पडतो!''

अकारण पहिला बळी (माझे पुस्तक काढून मी दुसऱ्या कोणाला देण्याचा तथाकथित अपराध केला नसतानाही) मला ठरवले गेले आहेच, तर या निमित्ताने चार गोष्टी स्पष्ट लिहिण्याचा गुन्हा मी करतोच. तसे कोणीतरी या विषयाला वाचा फोडणे आवश्यक होतेच. फक्त मराठीतीलच नव्हे तर अनेक भारतीय भाषांतील साहित्यिक व कवी प्रकाशकाकडे लाखात येणे असताना हलाखीत मृत्यू पावल्याची अनेक उदाहरणे आहेत. अलीकडेच मराठीतील एका मातब्बर लेखकांना डायलिसीसवर असतानाही व त्यांचे लाखात येणे असतानाही ऐन वेळी त्यांना आपले हक्काचे मानाचे धन मिळालेच नाही. लेखकाने फक्त मानसन्मान, वार्धक्यात विविध मंडळांनी दिलेले आणि एका रात्रीत सुकून जाणारे हार याच्यावरच जगायचे? त्याने किंवा त्याच्या वारसाने प्रकाशकादारी जाऊन घाबरत घाबरत रॉयल्टी मागायची? काव्यसंग्रह खपतच नाहीत असे जणू त्रिकालाबाधित गृहीत मनी धरायचे, तर दुसरीकडे विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात, झेडपी, राजा राममोहन रॉय ट्रस्टमध्ये कवींची नावे वापरून खूप काव्यसंग्रह खपवायचे. अन मानधनाच्या पंगतीतून कवींना कायमच रिकाम्या द्रोण-पत्रावळीवरून तसेच उठवायचे हे प्रकार सर्रास चालू आहेत.

श्री. अरुण जाखडे व श्री. मुकुंद कुळे यांनी प्रकाशकाची 'कल्पकता - प्रयोगशीलता' व 'लेखक घडवणे किंवा लेखकावर मेहनत घेण्याची' मिठ्ठास भाषा केली आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, जणू वि. स. खांडेकर, रणजित देसाई आणि व्यंकटेश माडगुळकर अशा लेखकांचा जन्म केवळ प्रकाशकीय मेहरबानीवर झाला होता असे समजायचे काय? अशाच तुमच्या प्रकाशकीय कल्पकतेतून व प्रयोगशीलतेतून वरील तीन लेखकांच्या ताकदीचा किंवा आवाक्याचा एखादा तरी लेखक श्री. जाखडे यांनी घडवून दाखवावा, आम्ही त्यांचे जन्माचे ऋणी राहू.

लेखकाचे वेळच्या वेळी मानधन देणाऱ्या काही चांगल्या प्रकाशन संस्था मराठीत आहेत. मात्र अशांची संख्या खूपच कमी.

एकीकडे प्रकाशन व्यवसाय टिकला पाहिजे याचा अर्थ दुसरीकडे स्वत:च्या

हक्काच्या मानधनाला वंचित राहून लेखकाने दारिद्र्यातच श्वास सोडायला हवा असा होत नाही. श्री. कुळे यांच्या लेखात 'जुने लेखक नैतिक मूल्यं जपणारे', 'पुढच्या पिढ्या मात्र सॉफ्ट टार्गेट', 'ग्रंथव्यवसायाचे पावित्र्य', 'नैतिकता' अशी उच्च शब्दांची मांदियाळी आहे. पण वास्तव मात्र भयानक आहे. एका महान लेखकाच्या अंत्यविधीला हजेरी लावण्यासाठी प्रकाशन व्यवसायाला वळण देणारे एक मातब्बर प्रकाशक एका जिल्ह्याच्या गावी गेले होते. तेथे त्यांनी हॉटेलात दोन दिवस मुक्काम केला. अन त्या दोन दिवसांचा निवासखर्च त्या मृत लेखकाच्या रॉयल्टीतून वजा केल्याचे लेखी पत्र लेखकाच्या वारसांना तात्काळ धाडले. मात्र गेल्या दोन-अडीच दशकांत प्रकाशकबुवांनी त्याच मृत लेखकाच्या शिल्लक मानधनापैकी एकही छदाम अद्यापि दिलेला नाही.

केवळ साहित्यसेवेची भाषा, साहचर्य वा पावित्र्याच्या बातांवर जनव्यवहार चालत नाहीत. सैनिकांप्रमाणेच लेखकालाही पोट असते. खपाच्या मोजक्या लेखकांचे मानधन देऊन इतरांचे बुडवणे असाही याचा अर्थ होत नाही! अनेक थोर वाङ्मयसेवकांनी आपल्या संसाराकडे, मुलाबाळांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. अहोरात्र शब्दांशी जणू संसार मांडला. समाजाने त्यांना नानासाहेब, अण्णासाहेब, तात्यासाहेब, भाऊसाहेब अशा बिरुदावल्या देऊन मानपान दिले. त्यांचे ग्रंथ वर्षानुवर्षे खपत राहिले. मानधन बिचारे तसेच साचत राहिले. त्याचा ओघ लेखकांच्या उंबरठ्यापर्यंत पोचलाच नाही. मग व्याख्याने, स्नेहसंमेलने, काव्यवाचन तर कोणी कथाकथन करायचे, प्रेमाने मिळालेल्या त्या तुटपुंज्या रकमेवर कष्टाने संसार चालवायचे. अशा महाराष्ट्र भटकंतीचा अनेकांच्या आरोग्यावर पुन्हा परिणाम झालाच. तर अनेकांनी पुस्तके खपत असतानाही रॉयल्टीच्या रकमेवर फाजील भरवसा न ठेवता किंवा मास्तरकी किंवा प्राध्यापकी स्वीकारून अंगातल्या साहित्यसेवेच्या झटक्याला वेळेतच मुरड घातली, अशांच्या कुटुंबियांचे भाग्य थोरच मानायचे.

श्री. कुळे म्हणतात त्याप्रमाणे प्रकाशन क्षेत्रात त्सुनामी आल्या असतील तर अशा अनिष्ट प्रवृत्तींशी संघर्ष करायलाच हवा. त्या लढ्यामध्ये उतरायला अनेक कवी व लेखक मित्रांनी माझ्याकडे संमती दर्शवली आहे. मात्र या संघर्षाची सुरुवात करण्यापूर्वी मराठीतील प्रकाशक मित्रांनी किमान कागदावर दाखवलेल्या वर्षानुवर्षे तुंबलेल्या वा नजरचुकीने राहून गेलेल्या सर्वच लेखकांच्या रॉयल्टीच्या रकमा चुकत्या कराव्यात, म्हणजे आपल्या नैतिक संघर्षाला खऱ्या अर्थाने धार चढेल.

केवळ मराठी प्रकाशन व्यवसायाच्या जोरावर अनेकांनी माड्या-हवेल्या उभारल्या. त्यांच्या त्या यशकर्तृत्वाबद्दल कोणाच्या पोटात दुखायचे कारण नाही. पण या महालांचे चिरे रचताना अनेक साहित्यिकांनी आपले रक्त, घाम आणि अश्रू वेचले आहेत.

अलीकडे मी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलेला एक भयंकर प्रसंग आठवतो. ज्या

एका महान मराठी साहित्यिकाने मराठी भाषेलाच नव्हे, तर भारतीय साहित्याला वळण दिले. ज्यांच्या कादंबऱ्यांवर आमच्या काही पिढ्या पोसल्या, त्या कादंबऱ्यांतील नायक-नायिकांची नावे काही जणांनी आपल्या मुलांना ठेवली, अशा थोर लेखकाच्या वारसदारांनी त्यांचा मौल्यवान ग्रंथसंग्रह, त्यांना भेटीदाखल अन्य भाषांतील लेखकांनी दिलेले ग्रंथराज रद्दीत विकत घातले. आपल्या युगप्रवर्तक पित्याचा असा अमूल्य ग्रंथसंग्रह रद्दीत काढताना त्यांच्या मुलांना काय कमी दुःख झाले असेल? पण तीस-तीस वर्षे मानधनाचा छदाम मिळणार नसेल तर ते बापुडे तरी दुसरे करणार काय! सुदैवाने मानसिंग कुमठेकर नामक माझ्या एका जागरुक ग्रंथप्रेमी मित्राच्या निदर्शनास ही बाब वेळीच आली. त्याने दामदुपटीने तो ग्रंथसंग्रह विकत घेतला आहे. मोठ्या पावित्र्याने आपल्या घरी जिवापाड जपला आहे. मायमराठीच्या त्या अग्रगण्य कादंबरीकाराला भगवान बुद्ध आणि हिटलर - अहिंसा आणि हिंसा या विषयावर एक दीर्घ पल्ल्याची कादंबरी लिहायची होती. त्यासाठी त्यांनी काढलेली टाचणे, त्या टिपण्या आणि आराखडे त्याच ग्रंथसंग्रहाच्या पिवळ्या, जुनाट पानाआड जेव्हा मला आढळून आले तेव्हा मला अश्रूंचा बांध आवरता आला नाही! ही घटना कपोलकल्पित वाटत असेल तर टीव्हीचा कॅमेरा सोबत घेऊया. आधुनिक युगात खऱ्या अर्थी माझ्या मराठीचा वेलू गगनावर नेणाऱ्या त्या थोर साहित्यिकाचा केवळ नशिबाने वाचलेला तो ग्रंथसंग्रह श्री. मुकुंद कुळे आणि श्री. अरुण जाखडे या दोघांना प्रत्यक्ष नेऊन दाखवायची माझी तयारी आहे.

विश्वास पाटील, मुंबई

व.पु. काळे यांच्या कन्या स्वाती चांदोरकर यांची प्रतिक्रिया

व.पु.काळे यांची सर्व पुस्तके उपलब्ध करायचे श्रेय मेहतांनाच!

प्रिय सुनील,

सप्रेम नमस्कार

शब्दांतून सर्वच भावना व्यक्त होत नाहीत. पण तरीही त्या व्यक्त करण्यासाठी शब्दांचा आधार घ्यावा लागतो. आणि बापूंनी तर शब्दांतूनच सर्वकाही सांगितले. त्यांचं सर्व सांगणं त्यांच्या पश्चात तुम्ही गेली दहा वर्षे पुस्तकांच्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यात पोचवत आहात. बापूंना जाऊन या २६ जूनला दहा वर्ष पूर्ण झाली. गेली दहा वर्षे बापूंची सर्व पुस्तके तुम्ही रसिक वाचकांसाठी कायम उपलब्ध ठेवली आहेत.

सुनील, 'व्यवहार' सगळेच करतात पण त्या 'व्यवहारापलीकडे' काही करणारे

तुम्ही आहात. केवळ मागणी आहे, म्हणून पुरवठा आहे आणि म्हणून कमाई आहे, इतकंच तुमचं गणित नाही. तसं असतं तर 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा तिसरा मजला सर्व साहित्यिकांच्या आठवणी जागवणारा असा निर्माण झाला नसता. मागणी आहे पण पुरवठा नाही (कमाई असूनही) अशीही माणसे बघितली आहेत. तुम्ही अपवाद आहात.

मला तुमचे मन:पूर्वक आभार मानायचे आहेत. इतका पारदर्शक व्यवहार दिल्याबद्दल! सर्वाधिकार - बापूंच्या सर्व छापील साहित्याचे सर्वाधिकार मी तुम्हाला दिले, तेव्हा त्यात असा कुठेही उल्लेख नव्हता की पुस्तकांच्या आवृत्त्या जर निघतील, तर तुम्ही मला त्याची प्रत पाठवाल. आणि गेल्या दहा वर्षात सर्व पुस्तकांच्या जेवढ्या आवृत्त्या निघाल्या, मला प्रती मिळत राहिल्या आणि त्यावरून मला समजत राहिले वपुंचे चाहते किती, पुस्तक विकत घेणारे किती आणि त्या चाहत्यांना 'नकार' न देणारे असे तुम्ही आणि तुमचे सहकारी - कष्ट घेणारे किती...!

वडिलांबद्दल मुलांना कौतुक, अभिमान असणं हे नैसर्गिक!

परंतु अशा अनेक साहित्यिकांबद्दल तितकाच अभिमान आणि कौतुक असणारा प्रकाशक कदाचित अनैसर्गिक.....

स्वाती चांदोरकर, मुंबई

भारती पांडे यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया

दैनिक महाराष्ट्र टाईम्सच्या गेल्या दोन रविवारच्या (अनुक्रमे दि.२ जून व दि. १२ जून) पुरवण्यांमधील ' लेखकांच्या पळवापळवी संबंधीचा श्री. मुकुंद कुळे यांचा आणि त्या लेखाच्या उत्तरादाखल लिहिलेला श्री. विश्वास पाटील यांचा लेख,श्री. सुनील मेहता यांनी उद्धृत केलेले कै व. पु. काळे यांच्या कन्येचं पत्र इत्यादी मजकूर वाचला आणि मग एक गोष्ट फारच तीव्रतेनं जाणवली ती ही की आपण व्यावसायिकता आणि चांगले परस्परसंबंध या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत असं मानत आलो आहोत की काय?

व्यावसायिक दृष्टिकोन असलेली व्यक्ती आपल्या व्यवसायामुळे संबंध येणाऱ्या इतर व्यक्तींशी चांगले व मैत्रीचे संबंध ठेवू शकतच नाही असं आपण मानायला लागलो आहोत की काय?

म्हणजे आपण व्यावसायिकता या शब्दाचा अर्थ तरी काय करतो आहोत?

प्रकाशन व्यवसायापुरतं बोलायचं तर अनेक प्रकाशक आजही त्यांच्याकडे आलेल्या लेखकाशी -विशेषत: तो नवोदित असेल तर नक्कीच- आपण त्याचं लेखन प्रकाशित करतो आहोत म्हणजे त्याच्यावर उपकार करतो आहोत अशा थाटात

त्याच्याशी बोलत असतात. याचीच पुढची पायरी म्हणजे 'आम्ही लेखी करार वगैरे काही करत नाही-आमची ती पद्धत नाही-आमचं सगळं काम विश्वासावर चालतं ' हे वाक्यही खूपच वेळा कानी पडतं.

मराठीत एक उत्तम म्हण आहे. तिची इथे आठवण झाल्याशिवाय राहात नाही. 'विश्वास गेला पानिपतावर' ही म्हण पानिपतच्या लढाईनंतर पुण्यानंच निर्माण केली असणार याची मला खात्री आहे.

मैत्रीचे,जवळिकीचे संबंध ठेवायचे असतील तर व्यावसायिकता दूर ठेवायला लागते किंवा उलटपक्षी व्यावसायिक वर्तन ठेवलं तर आपले लेखक दुखावतील (किंवा त्याना पुस्तकप्रकाशनाच्या तारखेची आणि मानधन देण्याच्याही तारखेची हमी द्यावी लागेल) असं या प्रकाशकाना का वाटतं आहे याचा शोध घ्यायला हवा असं मला तरी वाटतं.

अनेक व्यावसायिकांचा हा अनुभव असेल की व्यावसायिकता सांभाळली गेली तरच समोरच्या व्यक्तीशी अधिक चांगले संबंध राखता येतात —नव्हे, ते संबंध आपोआपच विश्वासाचे आणि मैत्रीचे होतात.

हे झालं व्यावसायिकतेबद्दल.

मला वाईट वाटलं ते एकाच गोष्टीचं.

प्रकाशकानी लेखकाशी सन्मानानं वागायलाच हवं याविषयी या सर्व अतिरथीमहारथींनी ब्र देखील काढलेला नाही.

लेखक आणि वाचक यांच्यामधला महत्त्वाचा असला तरी केवळ एक दुवा म्हणजे प्रकाशक हे मान्य केलं तर लेखक आणि वाचक या दोघांनाही सन्मानाची वागणूक मिळायलाच हवी यावर दुमत होण्याचं कारण मला तरी दिसत नाही.

व्यावसायिकता म्हणजे काय तसाच सन्मानाची वागणूक म्हणजे काय याचाही विचार करावा लागेल.

सन्मानाची वागणूक म्हणजे नुसतं देखल्या देवा दंडवत असून चालणार नाही— अर्थात तेही बऱ्याच लेखकांना मिळत नाही —किंवा एखादा कप चहा पाजला किंवा विचारला की पुरेसं नाही.

याबाबतीतले माझे स्वत:चे काही अनुभव सांगते .

१९९९ सालापासून मी एका –एकाच प्रकाशकांसाठी लिहिते आहे.

अमुक एका पुस्तकाचा अनुवाद करायला मी तयार आहे असं त्याना कळवलं की माझ्याकडे रीतसर करार, तोही तीन प्रतींमध्ये पाठवण्यात येतो. त्यामध्ये सर्व अटी स्वच्छ लिहिलेल्या असतात.

त्या करारावर स्वाक्षरी करून पाठवली की माझं अनुवादाचं काम सुरू होतं . त्या कामासाठी, संदर्भासाठी मला काही विशिष्ट पुस्तकांची गरज असेल तर ती गरज मी

त्या प्रकाशकांच्या कचेरीतल्या सहकाऱ्यांना कळवली की मला ती पुस्तकं उपलब्ध करून देण्यात येतात. मला स्वत:ला त्या पुस्तकांच्या शोधात फिरावं लागत नाही.

ठरलेल्या काळामध्ये पुस्तक प्रकाशित हाते आणि कराराप्रमाणे ठरलेल्या प्रती माझ्याकडे पोचवण्यात येतात.

कराराप्रमाणेच मानधनाचा धनादेशही पाठवला जातो. एवढंच नाही तर दूरच्या एखाद्या वृत्तपत्रामध्ये त्या पुस्तकाविषयी काही लिहून आलेलं असेल तर त्याची झेरॉक्स प्रतही मला पाठवण्यात येते.

या सर्व गोष्टींसाठी मला स्वत: प्रकाशकच भेटले पाहिजेत याची गरज नसते परंतु केव्हाही दूरध्वनीवर ते उपलब्ध असतात. नसले तर आठवणीने त्यांचा परत दूरध्वनी येतो.

या प्रकाशनाच्या कचेरीमधले सर्व सहकारीही अतिशय सौजन्यशील आहेत याचा प्रत्ययही वारंवार मला आलेला आहे.

सन्मानाची वागणूक ही अशी असते. यामध्ये फक्त पैशाचा विचार नसतो तर समोरचा माणूस कोणीही असला तरी त्याच्याशी सौजन्याने वागण्याची एक रीत असते. अशा वागण्याने कोणाचाही तोटा होत नाही, झालाच तर फायदाच होतो. मग ते संबंध लेखक प्रकाशकाचे असोत की इतर कोणत्याही व्यवसायातल्या व्यक्तींचे असोत.

भारती पांडे, पुणे

मंदाकिनी खांडेकर यांची प्रतिक्रिया

स. न. वि. वि.

रविवार दि. ५ जून २०११ च्या महाराष्ट्र टाइम्सच्या 'संवाद' या पुरवणीतील श्री. मुकुंद कुळे यांचा 'लेखकांची पळवापळवी' लेख वाचला. मीही एका मराठी लेखकाची वारसदार असल्यामुळे आणि श्री. कुळे यांचा लेख एकांगी आहे अशी माझी भावना असल्यामुळे हा पत्रप्रपंच!

मी मंदाकिनी खांडेकर (कै. वि.स.तथा भाऊसाहेब खांडेकर यांची ज्येष्ठ कन्या) सांगू इच्छिते की श्री. सुनील मेहता आमच्याकडे कधीच कोरा चेक घेऊन माझ्या वडिलांची सर्व पुस्तके खरेदी करण्याकरता आले नव्हते. तसेच आजअखेर आम्हीही आमच्या वडिलांची सर्व पुस्तके छापण्यासाठी त्यांना विकलेली नाहीत.

मराठी प्रकाशन व्यवसाय लेखक, प्रकाशक यांच्या वैयक्तिक संबंधावर आधारलेला होता, असे लेखकांचे म्हणणे आहे. वैयक्तिक संबंध नेहमीच वारसांचे हित पाहतील की लेखकाच्या मृत्यूनंतर त्याला वाऱ्यावर सोडतील? हा माझा प्रश्न आहे. माझे

वडील १९७६ मध्ये निधन पावले. त्यानंतर त्यांच्या प्रकाशकांनी आम्हा वारसांना रॉयल्टीची रक्कम का दिली नाही हे लेखक महाशय सांगू शकतील का? छापील पुस्तकांच्या भेट प्रती का मिळाल्या नाहीत याचेही उत्तर दिले तर बरेच आहे. वर्षानुवर्षे हिशोबांच्या कागदांची भेंडोळी (रॉयल्टी स्टेटमेंट्स) मात्र आम्हाला मिळाली. ज्यांचा उपयोग फक्त रद्दीत घालण्याचाच. कारण त्याबरोबर चेक कधी आलाच नाही. याउलट श्री. सुनील मेहता आम्हा सर्व वारसदारांना सविस्तर रॉयल्टी स्टेटमेंट्स बरोबरच रकमेचा चेकही आठवणीने पाठवतात.

माझे वडील हयात असताना देखील जी पुस्तके प्रकाशित झाली नव्हती, मधल्या दोन पिढ्यांना ती पुस्तके कशी होती हे पहावयास देखील मिळाले नव्हते. या पुस्तकांतून नफा होईल किंवा नाही, ती खपतील का याचा विचार न करता श्री. सुनील मेहता यांनी ती सर्व पुस्तके छापून मराठी वाचकांना उपलब्ध करून दिली, त्याबद्दल वाचक त्यांचे ऋणीच राहतील. कोणता प्रकाशक आपल्या प्रकाशनाची किती जाहिरात करतो? त्यानुसार त्यांची किती पुस्तके खपतात? त्यांचा फायदा किती होतो? ते किती पैसे कमावतात? हा खरोखरच ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्यात इतरांनी लक्ष घालण्यासारखे काही आहे असे मला तरी वाटत नाही. कोणी 'धंदा' ओळखून एखादा फंडा वापरला आणि धंद्यात तेजी आणली, तर त्यात इतरांना वैषम्य वाटण्यासारखे काय आहे? लेखन हे आजवर कधीच कुठल्याही लेखकाचे उदरनिर्वाहाचे साधन नव्हते, असे श्री. कुळे यांनी लेखात म्हटले आहे परंतु माझ्या माहितीप्रमाणे आणि स्मरणशक्तीनुसार माझ्या वडिलांचे एकमेव उदरनिर्वाहाचे साधन लेखन हेच होते. त्यांनी आपल्या लेखनावरच प्रपंच केला होता. आम्ही पाचही भावंडे एकाच वेळी कॉलेजात असताना प्रकाशकांनी जर वेळेवर रॉयल्टी दिली नाही (जी कधीच वेळेवर मिळत नव्हती) तर त्यांना किती मानसिक त्रास भोगावा लागला आहे, याची आम्हा सर्वांना पूर्ण कल्पना आहे.

श्री. सुनील मेहता यांनी आम्हाला कधीही 'सॉफ्ट टार्गेट' केले नाही. नैतिक मूल्यांबाबत बोलावयाचे झाले तर लेखकाला ठरलेला मोबदला न मिळणे किंवा न देणे कोणत्या नीतिमत्तेत बसते? आम्ही याचा वर्षानुवर्षे अनुभव घेतलेला आहे.

पुस्तक विक्री संबंधात जे काही नियम करावयाचे असतील, ते प्रकाशकांच्या संघटनेने करावेत आणि अमलात आणावेत म्हणजे वाद होणार नाहीत.

'लेखकांची पळवापळवी' या म.टा.मधील लेखात वारंवार माझ्या वडिलांच्या नावाचा उल्लेख आल्यामुळे आणि वरील एकतर्फी लेखामुळे आमचे प्रकाशक श्री. सुनील मेहता यांच्यावर अन्याय होतो आहे अशी खात्री झाल्यामुळे मी हे पत्र लिहिण्याचे धाडस करीत आहे.

मंदाकिनी खांडेकर, कोल्हापूर

नवे कोरे



गर्नसी वाचक मंडळ

मेरी ॲन शाफर
ॲनी बरोज

अनु. **मैत्रेयी जोशी**

२५०रु. पोस्टेज २५रु.

गर्नसी - इंग्लिश चॅनल आयलंड वरील एक चिमुकले बेट.
जानेवारी १९४६, दुसरं महायुद्ध नुकतंच संपलंय. गर्नसीबेटालाही युद्धाच्या झळा बसल्यायत. लंडनही या युद्धाच्या छायेतून वर येत, पुन्हा ‘जीवनाला’ सामोरं जातंय.
‘इझ्झी गोज टू वॉर’ या पुस्तकाने प्रकाशझोतात आलेली ज्युलिएट नव्या पुस्तकासाठी विषय शोधतीये. चार्लस् लँबचा निस्सीम भक्त डॉसी ज्यूलिएटला पत्र धाडतो आणि पत्रांचा सिलसिला सुरू होतो.
‘गर्नसी लिटररी ॲण्ड पोटॅटो पील- पाय सोसायटी’ असे मजेदार नामकरण झालेल्या या वाचक मंडळातले अन्य सभासदही ज्यूलिएटचे ‘पत्रमित्र’ बनतात. त्यांच्या पत्रांतून ते अनोखे बेट, तेथील लोक, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची आवडती पुस्तकं आणि ‘नाझी अंमला’तून स्वतंत्र झालेला, मोकळा श्वास घेणारा समाज असा विशाल पट उलगडत जातो. विलक्षण भावबंधांनी हे सर्वजण तिच्याशी बांधले जातात. मग ज्यूलिएट गर्नसीच्या प्रवासाला निघते आणि तिच्या आयुष्याला एक निर्णायक कलाटणी मिळते.
कधी करुणरसात भिजलेली, तर कधी सौम्य विनोदाची पखरण असलेली ही स्नेहार्द्र पत्रे म्हणजे शब्दांचा आनंदोत्सव आहे.
हा जल्लोष रसिक वाचकांनाही तितकाच भावेल यात शंका नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊसची आगामी पुस्तके

पुस्तकाचे नाव	लेखक	अनुवादक
क्रिटिकल	रॉबिन कुक	डॉ. प्रमोद जोगळेकर
टेन फिंगर्स फॉर गॉड	डोरोथी क्लर्क विल्सन	नीला चांदोरकर
मी, संपतपाल, गुलाबी साडीवाली रणरागिणी	मोई संपतपाल	सुप्रिया वकील
टेन मच	ए.जी. कृष्णमूर्ती	सुप्रिया वकील
ब्लड मनी	ख्रिस कोलेट	वैशाली रानडे
नॉट पेड	हरिशंकर परसाई	उज्ज्वला केळकर
कीप ऑफ द ग्रास	करण बजाज	माधुरी शानभाग
शास्त्रज्ञांचे जग	निरंजन घाटे	
असे शास्त्रज्ञ असे संशोधन	निरंजन घाटे	
अंतरीचा दिवा	वि. स. खांडेकर :संपा. डॉ. सुनीलकुमार लवटे	
शब्द चर्चा	म.बा. कुलकर्णी	
नीळकंठ	स्नेहल जोशी	
सोबत	स्नेहल जोशी	
ॲडम	रत्नाकर मतकर	
खुलदाबादचा खजिना	मीरा सिरसमकर	
ब्रेन प्रोग्रॅमिंग	डॉ. रमा मराठे	
विज्ञानमंथन - सूर्य	लीना दामले	
संधिकाल	मिलिंद गाडगीळ	
अज्ञेय	रेखा बैजल	
धन्वंतरी घरोघरी	डॉ. ह.वि. सरदेसाई	
मी रुक्मिणी	सुवर्णा ढोबळे	
अजब सर्पसृष्टी	डॉ. किशोर पवार	
अनोखी मत्स्यसृष्टी	डॉ. किशोर पवार	
अनोखे सस्तन प्राणी	डॉ. किशोर पवार	
मनोरंजक सस्तन प्राणी	डॉ. किशोर पवार	
सरपटणारे प्राणी	डॉ. किशोर पवार	
डायनोसॉरचे अद्‌भुत विश्व	डॉ. किशोर पवार	

पाणथळीतले पक्षी	डॉ. किशोर पवार	
आकाशसम्राट पक्षी	डॉ. किशोर पवार	
जलसम्राट मासे	डॉ. किशोर पवार	
उभयचरांचे अनोखे विश्व	डॉ. किशोर पवार	
मेल्टडाऊन	मार्टिन बेकर	सुभाष जोशी
ए विल टू विन	ॲलिस पीटरसन	उदय कुलकर्णी
अनकंडिशनल लव्ह	नतालिया आगिआनो/ व्हॅनेसा होवार्ड	नीला चांदोरकर
कृष्णायन	काजल ओझा-वैद्य	सुधीर कौठाळकर
द चेंबर	जॉन ग्रिशॅम	विश्वनाथ केळकर
अ प्रिझनर ऑफ बर्थ	जेफ्री आर्चर	लीना सोहोनी
कॅशफ्लो क्वाड्रन्ट	रॉबर्ट कियोसाकी	श्याम भुर्के
बिट्रेयल	जॉन लेस्क्रॉर्ट	एम.व्ही. कुर्लेकर
द स्पिरिच्युॲलिस्ट	मेगन चॅन्स	एम.व्ही. कुर्लेकर
एनिमी कॉम्पोनन्ट	मोएझ्झम बेग	योगिनी वेंगुर्लेकर
येस! ५० सिक्रेट्स फ्रॉम द सायन्स ऑफ परसुएशन	नोआह गोल्डस्टीन/स्टीव्ह मार्टिन/रॉबर्ट सियाल्डिनी	धरणीधर रत्नाळाकर
श्रीमंत लोकांचे पाच नियम	डॉ. सुधीर मिश्रा	प्रशांत तळणीकर
मार्स ॲण्ड व्हीनस स्टार्टिंग ओव्हर	जॉन ग्रे	शुभदा विद्वांस
युवराज्ञी	जीन सॅसन	संयुक्ता कैकिणी
द महात्मा ॲण्ड द मंकिज	संपा.अनु कुमार	प्रियंका कुलकर्णी
डेफ हेव्हन	पिंकी विराणी	विदुला टोकेकर
अमेन इन द ऑटोबायोग्राफी ऑफ नन	सिस्टर जेस्मी	सुनंदा अमरापूरकर
सिम्पल ट्रुथ	डेव्हिड बल्डासी	सुधाकर लवाटे
किंग्डम	टॉम मार्टिन	उदय भिडे
चला जाणून घेऊ या : अस्थमा	सावित्री रामय्या	मुग्धा गोखले
अग्ली	कॉन्स्टन्स ब्रिस्को	उल्का राऊत
क्लाराज् वॉर	क्लारा क्रेमर / स्टीफन ग्लान्झ	डॉ.प्रमोद जोगळेकर
कॅन्सर रोखू या एका सजग जीवनशैलीसह	डेव्हिड सर्व्हन-श्रायबर	वन्दना अत्रे / डॉ.चंद्रकांत संकलेचा

झॅप्ड	कॅरॉल हिगिन्स क्लार्क	जयंत गुणे
द स्पाय गेम	जॉर्जिना हार्डिंग	उज्ज्वला गोखले
द लास्ट ज्यूरर	जॉन ग्रिशॅम	विभाकर शेंडे
माय स्ट्रोक ऑफ इन्साइट	डॉ. जिल बोल्त टेलर	दिगंबर वि. बेहेरे
जॅपनीज रोझ	रेई किमुरा	स्नेहल जोशी
दॅट थिंग कॉल्ड लव्ह	तुहीन ए. सिन्हा	श्यामल कुलकर्णी
अल्टिमेटम	मॅथ्यू ग्लास	सुदर्शन आठवले
स्मार्ट लीडरशिप	गीता पिरामल, जेनिफर नेतरवाला	माधुरी शानभाग
मी का नाही?	पारू मदन नाईक	
तलवारीचा शोध	नॅन्सी यी फान	मंजूषा आमडेकर
डेली इन्स्पिरेशन्स फॉर विमेन	जॅक कॅनफिल्ड	सुनीति काणे
सेक्रेड हार्टस्	सारा ज्युनांट	सुनीति काणे
वन फूट रॉंग	सोफी लगूना	सुनीति काणे
मूल्य जपणारं एक अद्वितीय आयुष्य	एन.आर. नारायण मूर्ती	अंजनी नरवणे
जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स	ल्यूसी।स्टीफन हॉकिंग	डॉ.प्रमोद जोगळेकर
जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट	ल्यूसी।स्टीफन हॉकिंग	डॉ.प्रमोद जोगळेकर
लेनिनग्राडचा वेढा	मायकेल जोन्स	डॉ.प्रमोद जोगळेकर
अ-मृत पंथाचा यात्री	दिनकर जोषी	सुषमा करोगल
अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम	दिनकर जोषी	सुषमा शाळिग्राम
रामायणातील पात्रवंदना	दिनकर जोषी	अंजनी नरवणे
चाय चाय	विश्वनाथ घोष	पूर्णिमा कुंडेटकर
लव्हिंग नॅटली	बेथ हॉलोवे	पूर्णिमा कुंडेटकर
बऊ ठकुरानीचा हाट	रवीन्द्रनाथ टागोर	मेधा तासकर
लव्ह मेडिसिन अँड मिरॅकल	बर्नी सिगेल	डॉ. शुभदा लोहिया
वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन	विद्यमाला बर्च	डॉ. सुभाष दांडेकर
द प्रॉफेट मर्डर्स	मेहमेत मुरात सोमार	जयंत गुणे
द डार्कर साईड	कोडी मॅक	प्रकाश जोशी
कॉनव्हरसेशन्स विथ गॉड	नील वॉल्श	वृषाली पटवर्धन

मिरॅक्युलस इफेक्टस् ऑफ ॲक्युप्रेशर	डॉ.एल.सी. गुप्ता	मुग्धा गोखले
द मॅन इन द वुडन हॅट	जेन गार्डम	मीना शेटे संभू
द ट्रान्सलेटर	दाऊद हॅरी	अजित कुलकर्णी

सुप्रसिद्ध साहित्यिक

व्यंकटेश माडगूळकर

यांचे साहित्य

आता नव्या स्वरूपात प्रकाशित होणार!

- पुढचं पाऊल
- ओझं
- हस्ताचा पाऊस
- पारितोषिक
- वाटा
- पांढऱ्यावर काळे
- कोवळे दिवस
- सुमीता
- उंबरठा
- बाजार
- वाघाच्या मागावर
- काळी आई
- गावाकडच्या गोष्टी
- सिंहाच्या देशात
- गोष्टी घराकडील
- एक एकर
- चरित्ररंग
- मी आणि माझा बाप
- चित्रकथी
- मंतरलेलं बेट
- वावटळ
- चित्रे आणि चरित्रे
- सीताराम एकनाथ
- करुणाष्टक
- सत्तांतर
- प्रवास एका लेखकाचा
- जंगलातील दिवस
- डोहातील सावल्या
- वाळूचा किल्ला
- परवचा
- सरवा
- वारी
- माणदेशी माणसं
- जांभळाचे दिवस
- जनावनातली रेखाटणं
- रानमेवा
- छोटा जवान
- कांगाळांचे चांगभले
- पांढरी मेंढरे हिरवी कुरणे
- अशी माणसं : अशी साहसं
- घरदार
- बेलवण
- नागझिरा

❒

‘उत्तम पुस्तकांना उत्तेजन’या योजनेत शिफारस झालेल्या पुस्तकांची यादी

प्राथमिक/माध्यमिक विद्यार्थी व शिक्षक यांना वाचनासाठी पूरक शैक्षणिक साहित्य म्हणून शाळांच्या ग्रंथालयांसाठी शिफारस करण्यात आलेल्या आमच्या पुस्तकांची यादी.

अनु. क्र.	यादीतील पुस्तकाचे नाव	लेखक	किंमत (रुपये)
	शिफारस केलेल्या पुस्तकांची यादी २००७		
१२	गंपू चिंपू आणि इतर कथा	उमा खरे	३०
१३	मैत्रीचे मोल आणि इतर कथा	उमा खरे	३०
१४	छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	३०
१५	चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	५०
१६	छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	५०
१७	पत्राचा प्रवास आणि इतर कथा	शकुन्तला फडणीस	३०
१८	आजीचा धडा आणि इतर कथा	शकुन्तला फडणीस	३०
१९	गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी	उज्ज्वला केळकर	३०
२०	बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी	उज्ज्वला केळकर	३०
२१	ससुल्या आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
२२	शेपटीवालं झाड आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
२३	चला चहा पिऊया आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
२४	पैज जिंकली छोट्यानं आणि इतर कथा	शकुन्तला फडणीस	३०
२५	बंटू बसला ढगात आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
२६	बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
२७	शूर ससोबा आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
२८	बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	३०
२९	सिंड्रेला आणि इतर कथा	उमा खरे	आ. सं.
३०	खरा मित्र आणि इतर कथा	शरद दळवी	३०
३१	आजीचं घर आणि इतर कथा	शरद दळवी	३०
३२	राजाचं गुपित आणि इतर कथा	मंजूषा आमडेकर	३०
३३	ढुम ढुम ढुमाक ढुम आणि इतर कथा	मंजूषा आमडेकर	३०
३४	एकमेका साह्य करू आणि इतर कथा	शरद दळवी	३०
८८	घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी	उमा खरे	३०

८९	गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी	उमा खरे	३०

माध्यमिक विद्यार्थी (इयत्ता ९वी ते १२वी) (यादी क्र. २)

१७	अंतरिक्षाचा वेध	सुधा रिसबूड	१५०
१८	परमवीर चक्र : मेजर जनरल इयान कारडोझो	अनु. ज्योत्स्ना लेले	१८०
१९	स्ट्रगलर्स	मुक्ता चैतन्य	९०

शिक्षकांसाठी (यादी क्र. ३)

१२	जे.आर.डी : एक चतुरस्त्र माणूस	माधुरी शानभाग	१००
१३	असे घडले सहस्त्रक	निरंजन घाटे/ डॉ.जोगळेकर	३००
१४	औषधाविना आरोग्य	डॉ. रमा/ डॉ. रवि मराठे	२००
१५	पुण्यभूमी भारत : सुधा मूर्ती	अनु. लीना सोहोनी	१३०

शिफारस केलेल्या पुस्तकांची यादी २००८

२२	सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या (फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००८) ('राजहंस प्रकाशन' पुरस्कार) (अ.भा.म.प्रकाशक संघ-उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २००६-०७)	चारुता पुराणिक	३०
२३	जादूचं तळं आणि इतर गोष्टी	निर्मला मोने	३०
२४	लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या	चारुता पुराणिक	३०
२५	हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या	चारुता पुराणिक	३०

माध्यमिक विद्यार्थी (यादी क्र. २)

५३	अलाइव्ह : पिअर्स पॉल रीड	अशोक पाथरकर	१५०
५७	सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा : बिजयालक्ष्मी होता	अनु. प्रशांत तळणीकर	७०
६२	विमुक्त	दादासाहेब मोरे	१३०
६५	महाभारतातील पितृवंदना : दिनकर जोषी	अनु. सुषमा शाळिग्राम	१३०
८१	अंतराळवीर सुनीता विल्यम्स : कॅप्टन एस. शेषाद्री / अराधिका शर्मा	अनु. चित्रा वाळिंबे	८०
८३	डिझाईन युअर करिअर : श्रीनिवास पंडित	अनु. सुप्रिया वकील	१२०

उच्च माध्यमिक विद्यार्थी

१०	प्रेमाचा रेणू (राज्य शासनाचा 'र.धों. कर्वे पुरस्कार' २००७-०८)	संजय ढोले	१८०
१७	सुकेशिनी : सुधा मूर्ती	अनु. लीना सोहोनी	१३०
१८	थैलीभर गोष्टी : सुधा मूर्ती	अनु. लीना सोहोनी	१५०

३०	A to Z विज्ञान	डी.एस. इटोकर	८०
४९	टू सर विथ लव्ह : ई.आर. ब्रेथवेट	अनु. लीना सोहोनी	१५०

('धि गोवा हिंदु ॲसोसिएशन'तर्फे सर्वोत्कृष्ट अनुवादासाठी जी.ए. कुलकर्णी पुरस्कार)

५६	महाभारतातील मातृवंदना : दिनकर जोषी	अनु. सुषमा शाळिग्राम	९०
५७	पोस्टमास्तर आणि इतर कथा : रवींद्रनाथ टागोर	अनु. मृणालिनी गडकरी	१४०

शिक्षकांसाठी (यादी क्र. ३)

२	एड्स	डॉ. दिलीप बावचकर	१५०
१५	तुकयाची आवली (तुका म्हणे पुरस्कार २००८) (भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील वाचनवेध पुरस्कार २००८)	मंजुश्री गोखले	१५०
२६	चार शब्द द्यावे-घ्यावे	संजीव परळीकर	७०

शिफारस केलेल्या पुस्तकांची यादी २००९

(अ) प्राथमिक विद्यार्थी (इयत्ता १ली ते २री)

०३	जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी	वैशाली कार्लेकर	३०
०४	फट्फजिती आणि जंमत गोष्टी	वैशाली कार्लेकर	३०
०५	समयसूचक तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
०६	बुद्धिमान तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
०७	निर्भय तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
०८	लाडका तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
०९	चतुर तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
१०	न्यायप्रिय तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
११	जगावेगळा तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
१२	राज्याचे भूषण तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
१३	प्रसंगावधानी तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
१४	हजरजबाबी तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०

(ब) प्राथमिक विद्यार्थी (इयत्ता ३री ते ४थी)

१८	झॅकपॅक शोध आणि इतर कथा	राजीव तांबे	३०
१९	छत्रीची जादू आणि इतर कथा (राज्य पुरस्कार २००८-२००९)	राजीव तांबे	३०

(क) माध्यमिक विद्यार्थी (इयत्ता ५वी ते ८वी)

१०	विज्ञान नवलाई - आपले पूर्वज	डॉ. बाळ फोंडके	५०
११	विज्ञान नवलाई - अंतराळ	डॉ. बाळ फोंडके	५०
१२	विज्ञान नवलाई - भूगोल	डॉ. बाळ फोंडके	५०

१३	विज्ञान नवलाई - पशू-पक्षी	डॉ. बाळ फोंडके	५०
१४	विज्ञान नवलाई - प्राणिजगत	डॉ. बाळ फोंडके	५०
१५	विज्ञान नवलाई - खगोल	डॉ. बाळ फोंडके	५०
	(ड) उच्च माध्यमिक विद्यार्थी (इयत्ता ९वी ते १२वी)		
०४	अमरगीत : बाबा आमटे यांचं जीवनचरित्र : निशा मीरचंदानी	अनु. लीना सोहोनी	२००
०९	धीरुभाईझम : ए.जी. कृष्णमूर्ती	अनु. सुप्रिया वकील	९०
१२	फक्कड गोष्टी	शंकर पाटील	१२०
१३	आभाळ	शंकर पाटील	१००
१७	चिकन सूप फॉर द सोल- भाग २ : जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन	अनु. प्रज्ञा ओक	२००
१८	चिकन सूप फॉर द सोल- भाग ३ : जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन	अनु. उषा महाजन	२००
	(इ) शिक्षकांसाठी		
०८	ऋतू न्याहाळणारं पान : वि.स. खांडेकर	संपादक : डॉ.सुनीलकुमार लवटे	१३०
१७	पहिली फेरी (१९६५ भारत-पाक युद्ध)	राम प्रधान	१५०

❐

प्रिय वाचकमित्रहो........

आपल्या सोयीसाठी
'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे ग्रंथदालन आठवड्याचे
सातही दिवस
नियमित सुरू राहील.
वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०
रविवारी सकाळी १० ते ४

सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना
मेंबरकार्ड जरूर आणावे.

८ वी आवृत्ती आता नव्या रूपात



संभाजी

विश्वास पाटील

४८०रु. पोस्टेज ३०रु.

औरंगजेबाच्या पाच लाख फौजेशी सलग आठ वर्षे
कडवी झुंज देणारा मराठ्यांचा दुसरा छत्रपती,
ज्याने वयाच्या बत्तीसाव्या वर्षी कराल काळाच्या वेदीवर
आपले मस्तक दिले;
पण शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातील
एकही महत्त्वपूर्ण किल्ला
किंवा आपल्या आरमारातील एकही जहाज गमावले नाही!
गेली सव्वातीनशे वर्षे या विचारी,
कवी-राज्यकर्त्याची आणि पराक्रमी सेनानीची गाथा
संशयाच्या धडप्यामध्ये गुंडाळून ठेवली गेली होती!

आजचे अग्रगण्य प्रतिभावंत कादंबरीकार विश्वास पाटील यांना
सह्याद्रीच्या निबिड दऱ्याखोऱ्यांनी,
सागरखाड्यांनी आणि दुर्लक्षिलेल्या दुर्मिळ कागदपत्रांनी
सांगितलेली शिवपुत्र संभाजीराजांची

चित्तथरारक, वादळी, पण वास्तव गाथा!!

वाचकांचा प्रतिसाद

प्रकाशक,
मेहता पब्लिशिंग हाऊस
पुणे ३०.

'हिरॉईन ऑफ द डेझर्ट' हे डोन्या अल-नही ने लिहिलेले व शोभना शिकनीस यांनी अनुवाद केलेले पुस्तक वाचले आणि एक थरारक अनुभव आला. लेखिकेने सूक्ष्म बारकाव्यासह वर्णन केल्याने त्यातील प्रत्येक प्रसंग स्वत: अनुभवल्यासारखे वाटले. अंगावर शहारे आले. दुसऱ्या धर्माचे आकर्षण सर्वांनाच असते. धर्मांतर केल्यावर त्याचे काही फायदे आहेत तसे काही तोटेही आहेत हे प्रत्यक्ष अनुभवायला मिळते तेव्हाच समजते. तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

शोभना शिकनीस यांनी मुळ पुस्तकाचे भाषांतर सुंदर केलेले आहे.

शोभना शिकनीस यांचे कॉलेलजीवनावरील अनुभव कथन मी आपल्या दिवाळी अंकात वाचले होते तेव्हा त्या एक सशक्त लेखिका वाटल्या होत्या. त्याचा पुन्हा एकदा अनुभव आला. या लेखिकेचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व मनाला लुभावते.

विजय परांजपे
पुणे

श्री. श्याम भुर्के यांनी लिहिलेल्या 'आनंदाचे पासबुक' या पुस्तकात बँकेतील नोकरी करताना आलेले अनुभव आणि साहित्य - कलाक्षेत्रातील नामवंतांच्या आठवणी टिपलेल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक समाजाला मार्गदर्शक ठरणारे आणि संग्रही ठेवावे असे झाले आहे.

श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले
खासदार, सातारा

श्रद्धांजली

*** ज्येष्ठ साहित्यिक चारुता सागर**

दंडोबा डोंगरखोऱ्यातील भटक्या व विमुक्त समाजाचे जीवन आपल्या सिद्धहस्त लेखणीने चितारणारे लेखक चारुता सागर (दिनकर दत्तात्रय भोसले) यांचे दि. २९ मे रोजी निधन झाले.

दिनकर भोसले मूळचे कवठेमहांकाळ तालुक्यातील मळणगावचे.

दि. २१ नोव्हेंबर १९३० रोजी त्यांचा जन्म झाला.आपल्या तारुण्यातील सतरावे वर्ष भटकंतीत घालविले. बंगाली लेखक शरदबाबू यांच्या 'बडी दीदी' या कादंबरीने चारुता सागर प्रभावित झाले. या लेखकाने चितारलेली माती कशी आहे हे पाहण्यासाठी वंगभूमी पालथी घातली. हमालापासून मढी जाळण्यापर्यंतची कामे करून जीवनानुभव समृद्ध केला. काही काळ सैन्य दलातही काम केले. पुढे लोणारवाडी येथे शाळा सुरू केली.

चारुता सागर यांची साहित्यिक ओळख नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जोगवा' या मराठी चित्रपटावरून मिळते. त्यात त्यांच्या 'दर्शन' या कथेची मूळ कल्पना वापरण्यात आलेली आहे. या चित्रपटाला अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले.

चारुता सागर यांचे 'नागीण', 'मामाचा वाडा' व 'नदीपार हे तीन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'नागीण' या कथेने त्यांना साहित्यक्षेत्रात लौकिक प्राप्त झाला.

सन १९७६-७७ मध्ये राज्य शासनाचा लघुकथा पुरस्कार, सन १९७१ मध्ये लिमये पुरस्कार, मार्च २०११ कोल्हापूर येथील वुईमेन्स फाऊंडेशनचा उत्कृष्ट कथालेखक पुरस्कार, ग्रामीण पत्रकार संघटनेचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. 'नागीण' या कथासंग्रहाचा शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. मुंबई दूरदर्शनवर 'गावाकडच्या गोष्टी' व 'राव' या कथांचे तर सांगली आकाशवाणी केंद्रावरून त्यांच्या कथांचे नाट्यरूपांतर सादर करण्यात आले.

*** ज्येष्ठ नाट्यकर्मी रामदास बरकले**

नाशिक येथील ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक व अभिनेते प्रा. रामदास बरकले (६६) यांचे १४ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे असा

परिवार आहे. स्थानिक पातळीवर शिक्षण तसेच नाट्यक्षेत्रात बरकले यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला होता. प्रथम शिक्षक आणि नंतर दीर्घकाळ प्राध्यापक म्हणून काम करतानाच बरकले यांनी अभिनय व दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही मुशाफिरी केली.

१९६६ साली राज्य नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक पटकावून त्यांनी आपल्यातील अभिनय कौशल्याची प्रचीती दिली. पुढे मात्र ते दिग्दर्शनाच्या क्षेत्रात अधिक रमले. एकूण १४ नाटकांचे दिग्दर्शन केले. राज्य नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पुरस्कार मिळाला, तर १९९२ मध्ये अंतिम स्तरावर दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. नाट्य चळवळीशी त्यांची नाळ अखेरपर्यंत घट्ट राहिली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी १० पुस्तकांच्या लेखनात त्यांचा सहभाग होता. नटवर्य कोल्हटकर पुरस्कार, नाट्य व शिक्षण क्षेत्रासाठीचा निर्मल पुरस्कार, शिक्षणतज्ज्ञ एम. बी. बूच पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार आदी सन्मानांचे ते मानकरी ठरले.

*** बंगाली नाट्यदिग्दर्शक बादल सरकार**

हिंदी व बंगाली नाट्यदिग्दर्शक, ज्येष्ठ लेखक बादल सरकार (वय ८५) यांचे प्रदीर्घ आजाराने १३ मे रोजी पश्चिम बंगालमधील माणिकताला येथे त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. सरकार यांचा जन्म १५ जून १९२५ रोजी झाला. वडील इतिहासाचे प्राध्यापक असल्याने वाचनाचे बाळकडू त्यांना मिळाले. त्यांना शालेय जीवनापासूनच नाटकाची आवड होती. लेखनातही त्यांना विशेष रस होता. नाट्यसृष्टीतील प्रतिभा त्यांना खुणावत होती. १९४५ पासून बादल सरकार यांच्या लेखणीचा आणि दिग्दर्शनाचा झंझावात सुरू झाला.

७०च्या दशकात नक्षलवादी चळवळ फोफावली. याच काळात सरकार यांनी लिहिलेली आणि दिग्दर्शित केलेली अनेक नाटके रसिकांनी अक्षरश: डोक्यावर घेतली.

'बासी खबर', 'एबोंग इंद्रजित', 'पगला घोडा', 'सारी रात' ही त्यांची विशेष गाजलेली नाटके. १९६६ मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाला. १९७२ मध्ये त्यांना भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविले. ९७ मध्ये संगीत अकादमीने 'रत्नसदस्य' हा बहुमान सरकार यांना दिला.

*** चित्रकार एम. एफ. हुसेन**

आपल्या चित्रकलेने भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणारे व दुसरीकडे काही वादग्रस्त चित्रांमुळे देशात टीकेचे धनी बनलेले प्रख्यात चित्रकार मकबूल फिदा हुसेन (वय ९५) यांचे लंडनमध्ये प्रदीर्घ आजाराने निधन झाले.

रॉयल ब्रॉम्प्टन रुग्णालयात गेला महिनाभर ते उपचार घेत होते. पंढरपूर येथे

१७ सप्टेंबर १९१५ रोजी हुसेन यांचा जन्म झाला. बोहमन येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय लिलावामध्ये हुसेन यांचे चित्र २.३२ कोटी रुपये या विक्रमी किमतीला विकले गेले. युरोप व अमेरिकेत त्यांच्या चित्रांना वाढती मागणी होती. अनेक आंतरराष्ट्रीय चित्रकला प्रदर्शनांमध्ये त्यांच्या चित्रांचा सन्मान केला गेला. त्यांनी हिंदू देवतांची नग्नावस्थेतील चित्रे काढल्यानंतर टीकेचे वादळ उठले होते. त्यांच्या मुंबईतील घरावर १९९८ मध्ये हल्ला करण्यात आला होता. भारतात त्यांच्या चित्रांना विरोध वाढत गेला व त्यांच्या विरोधात अनेक खटले न्यायालयात दाखल करण्यात आले. काही धार्मिक संघटनांनी त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली.

१९५५ मध्ये पद्मश्री किताबाने आणि१९९१ मध्ये पद्मविभूषण किताबाने गौरविण्यात आले. जागतिक कीर्तीचे चित्रकार पाब्लो पिकासो यांच्याबरोबर हुसेन यांना साओ पावलो येथे १९७१ मध्ये एका चित्रकला प्रदर्शना निमित्त आमंत्रित करण्यात आले होते.

*** प्रसाद मासिकाचे संपादक बापूसाहेब जोशी**

'प्रसाद' मासिकाचे संपादक आणि श्री देवदेवेश्वर संस्थानचे विश्वस्त मनोहर यशवंत ऊर्फ बापूसाहेब जोशी (वय ७१) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ साहित्यिक आणि 'प्रसाद' मासिकाचे संस्थापक-संपादक य.गो. जोशी यांचे बापूसाहेब चिरंजीव होत.

य.गो. जोशी यांनी साठ वर्षांपूर्वी 'प्रसाद' या धार्मिक विषयाला वाहिलेल्या मासिकाची सुरुवात केली. वडिलांच्या निधनानंतर बापूसाहेबांनी ४० वर्षे या मासिकाच्या संपादकपदाची धुरा सांभाळली. वेद, पुराणे, उपनिषदे, सुबोध शांकर ग्रंथावली, देवभाषेचे देणे-मराठीचे लेणे, आद्य शंकराचार्यांचे वाङ्मय, प्राचीन संस्कृत नाटके याविषयी मराठीतून माहिती देतानाच त्यांनी विविध दैवतांवर विशेषांक प्रकाशित केले होते. देवदेवेश्वर संस्थानचे सुमारे २५ वर्षे ते विश्वस्त होते. सारसबाग, पर्वती, मृत्युंजयेश्वर आणि दशभुजा गणपती या मंदिरांचा कायापालट करण्यात त्यांचाही पुढाकार होता. गोपाळ हायस्कूल, सरस्वती विद्यामंदिर आदी संस्थांशीही ते संबंधित होते.

*** करुणा देव**

सुप्रसिद्ध आकाशवाणी कलावंत, अभिनेत्री करुणा देव यांचे ५ जून रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने राहत्या घरी निधन झाले. त्या ७६ वर्षांच्या होत्या. ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांच्या त्या पत्नी होत. मूत्रपिंड आणि पित्ताशयाच्या विकाराने त्या आजारी होत्या.

आकाशवाणीमध्ये व्हॉईस आर्टिस्ट असूनही करुणा देव यांनी रेकॉर्डिंग, निर्मितीतंत्र

आत्मसात केले होते.

'पुन्हा प्रपंच' या आकाशवाणीवरील तुफान गाजलेल्या श्रुतिका मालिकेतील मीनावहिनी ही व्यक्तिरेखा त्यांच्या आवाजातील होती. या श्रुतिकेतील टेकाडे भावोजी 'मीनावहिनी' असे सारखे पुकारत असत. ते आजही आकाशवाणीच्या श्रोत्यांच्या स्मरणात आहे. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अनेक नाटकांतून त्यांनी कामे केली होती. करुणा देव १९५८ मध्ये नाट्यविभागात रुजू झाल्या आणि आकाशवाणीच्या ड्रामा व्हॉइस ए क्लास आर्टिस्ट म्हणून अनेक श्रुतिका त्यांनी गाजवल्या. आवाजाची देणगी त्यांना लाभली होती आणि अगदी शेवटपर्यंत त्यांचा आवाज सुरेख होता.

*** ज्येष्ठ लेखिका कमल देसाई**

मराठी साहित्यविश्वाला वेगळी दिशा देणाऱ्या ज्येष्ठ लेखिका आणि साहित्याच्या अभ्यासक कमल देसाई यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या. सांगली येथील 'श्वास' हॉस्पिटल मध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले. कमलताईंचा जन्म बेळगाव मधील यमकनमर्डी येथे १० नोव्हेंबर १९२८ रोजी झाला. साहित्य, तत्त्वज्ञान, भाषाविज्ञान, मानसशास्त्र, पर्यावरण, सौंदर्यशास्त्र हे त्यांचे अभ्यासचिंतनाचे विषय होते. १९६२ मध्ये त्यांचा रंग-१ हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर १९७५ मध्ये 'काळा सूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' ही जोड कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीला मोठी लोकप्रियता मिळाली. या कादंबरीचा सुखमयी रॉय यांनी इंग्रजी अनुवाद केला. त्यांच्या काही कथांचे जर्मन आणि अन्य भाषांत अनुवाद झालेले आहेत. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या त्यांच्या लघुकादंबरीला साहित्यविश्वात गौरविण्यात आले. महाराष्ट्र सरकारच्या साहित्य व सांस्कृतिक मंडळाने नुकतीच त्यांना 'गौरववृत्ती' प्रदान केली. तसेच मुंबई येथील कुसुमताई चौधरी महिला कल्याणी ट्रस्टतर्फेही त्यांना 'गौरववृत्ती'ने सन्मानित करण्यात आले होते.

❐

पितृऋण

३री आवृत्ती

सुधा मूर्ती अनु. मंदाकिनी कट्टी

नियतीचा बळी ठरलेल्या पित्याची जबाबदारी स्वत:च अर्घ्य देऊन पूर्ण करणाऱ्या मुलाचं अस्वस्थपण... आणि त्या पूर्ततेसाठी खंबीर उभी राहिलेली मुलगी यांचं अतूट नातं जपणारी कहाणी

८०रु. पोस्टेज २०रु.

Mehta Publishing House - English Books

Book Name	Author	Price (Rs.)
An Introduction to Linguistic Theories	S. V. Shastri/ L. M. Goud	90
Untouchable	Mulk Raj Anand	60
Two on a Tower	Thomas Hardy	100
Plenty For All	S. A. Dabholkar	400
Indian English Poems	Ed.by Dr. Shirish Chindhade	50
Selected English Essays	Ed. by Dr. Shirish Chindhade	50
Glimpses of Changing Banking Scenario	P. N. Joshi	300
The Breadwinner (Fiction)	Deborah Ellis	120
Parvana's Journey (Fiction)	Deborah Ellis	120
Mud City (Fiction)	Deborah Ellis	120
Salt & Honey (Fiction)	Candi Miller	200
Call Centre : An Inside Story (Fiction)	Vikrant Shukla	250
The Myth Called Wealth (Non Fiction)	Rajesh Wattamwar	150
Master your Mind (Mental Health Guide)	Dr. Neel Burton	200
The Meaning of Madness (Mental Health Guide)	Dr. Neel Burton	225
Plato's Shadow (Philosophy)	Dr. Neel Burton	250
Cancer Care and Mysteries and Yoga (Health and Medicine)	Dr. Nitin Unkule	295
Japanese Magnolia (Fiction)	Rei Kimura	299
Japanese Orchid (Fiction)	Rei Kimura	249
50 Years of Silence (Memoir)	Jan Ruff-O'Herne	275







Awa Maru - Titanic of Japan (Fiction)	Rei Kimura	149
Speeches that Reshaped the World (Ref)	Alan J. Whiticker	300
Speeches of War and Peace (Reference)	Larry Buttrose	300
One Foot Wrong (Fiction)	Sofie Laguna	200
Never to Return (Non Fiction)	Sandy Reid	255
Schapelle (Biography)	Tony Wilson	280
Fifty Years Of Silence	Jan Ruff-O'Herne	300

Mehta Publishing House - Forthcoming English Books

Like A Willow Tree	Rei Kimura
Betrayed	Latifa Ali with Richard Shears
The Spare Room	Helen Garner
In The Hands of Taliban	Joanie de Rijke
Slumboy	Mouhssine Ennaimi
Why My Third Husband Will Be A Dog	Lisa Scottoline
Why I Am Still Married	Karen Propp And Jean Trounstine
Kiss Of Saddam	Michelle McDonald
The Women On The Mountain	Sharyn Munro
Paper Cranes	Cheryl Koenig
Mr. Two Bomb	William Coles
Parenting The Office	Doris S. Davidoff
Shattered Silence	Melissa G. Moore & M. Bridget Cook
The Women Before Me	Ruth Dugdall





नवे कोरे

‘स’ सुखाचा!

जॉन ग्रे

अनु. **ॲड. शुभदा विद्वांस**

२९०रु. पोस्टेज ३०रु.

जर तुमच्या घरातल्या भिंतींना तडे जायला लागले,
तर तुम्ही काय कराल?
प्रथम पाया मजबूत करण्याचा प्रयत्न कराल.
जर तुमची झाडे सुकून पिवळी पडायला लागली,
तर तुम्ही झाडाला हिरवा रंग देऊन ते ठीक करण्याचा
प्रयत्न कधी कराल का? नाही.
तुम्ही झाडांना पाणी घालाल,
तसेच जेव्हा आपण आपल्या प्रेमाचा वर्षाव करतो,
तेव्हा आपली अनेक संकटे
आपली आपणच नाहीशी होतात. आपल्याला हव्या
असलेल्या गोष्टी मिळत जातात तसतशी आपल्या
स्वत:लाच आपली ओळख पटत जाते.

अनुक्रमणिका

मामाचा गावं १०६

चंदेरी कुपी १०७

मामाचा गाव

मामाकडे जाण्यासाठी मुले झाली गोळा
साऱ्याच भाचरांना आहे मामाचा लळा
भाऊबीजेला येते मामाची गाडी नवी
मुलांना घेऊन जाते आजोळच्या गावी
मामाचा मळा छान हिरवागार
सोनकेशरी, मखमली झेंडू तजेलदार
दातांनीच सोलायचा गोड उस ताजा
लहानग्यांची असते मात्र मजा
डोळ्यांना सुखावते, राई हिरवीगार
बोरं आणि चिंचा लज्जतदार
पाटातून धावतंय मोटेचं पाणी
लहानश्या नदीची झुळझुळु गाणी
नदीमध्ये डुंबायचं सोनेरी उन्हात
'सुट्टी संपू नये' असे येते मनात
वडाखाली चालायचा सूर-पारंबी खेळ
विटी-दांडू, लगोऱ्यांचा रोजचाच मेळ
भरल्या वांग्याची खुमासदार भाजी
चुलीवर भाकरी करून वाढते आजी
चौघडीला आजीच्या छानदार ऊब
तिच्यासाठी भावंडे भांडतात खूप
सुट्टी संपल्याच्या जाणीवेने सुकतात चेहरे
कसे उडून गेले दिवस सुट्टीमधले सारे



उषा दातार
सिंहगड रोड, पुणे

चंदेरी कुपी

(मागील अंकावरून)

तोच ते घडले, एक जाडा माणूस एका काळ्या मांजरामागे गेला. त्याला तिचा, तिला त्याचा धक्का लागला. कोणाची तरी एकाचा पाण्याने निसरड्या बनलेल्या चिखलात तोल गेला. दुसऱ्याला मदतीसाठी धरायच्या नादात त्यालाही चिखलात लोळवले गेले.

ओम त्या मुलीला सावरायला धावला. त्याच्या धावण्याच्या खळखळाटाने चिखलाचे पाणी उडून त्या जाड्याच्या नाकातोंडात गेले.

हिंस्त्र श्वापदासारखा जाड्याने चेहरा फेंदारला.

डोळ्यात पाणी जाऊन त्याचे डोळे लाल झाले होते. त्याचा अवतार पाहून ओम घाबरला.

ती मुलगी मात्र शांतपणे उठून उभी राहिली. तिने एकवार मारक्या म्हशीच्या नजरेने त्या जाड्याकडे पाहिले. मग आपले दप्तर आणि चिखलात पडलेल्या चीजवस्तू ती गोळा करायला लागली.

''ए पोरटे,'' जाड्याने उठून तिचा कान धरत खडसावले.

तिने सरळ हातात आलेले काहीतरी टोकेरी साधने त्याच्या गुडघ्यात खुपसून दिले.

जाड्याने आकाशाच्या दिशेने तोंड वासत आ करून एक डरकाळी फोडली. त्याच्या पायावर दप्तर मारून देऊन तिने परत एकदा त्याला चिखलात लोळवले.

ओमचा हात धरून तिने त्याच्यासोबत तिथून पळ काढला.

पिसाळलेला जाड्या पुन्हा भानावर येईपर्यंत ती दोघे त्याच्या नजरेआड सुरक्षित ठिकाणी पोहोचली.

तेजा ठाकर या वाघिणीबरोबर आपला परिचय देताना ओम

मनोमन लाजला. त्याला दिसले, वाघीण जखमी झाली होती. तिच्या हाताच्या कोपऱ्यातून खरचटल्याचे रक्त येत होते. तिने त्यात काय मोठेसे म्हणून नाक उडवले. पण ओमने जखमेवर हळूवारपणे फुंकर घातली. ''आता कसे वाटते?'' विचारले. त्यावर तिने हसून बरे वाटते म्हटले. ओमचा जीव भांड्यात पडला.

आज तुझी शाळा चालू कशी म्हणून ओमने चौकशी केली. तिने परत नाक उडवले. शाळेवर ती नाखूष दिसली. ओमने साळसूदपणे

तिला शाळा आवडत नाही का विचारले. तिने अजिबात नाही या अर्थाने मान हलवली. ओमने सुस्कारा सोडला. त्याला एक समविचारी साथीदार मिळाला होता. नंतर ओमने शाळेविषयी विचारायचा बराच प्रयत्न केला. तेजाने त्याला फारशी दाद दिली नाही. मध्येच ती मी साबरी गुरुकुलात जाते, असे काहीतरी बोलली आणि जीभ चावून आता मी जाते म्हणत निघाली.

ओमने आजच्या दिवसाला इतके तर इतके म्हणत समाधान

मानले. ओम तसा अल्पसंतुष्ट होता. अर्थात ओमच्या गरजा ज्यांना भागवाव्या लागत, त्या त्याच्या आईबाबांना ही गोष्ट मान्य झाली नसती. असो.

दुसऱ्या दिवशी कधी नव्हे तो ओम शाळेच्या बससाठी वेळेच्या आधीच आला. लवकर आल्यामुळे तेजाला भेटण्याची नामी संधी त्याला मिळाली. काल पडली होती त्या जागी तेजा काहीतरी शोधत होती.ती फारच घाबरीघुबरी झालेली होती. कालची वाघीण आज एक म्यॉंव झाली होती.

ओमला पाहताच ती आशेने त्याच्याकडे घाईघाईने आली.

"तू काल तिथे चपटी पोलादी कुपी पडताना पाहिली होती का?'' असे तिने विचारले.

तोही तेजाबरोबर त्या चिखलात ती कुपी शोधू लागला. अजून शोधाशोध पुरीही झाली नव्हती की तिची बस आली.

ओमने पाहिले एका पान खाऊन,लालजर्द झालेल्या जिभेच्या उग्र बसवाहकाने तिला ओढून आत घेतले. दारावर दणक्यात थाप दिली आणि बस पुढे निघाली. बसच्या चाकाने चिखल भुर्र ओमच्या कपड्यावर उडवला. ओम मनोमन जाम उखडला. तोच टायर पुढे सरकल्यावर चिखल बाजूला झाल्याने त्या खड्ड्यात उघडी पडलेली, बंदुकीच्या गोळीच्या आकाराची, चांदीसारखी चमचमणारी कुपी ओमच्या नजरेस पडली.

ओमचे डोळे लखलखले. त्याने ती उचलून घेतली. ती कुपी चांदीची नाही, सोन्याची आहे असे त्याला वाटले.

ओम ती निरखत असतानाच त्याच्या बोकांडी कोणाची तरी मजबूत पकड बसली. ओमला बखोट उचलून कोणीतरी वर धरले आणि सात आसमान दाखविले. कालच्याच त्या जाड्याने, ओमच्या हातातून ती कुपी हिसकावून घेतली.

ओमला त्याने परत चिखलात फेकले. वाघाने पायापाशी पडलेल्या मेलेल्या उंदराकडे टाकावी तशी तुच्छ नजर टाकून ओमला पायाखाली चिरडून टाकण्यासाठी त्याने पाय उचलला.

एक लालभडक धोतर नेसलेल्या बुवाने त्याचा तो पाय आपल्या छत्रीच्या मुठीने मागच्या मागे ओढला. तो गेंडा धडामकन् चिखलात तोंडघशी पडला. दातावर आपटला. पण किती दात पडले हे त्याला मोजता आले नाही.

लालभडक धोतर नेसलेल्या आणि धोतरापेक्षा लाल झालेल्या बुवाच्या छत्रीचा छडिमार त्याच्यावर सुरू झाला. त्याने पळ काढला.

ओम उठून उभा राहिला. या असल्या चिखलभरल्या अवतारात शाळेत जाणं अशक्य होतं. मग तो आता काय करणार होता? त्याला आठवलं, तेजाला त्या कुपीचं अतोनात महत्त्व होतं. ती परत मिळवता आली तर त्याला बघायचे होते. झालं तर त्या धोतरवाल्या बुवाला भेटून,जीव वाचवल्याबद्दल त्याच्या पायावर डोके ठेवायचे होते. राक्षस जाड्या जर का हात पाय शाबूत अवस्थेत नसला तर त्याला दोन चार लाथा मारायच्या होत्या. त्यासाठी आधी जाड्याला शोधून काढणं भाग होतं. ओमने जाड्या पळाला होता त्याच दिशेने कूच केले. थोड्याच अंतरावर पानाच्या ठेल्यावर जाड्या धडधाकट उभा होता. त्याला लाथा हाणण्यापेक्षा त्याच्या लाथा वाचवण्यासाठी ओमला आडोसा शोधावा लागला.

जाड्याने पानवाल्या राघवला कुपी दाखवून काही विचारले. पानवाल्याच्या अंगावर एक नोट फेकली. पान घेऊन तोंडात घातले. पानवाल्याने दुकानात बरीच शोधाशोध करून एक काळा दोरा शोधून काढला. तो घेऊन दांडगोबाने त्यात कुपी ओवली आणि स्वत:च्या गळ्यात बांधली. पचकन पानाची पिचकारी तिथल्या रंगलेल्या भिंतीवर मारली. एका दुचाकी गाडीवर जाऊन बसला. गाडी सुरू होऊन भुर्रकन छू सुद्धा झाली.

ओमला केवळ बघत राहण्यापलिकेडे काही करता आले नाही.

तेजाच्या शाळेच्या बसची परतीची वेळ ओमला माहित झाली होती. तो तिची भेट घ्यायला परत रस्त्यावर आला.

तेजाची बस आली. तेजा उतरली. बस निघून गेली.

तेजाचा कालचा आवेश गायब होता. तिने परत शोधाशोध सुरू केली. ओम तिला भेटला. त्या जाड्या दांडगटाबद्दल सांगितले. तिचे डोळे चमकले. ओम तिला दुकानापाशी घेऊन गेला. तिने सरळ पानवाल्या राघवला कुपीबद्दल विचारले. त्याने दोघांनाही वाटेला लावले.

तेजा जाम घायकुतीला आली. हातवारे करत मोठ्यामोठ्याने ती काहीबाही बरळू लागली. ती काय बडबड करतेय, मध्येच दुसऱ्याच कोणत्या भाषेत बडबडतेय, ओमला काही कळले नाही.

''एका कुपीचे ते काय? असेना सोनेरी.''

''सोनेरी नव्हे चंदेरी,'' तेजाने त्याला फटकारले.

ओम जरा तिरमिरला.

''मातीत मला ती चंदेरी वाटली होती, पण मी हातात धरली तेव्हा ती सोन्यासारखी पिवळी दिसत होती.'' ओमने ठासून सांगितले.

''छट, पोलादी कुपी चंदेरी असते.''

''चंदेरी तर चंदेरी.'' ओमने हात उडवले, ''त्यात काय? आई बाबा जरा रागावतील.फार तर दोन दिवस कोंडून ठेवतील. एवढेच. त्याचे काय? एवढे आहे तरी काय त्यात?'' ओमने तिला विचारले.

त्यात काय आहे ते तर तेजाला स्वत:लाचा माहित नव्हते. पण ती कुपी मिळाली नाही तर तेजाला शाळेतून काढून टाकणार होते.

ओमला विनोद करण्याची उबळ आली. ''वा! हे फारच छान. मला जर माझ्या शाळेतून अशी कुपी देण्यात आली तर पहिल्या

झटक्यात ती कुठेतरी फेकून देईन. शाळेतून सुटलो तर अजून काय पाहिजे?'' ओमच्या तोंडातून जणू लाखो करोडो मुलांचे मनोगत शब्दात उतरले होते. इतके इतके खरे आणि म्हणूनच कितके कितके बोचरे.

''खरेच का तुला शाळेतून काढून टाकणार असतील तर तू.. तू?'' तेजाला तिचे वाक्य पुरे करता आले नाही. ओमने खरोखर स्वत:वर अशी परिस्थिती ओढवली तर काय होईल याचा विचार केला आणि तो गंभीर बनला. शाळा कितीही नावडती असली तरी त्याच्यासारख्या लहान मुलांच्या आयुष्यात शाळा नसेल तर त्यासारखे लाजिरवाणे काहीच असणार नव्हते. नुस्ते नापास झाले तर एवढा गहजब होतो. मग शाळेतून काढून टाकले तर काय? या कल्पनेने त्याचे डोके गरगरले. त्याच्या डोळ्यासमोर चहाच्या हॉटेलात कप-बश्या विसळणारा बाबू आला. सगळीकडे हिडीसफिडीस होणारा बाबू. इतर मुले त्याला बाबू न म्हणता ''हाड हाड बाबू'' म्हणत. ''हाड हाड ओम'' ऐकणं त्याला कसंसंच वाटलं असतं.

''तुझ्या आईबाबांना हे माहित आहे का?'' ओमने खबर मुख्य शत्रुपक्षापर्यंत पोहोचली आहे का याचा अंदाज घेण्यासाठी विचारले.

''अजून नाही.'' तेजाने रडवेल्या मुद्रेने म्हटले.

'' पण त्यात तुझा काय दोष आहे?'' ओमने असे म्हणताच तेजाचे डोळे भरून आले. आजपर्यंत कधी कोणी असा विश्वास तिच्यावर दाखवला नव्हता. सगळे तिला उनाड, चुकार, वाया गेलेली समजत होते. कुपी तिच्या हातातून अपघाताने नव्हे, तर काही कलागतीत पडली असणार असेच सगळे समजणार होते. काकाने तर तिनेच खोडसाळपणे लपवलीय असे म्हणायला कमी केले नसते. तिला कसे शांत करावे ते ओमला समजेना. (क्रमश:)

समीर बागायतकर, वेंगुर्ला

९८६०४९८८६२

दिवाळी अंक २०११
बालमित्रांसाठी स्पर्धा
मुलाखत घ्या, बक्षिस मिळवा

बालमित्रांनो,

यंदाच्या दिवाळी अंकासाठी एक स्पर्धा जाहीर करीत आहोत.

- तुम्ही वृत्तपत्रात आणि टिव्हीवर नामवंत नेते, कलावंत, कार्यकर्ते यांच्या मुलाखती बघितल्या असणार. एक मुलाखतकार म्हणून तुम्हाला संधी मिळाली तर?

- समाजसेवक अण्णा हजारे - मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण
- शास्त्रज्ञ जयंत नारळीकर - अभिनेता मकरंद अनासपुरे
- या पैकी एखादी व्यक्ती तुम्हाला भेटली आणि तिची मुलाखत घेण्याची संधी तुम्हाला मिळाली तर तिला कोणते प्रश्न विचाराल?
- तिला विचारावेसे वाटतील असे दहा प्रश्न तुम्ही आम्हाला कळवायचे आहेत.
- एका पोस्टकार्डवर किंवा अंतर्देशिय पत्रावर लिहून ते कळवा.
- ज्या स्पर्धकांचे प्रश्न उत्तम वाटतील त्यापैकी पहिल्या तिघांना प्रत्येकी ३०० रुपयांची पुस्तके बक्षिस म्हणून देण्यात येतील आणि त्यांचे प्रश्न दिवाळी अंकात छापण्यात येतील.

* ही स्पर्धा इयत्ता ६वी ते १०वी पर्यंतच्या मुलांसाठी आहे.

तुमचे प्रश्न आम्हाला ३० जुलै २०११ पर्यंत मिळायला हवेत

आमचा पत्ता :

संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४






ओळखा पाहू



१९१३ सालच्या नोबेल पुरस्काराचे मानकरी

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५ ऑगस्ट २०११ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.

बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.

निकाल सप्टेंबर २०११च्या अंकात जाहीर होईल.

उत्तरे पाठविण्याचा पत्ता :

मेहता पब्लिशिंग हाऊस, मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

'मे' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

सुप्रसिद्ध विनोदी लेखक - वि. आ. बुवा

स्पर्धेचे विजेते - **विनायक गोरे** - कल्याण

मीरा साळुंखे, विनायक हावळ - कोल्हापूर, रविंद्र सराफ - रावेर, अशोक घाटे, रुपाली शिंदे - अकोला, अनिल शेळके, भीमराव गुंडे, आशिष गोसावी - सोलापूर, वि.पु. बाक्रे - ठाणे, अनुराधा साळवेकर, माधवी भेंडे - मुंबई, माधव नकुलवाड - लातूर, आशिष पचलोड, सुशिला पाटील, दयानंद साळे, हरिष रासने, सुमती भिडे - अमरावती, रमेश थेटे - पुणे, राकेश गायकवाड - उस्मानाबाद

प्रायोजक

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,

साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी

टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

सूचना - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 July 2011

न
वी
न

कथा गुर्जरी

– स्वत:चं अफाट दु:ख मनात लपवून पोटापाण्यासाठी जिथे गरज असेल तिथं जाऊन, मन लावून काम करणारी वृद्धा....

– दिवस गेलेली, मूल हवं असलेली वेश्या; आणि मुलगी असेल तर दर वेळी गर्भपाताची सक्ती केली जाणारी 'घरंदाज' सून...



– येऊ घातलेल्या निवडणुकीत हटकून जिंकण्यासाठी गावात जातीय दंगल घडवून आणणारे नेते आणि त्यामुळं हकनाक बरबाद होणारी कुटुंबं...

– कारगिलमध्ये शहीद झालेल्या जवानाचा मुलगा मनानं का होरपळतो?...

– ऐन तारुण्यात पतीनं टाकून दिल्यावरही अतिशय सुखी वैवाहिक जीवन जगत असल्याचं बेमालूम नाटक करणारी सुस्वरूप प्रौढा...

अशा अनेक कथा.

प्रत्येक कथा एका वेगळ्या जगाचं, सुखदु:खांचं दर्शन घडवणारी किंवा निखळ मनोरंजन करणारी!

अनुवाद : अंजनी नरवणे
२५०रु. पोस्टेज २५रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४

BOOK POST
Printed Matter

प्रति, ______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.

मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत

एक वर्षाला २०%   तीन वर्षांना २५%   पाच वर्षांना ३०%

एक वर्षाची	तीन वर्षाची	पाच वर्षांची
वर्गणी १५०रु.	वर्गणी ३५०रु.	वर्गणी ५००रु.

तीन किंवा पाच
वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'चतुर बोकोबा' आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'चला जाणून घेऊ या! मंत्रसामर्थ्य'
आणि **'चला जाणून घेऊ या! प्रार्थना'**
प्रत्येकी ४० रु. ची
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.

भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच

मेहता मराठी ग्रंथजगत, द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.